मराठी अस्मितेचा बुलंद आवाज.

# वृत्तमानस

https://epapervrittamanas.in/

Email : vrittamanas1@gmail. com

मुंबई/ पालघर | बुधवार, ३० जुलै २०२५ | वर्ष- ३० | अंक- ४० | पाने - ८

आर. एन. आय क्र. - ६५६०९/९६

किंमत : ३ रुपये

## 'गोध्रा'तील तिघे 19 वर्षांनंतर निर्दोष

**अहमदाबाद :** 2002 मधील गोध्रा हत्याकांडानंतर उसळलेल्या हिंसाचार प्रकरणातील तिघा आरोपींना 19 वर्षांनंतर गुजरात उच्च न्यायालयाने निर्दोष ठरवले. आरोपींना दोषी आणि शिक्षा सुनावण्याचा कनिष्ठ न्यायालयाचा निर्णय गुन्हा सिद्ध करण्यासाठी ठोस पुरावे नसल्याच्या कारणावरुन उच्च न्यायालयाने रद्द केला आहे. हा निर्णय गुजरात सरकारसाठी मोठा झटका मानला जात आहे. काही दिवसांपूर्वी मुंबईतील लोकल ट्रेन साखळी बॉम्बस्फोट प्रकरणातील 12 आरोपींना मुंबई उच्च न्यायालयाने निर्दोष मुक्त केले. त्यांचे दोषत्व सिद्ध करण्यातही सरकारी पक्ष सपशेल अपयशी ठरल्याचे निरिक्षण उच्च न्यायालयाने नोंदवले होते.



## राज्यसभेत 'मेंटल बॅलन्स'वरून खर्गे संतापले, नड्डांवर माफी मागण्याची वेळ

पान ८

# २२ एप्रिलचा बदला २२ मिनिटांत घेतला, भारतीयांना अपेक्षित कारवाई केली!

**प्रतिनिधी**
■ **नवी दिल्ली**

पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी लोकसभेत पहलगाम आणि ऑपरेशन सिंदूरवरील चर्चेत भाग घेतला. पंतप्रधान मोदी म्हणाले की, मी भारताची बाजू मांडण्यासाठी आणि भारताचे भले न पाहू न शकणाऱ्यांना आरसा दाखवण्यासाठी उभा राहिलो आहे. २२ एप्रिलला पहलगाममध्ये हल्ला झाला. आमच्या देशाने २२ एप्रिलच्या हल्ल्याचा बदला २२ मिनिटांत घेतला. भारतीयांना अपेक्षित होती, तशी प्रत्युत्तराची कारवाई केली, असेही मोदी म्हणाले.



"ऑपरेशन सिंदूर दरम्यान देशातील लोकांनी ज्याप्रकारे मला पाठिंबा दिला, मला आशीर्वाद दिला, त्याबद्दल मी देशातील जनतेचा ऋणी आहे. मी अभिमानाने सांगतो की, आम्ही २२ एप्रिलच्या हल्ल्याचा बदला २२ मिनिटांत घेतला. २२ एप्रिल रोजी पहलगाममध्ये क्रूर घटना झाली. दहशतवाद्यांनी निष्पाप लोकांना त्यांचा धर्म विचारून गोळ्या घातल्या. ती क्रूरतेची परिसीमा होती. भारताला हिंसाचाराच्या आगीत ढकलण्याचा हा एक विचारपूर्वक प्रयत्न होता. भारतात दंगली पसरवण्याचे हे षडयंत्र होते. आज मी देशवासीयांचे आभार मानतो की सर्वांनी एकजुटीने ते षडयंत्र उधळून लावले," असे मोदी म्हणाले.

मोदी पुढे म्हणाले, "२२ एप्रिल नंतर मी काही गोष्टी जाहीरपणे बोललो होतो. मी म्हटले होते की आम्ही दहशतवाद्यांचा नाश करू. मी जाहीरपणे सांगितले होते की, दहशतवाद्यांच्या मालकांनाही शिक्षा होईल आणि ती शिक्षा कल्पनेपेक्षा मोठी असेल. मी २२ एप्रिल रोजी परदेशात होतो, मी लगेच परतलो. त्यानंतर मी एक बैठक बोलावली. त्या बैठकीत आम्ही स्पष्ट सूचना दिल्या की दहशतवादाला चोख प्रत्युत्तर द्यावे लागेल. हा आमचा राष्ट्रीय संकल्प आहे. आमच्या सशस्त्र दलांच्या क्षमतेवर आमचा पूर्ण विश्वास आहे. त्यांच्या क्षमतेवर आणि क्षमतेवर आमचा पूर्ण विश्वास आहे. लष्कराला कारवाई करण्याचे स्वातंत्र्य देण्यात आले होते. कधी, कुठे आणि कसे प्रत्युत्तर द्यायचे हे सैन्याने ठरवावे असे त्यांना सांगण्यात आले होते. आम्हाला अभिमान आहे की आम्ही दहशतवाद्यांना अशा प्रकारे शिक्षा दिली की त्यांचे मालक आता झोपू शकत नाहीत."

"पाकिस्तानी सैन्याला अंदाज आला होता की भारत काही मोठी कारवाई करेल. त्यांच्याकडून अणुहल्ल्याची विधानेही येऊ लागली होती. भारताने ६ मेच्या रात्री आणि ७ मेच्या सकाळी ठरल्याप्रमाणे कारवाई केली आणि पाकिस्तान काहीही करू शकला नाही. आमच्या सैन्याने २२ एप्रिलचा बदला २२ मिनिटांत निश्चित केलेल्या लक्ष्यासह घेतला. पाकिस्तानशी अनेक वेळा युद्धे झाली आहेत, परंतु भारताची ही पहिली रणनीती होती की आपण अशा ठिकाणी पोहोचलो, जिथे आपण यापूर्वी कधीही गेलो नव्हतो. पाकिस्तानच्या कानाकोपऱ्यातील दहशतवादी तळ उद्ध्वस्त केले गेले. बहावलपूर देखील उद्ध्वस्त केले गेले. आपल्या सैन्याने दहशतवादी तळ उद्ध्वस्त केले. पाकिस्तानला चोख प्रत्युत्तर देण्यात आले," असेही मोदी यांनी स्पष्ट केले.

# इंदिरा गांधींपेक्षा अर्धी हिंमत असेल तर ट्रम्प यांना खोटं ठरवून दाखवा

## राहुल गांधींचं पंतप्रधान मोदींना आव्हान

**प्रतिनिधी**
■ **नवी दिल्ली**

लोकसभेत सध्या ऑपरेशन सिंदूरवर चर्चा सुरु असून नुकतीच विरोधीपक्ष नेते राहुल गांधी यांनी आपली भूमिका मांडली. यावेळी त्यांनी ऑपरेशन सिंदूरवर अनेक प्रश्न उपस्थित केले. तसंच दोन दिवसांपासून या विषयावर जी चर्चा झाली. सत्ताधारी लोकांनी यावर जी भूमिका मांडली त्या भूमिकांना खोडून काढण्याचं कामही त्यांनी केलं. चर्चेदरम्यान इंदिरा गांधी यांच्यावरही भाजपच्या खासदारांनी टीका केली. त्यावरुन राहुल गांधी यांनी पंतप्रधान नरेंद्र मोदी यांना थेट आव्हान दिलं आहे. इंदिरा गांधीपेक्षा अर्धी हिंमत असेल तर ट्रम्प खोटं बोलत आहेत हे त्यांनी आज सांगून



दाखवावं असं राहुल गांधी यांनी म्हटलं आहे.

राहुल गांधी म्हणाले, "जर मोदींमध्ये दम असेल तर आज पंतप्रधान नरेंद्र मोदींनी सभागृहात सांगावं की डोनाल्ड ट्रम्प खोटारडे आहेत. सध्या एक नवा शब्द जन्माला आलाय की, न्यू नॉर्मल. परराष्ट्रमंत्र्यांनी आपल्या भाषणात हा शब्द वापरताना म्हटलं की, सर्वच देशांनी दहशतवादाचा निषेध केला आहे. हे एकशेएक टक्के खरं आहे, पण पहलगाम हल्ल्यानंतर एकाही देशानं पाकिस्तानाचा निषेध केलेला नाही. याचा अर्थ काय तर जग पाकिस्तानसोबत आपली तुलना करत आहे. यापूर्वी युपीएचं सरकार होतं तेव्हा भारत स्पष्टपणे सांगत होता की पाकिस्तान दहशतवादाला खतपाणी घालतो आहे, तर तसंच दहशतवादाला पोसत असल्यानं त्याचा निषेधही केला होता"

"यानंतर आणखी काही मजेशीर बाबी सभागृहात सांगितल्या गेल्या. आपल्या परराष्ट्र मंत्र्यांनी आणि संरक्षणमंत्र्यांनी सांगितलं की, आपण पाकिस्तानला रोखलं. तुम्ही खरोखरच पाकिस्तानला रोखलंय का? ठीक आहे

पान 8 वर

# मंत्र्यांची वादग्रस्त विधाने आणि कृती खपवून घेतली जाणार नाही

**प्रतिनिधी**
■ **मुंबई**



मंत्र्यांची वादग्रस्त विधाने आणि कृती अजिबात खपवून घेतली जाणार नाही. वादग्रस्त विधानांमुळे सरकारची बदनामी होते. आपले सरकार चांगले काम करत असून विरोधकांच्या हातात आयते कोलीत देऊ नका. तुम्हाला ही अखेरची संधी आहे. अन्यथा जी कारवाई करायची ती करूच, असा निर्वाणीचा इशारा मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी आज मंत्र्यांना दिला. मुख्यमंत्र्यांनी वादग्रस्त मंत्र्यांना शेवटची संधी देऊन त्यांना तूर्त अभय दिले आहे. वादग्रस्त ठरलेल्या मंत्र्यांवर कारवाई टाळताना फडणवीस यांनी मंत्र्यांची लाज काढली व मंत्र्यांना फैलावर घेतले.

राज्य मंत्रिमंडळाची साप्ताहिक बैठक आज मंत्रालयात पार पडली. पावसाळी अधिवेशनात सामाजिक न्याय मंत्री संजय शिरसाट, कृषिमंत्री माणिकराव कोकाटे तसेच गृह राज्यमंत्री योगेश कदम वादग्रस्त ठरले. चित्रफितींमुळे बदनाम झालेल्या शिरसाट आणि कोकाटे यांच्या राजीनाम्याची मागणी विरोधी पक्षाने लावून धरली होती. त्याचे पडसाद आजच्या मंत्रिमंडळ बैठकीत उमटले. राज्य मंत्रिमंडळाच्या अजेंड्यावरील विषय संपल्यानंतर मुख्य सचिवांसह सर्व अधिकाऱ्यांना बैठकीतून बाहेर जाण्यास सांगण्यात आले. अधिकारी बाहेर गेल्यानंतर त्यांनी थेट विषयाला हात घातला.

सुरुवातीला उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे आणि अजित पवार यांनी मंत्र्यांच्या वागणुकीबद्दल नाराजी व्यक्त केली. मंत्र्यांनी सार्वजनिक ठिकाणी बोलताना आपली वर्तणूक चांगली ठेवावी. राज्य सरकार चांगले काम करत असून मंत्र्यांच्या विधानाने त्यावर पाणी फेरता कामा नये, याची स्पष्ट जाणीव शिंदे आणि पवार यांनी करून दिली. त्यानंतर फडणवीस यांनी सरकारला अडचणीत आणणाऱ्या मंत्र्यांना चांगल्याच कानपिचक्या दिल्या.

# गडकरींच्या उंचीची व्यक्ती आम्हाला दिसत नाही !

## पवारांकडून दिल्लीत स्तुतीसुमने

**प्रतिनिधी**
■ **नवी दिल्ली**



संसदेचं अधिवेशन सुरू असून केंद्रीय मंत्री नितीन गडकरी यांना राष्ट्रवादीचे सर्वेसर्वा आणि खासदार शरद पवार यांच्या हस्ते चिंतामणराव देशमुख पुरस्कार देण्यात आला. या पुरस्कार सोहळ्यात शरद पवारांनी नितीन गडकरी यांच्या कामाचे कौतुक करत, त्यांच्यावर स्तुतीसुमने उधळली आहेत. तसेच, त्यांच्या कामाबद्दल नेहमीच इतर खासदार कौतुक करतात, चांगलं सांगतात असेही पवारांनी म्हटले. राजधानीत ज्यांनी कर्तुत्व गाजवलं त्यांच्यावर पुस्तक लिहिण्यात येत आहे, दुसऱ्या बाजूला सी.डी देशमुख यांच्या नावाने पुरस्कार दिला जात असून नितीन गडकरींना हा पुरस्कार आहे, याचा आनंद झाला, असे शरद पवारांनी म्हटले. गडकरींचे काम फक्त महाराष्ट्रापुरते आहे असं म्हणणं खरं नाही, गडकरींच्या उंचीची व्यक्ती आम्हाला दिसत नाही, अशा शब्दात पवारांनी गडकरी यांच्याबद्दल मत व्यक्त केलं.

कोणत्याही खासदाराला प्रश्न विचारला तरी ते नितीन गडकरी यांच्याबद्दल चांगलंच बोलतात, त्यांच्या कामाचे कौतुक होते. गडकरींच्या कामाबद्दल 70 टक्के खासदार आम्हाला सांगतात, गडकरींच्या कामाबद्दल खासदारांना प्रचंड विश्वास आहे. त्यामुळेच, गडकरींच्या उंचीचा व्यक्ती आम्हाला दिसत नाही, असे म्हणत पवारांनी गडकरींवर स्तुतीसुमने उधळली. सी.डी. देशमुख यांच्या नावाचा पुरस्कार स्विकारण्याची माझी पात्रता आहे का माहिती नाही, असे म्हणत नितीन गडकरी यांनी पुरस्कार स्वीकारला. मराठीचा आम्हाला अभिमान आहे, हिंदीचाही तितकाच अभिमान आहे, असे गडकरींनी भाषणावेळी म्हटले.

## लाडकी बहीण योजनेत 4,800 कोटींचा घोटाळा

### एसआयटी चौकशी करा



**नवी दिल्ली:** महायुती सरकारच्या मुख्यमंत्री माझी लाडकी बहीण योजनेत सुमारे 4 हजार 800 कोटींचा भ्रष्टाचार झाला आहे. इतक्या चाळण्या असताना पुरूष लाभार्थी या योजनेत घुसलेच कसे? 14 हजारांहून अधिक पुरुषांनी या योजनेचा लाभ घेतल्याची माहिती छाननीमध्ये उघड झाली आहे. प्रस्तुत घोटाळ्यासाठी संपूर्ण राज्य सरकार जबाबदार असून, या घोटाळ्याची एसआयटी चौकशी झाली पाहिजे अशी मागणी राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाच्या खासदार सुप्रिया सुळे यांनी केली आहे. त्या नवी दिल्लीत प्रसारमाध्यमांशी बोलत होत्या. सुप्रिया सुळे म्हणाल्या की, आई-वडिलानंतर भाऊ-बहिणीचे नाते हे सर्वात पवित्र असते. पण महाराष्ट्र सरकारने या नात्याचाही अवमान केला. मुख्यमंत्री माझी लाडकी बहीण योजनेत 4 हजार 800 कोटींचा घोटाळा झाला. त्यामुळे सरकारने या योजनेची श्वेतपत्रिका काढावी, संपूर्ण व्यवहाराचे ऑडिट करावे व या प्रकरणाची एसआयटी चौकशी करावी. हा तपास अत्यंत पारदर्शक पद्धतीने झाला पाहिजे. सरकारने या प्रकरणी चौकशी केली नाही तर आम्ही हा विषय संसदेत मांडून केंद्राकडे या योजनेच्या चौकशीचा आग्रह धरू, असे त्यांनी सांगितले.




**मुंबई ।** उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांची भेट घेण्यासाठी त्यांचा अजय मोहिते हा 'जबरा फॅन' चक्क पुष्पा चित्रपटातील नायकाची हुबेहूब वेशभूषा आणि मेकअप करून मंगळवारी मंत्रालयात आला होता. वर्धा येथून आलेल्या अजयने मीडियाला आपली छायाचित्रे काढू दिली नाहीत. शिवाय आपण मराठी असून आपल्याशी मराठीतच बोला, असा आग्रह त्याने जमलेल्या चाहत्यांकडे धरला होता. तेथे उपस्थित चाहत्यांनी मग त्याच्यासोबत आपले फोटो आणि सेल्फी मोबाईलने घेत आपली हौस पूर्ण केली.

# राज्यात 'मुख्यमंत्री समृद्ध पंचायतराज अभियान' राबविणार

**प्रतिनिधी**
■ **मुंबई**

राज्यात ग्रामपंचायत, पंचायत समिती व जिल्हा परिषदांसाठी सन २०२५-२६ या आर्थिक वर्षापासून तालुका, जिल्हा, महसूल विभाग व राज्य अशा चार स्तरांवर 'मुख्यमंत्री समृद्ध पंचायतराज अभियान' हे पुरस्कार अभियान राबविण्यास आज झालेल्या मंत्रिमंडळ बैठकीत मान्यता देण्यात आली. बैठकीच्या अध्यक्षस्थानी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस होते. तसेच या अभियानातील पुरस्कारांकरिता दरवर्षी 290 कोटी 33 लाख रुपयांची तरतूद करण्यास मान्यता देण्यात आली.

या अभियानात 1 हजार 902 पुरस्कार दिले जाणार असून अभियानाचा कालावधी 17 सप्टेंबर, ते 31 डिसेंबर, 2025 असा राहणार आहे. ग्रामपंचायतीसाठी राज्यस्तरावर प्रथम क्रमांकासाठी 5 कोटी रुपये, द्वितीय क्रमांकासाठी 3 कोटी रुपये आणि तृतीय क्रमांकासाठी 2 कोटी रुपयांचा पुरस्कार देण्यात येणार आहे. तर विभागस्तरीय पुरस्कारात विभागनिहाय पहिल्या 3 ग्रामपंचायती अशा एकूण 18 ग्रामपंचायतींना अनुक्रमे 1 कोटी, 80 लाख आणि 60 लाख रुपयांचा पुरस्कार देण्यात येणार आहे. जिल्हास्तरासाठी 34 जिल्ह्यातील एकूण 102 ग्रामपंचायतींना अनुक्रमे प्रथम क्रमांकासाठी 50 लाख, द्वितीयसाठी 30 लाख आणि तृतीयसाठी 20 लाख रुपयांचा पुरस्कार देण्यात येणार आहे. तालुकास्तरावर (1053 पुरस्कार) ग्रामपंचायतीला प्रथम क्रमांकासाठी 15 लाख, द्वितीय क्रमांकासाठी 12 लाख, तृतीय क्रमांकासाठी 8 लाख रुपये अशा एकूण 1 हजार 53 ग्रामपंचायती आणि 5 लाख रुपयांचे दोन विशेष पुरस्कार (702 पुरस्कार) देण्यात येणार आहेत.

पंचायत समितीसाठी राज्यस्तरावर प्रथम क्रमांकासाठी 2 कोटी रुपये, द्वितीय क्रमांकासाठी दीड कोटी रुपये आणि तृतीय क्रमांकासाठी 1 कोटी 25 लाख रुपयांचा पुरस्कार देण्यात येणार आहे. तर विभागस्तरावर (18 पुरस्कार) प्रथम क्रमांकासाठी 1 कोटी रुपये, द्वितीय क्रमांकासाठी 75 लाख रुपये आणि तृतीय क्रमांकासाठी 60 लाख रुपयांचा पुरस्कार देण्यात येणार आहे.

# राज्यभरात 'अवयवदान' चळवळ राबवा



**प्रतिनिधी**
■ **मुंबई**

महाराष्ट्रातील अवयवदानाचे प्रमाण वाढावे व अवयवदानाच्या प्रतीक्षेत असलेल्या रुग्णांना नवजीवन मिळावे यासाठी येत्या ३ ते १५ ऑगस्ट दरम्यान अवयवदान ही एक चळवळ म्हणून राज्यभरात राबवावी, असे निर्देश सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्री प्रकाश आबिटकर यांनी मुंबई येथे आज आयोजित राज्यस्तरीय बैठकीत दिले.

राज्यात दि. ३ ते १५ ऑगस्ट या कालावधीत राज्यात 'अवयवदान पंधरवडा' म्हणून राबविण्यात येणार असून, यासाठी राज्यस्तरीय नियोजन बैठक आरोग्य मंत्री प्रकाश आबिटकर, आरोग्य राज्यमंत्री मेघनाताई साकोरे -बोर्डीकर यांच्या मार्गदर्शनाखाली आज आयोजित करण्यात आली होती. यावेळी आरोग्य सेवा आयुक्त तथा राष्ट्रीय आरोग्य अभियानाचे व्यवस्थापकीय संचालक डॉ. कादंबरी बलकवडे, केईएम रुग्णालयाचे डॉ. आकाश शुक्ला, वैद्यकीय शिक्षण विभागाचे अधिकारी तसेच आरोग्य विभागाचे प्रमुख अधिकारी उपस्थित होते. या बैठकीत मार्गदर्शन करताना आरोग्य मंत्री प्रकाश आबिटकर यांनी राज्यात राबविण्यात येत असलेल्या अवयवदान उपक्रमाचा आढावा घेतला व अवयवदानाच्या प्रतीक्षेत असलेल्या रुग्णांसाठी त्यांना नवजीवन मिळावे, यासाठी अवयवदान ही एक चळवळ म्हणून राबवावी व व्यापक प्रमाणावर जनजागृती करावी, असे निर्देश दिले. अवयवदानाबाबत सकारात्मकरित्या मतपरिवर्तन करून अवयवदानाविषयी असणारी भीती कमी करावी, तसेच प्रभावीपणे पद्धतीने काम करून सकारात्मक परिणाम दिसतील अशी विश्वासार्ह मोहीम दि. ३ ते १५ ऑगस्ट २०२५ या कालावधीत राबवावी, अशा सूचना दिल्या. त्याचप्रमाणे, दि. १५ ऑगस्ट रोजी प्रत्येक जिल्ह्यात अवयव दात्यांचा सत्कार करावा व मोहिमेला सकारात्मकरित्या गती द्यावी, अशा सूचनाही त्यांनी आरोग्य विभागाला दिल्या.

# एकनाथ शिंदे खुर्ची वाचवण्यासाठी त्यांच्या मंत्र्यांच्या गैरकृत्यावर पांघरुण घालतायत

## अनिल परब यांची टीका

**प्रतिनिधी**
■ **मुंबई**

शिवसेना (उद्धव बाळासाहेब ठाकरे) पक्षाचे आमदार अनिल परब यांनी आज सावली डान्सबार प्रकरणातील पुरावे हे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्याकडे दिली. मुख्यमंत्र्याची भेट घेतल्यानंतर अनिल परब यांनी माध्यमांशी संवाद साधला. यावेळी त्यांनी उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्यावर जोरदार टीका केली.



योगेश कदम यांच्या मातोश्रीच्या नावाने सुरू असलेल्या डान्सबारचा विषय मी उपस्थित केला होता. या प्रकरणामुळे महाराष्ट्र सरकारची प्रतिमा डागाळली जातेय. यापूर्वी या डान्सबार वरती 2023 मध्ये छापे झालेले, त्या बारमध्ये मे महिन्यात झालेली धाड, त्या धाडीत पकडलेल्या बारबाला, तेथील गिऱ्हाईक, त्या कारवाईच्या चार्जशीटची कॉपी, त्या बारचं लायसन्स, 2023 च्या छाप्यांचे पंचनामे,डान्सबारची माहिती, डान्सबारचे कायदे या सगळ्याची व्यवस्थित मांडणी करून त्याचे पुरावे, खेडमध्ये अवैधरित्या सुरू असलेल्या उपसा वाळूचे फोटो, व्हिडीओ आज मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीसांच्या हाती दिले आहेत. पुराव्यांची योग्य ती दखल घेऊन गृहराज्यमंत्री योगेश कदम यांच्यावर कारवाई करावी व त्यांचा राजीनामा घ्यावा अशी मागणी केली आहे, असे अनिल परब यांनी सांगितले.

एकनाथ शिंदे हे योगेश कदम यांचे समर्थन करत आहेत. धर्मवीर चित्रपटात एकनाथ शिंदेनी त्यांची प्रतिमा अशी दाखवली होती की, त्यात आनंद दिघेंनी डान्स बारवर कारवाई करायला सांगितल्यानंतर त्यांनी डान्स बार तोडल्याचे दाखवलेले. मला त्यांना विचारायचं आहे की हे तेच

पान 8 वर

# आयुक्त गगराणींनी घेतली 'राजभेट'

**प्रतिनिधी**
■ **मुंबई**

महापालिका निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर राजकीय हालचालींना वेग आला असतानाच मुंबई महापालिकेचे आयुक्त भूषण गगराणी यांनी मनसे अध्यक्ष राज ठाकरे यांच्या दादर येथील 'शिवतीर्थ' या निवासस्थानी दिलेली अनपेक्षित भेट चर्चेचा विषय ठरली आहे. ही भेट पाऊण तास चालली. याबाबत वेगवेगळे तर्क काढले जात आहेत.

आज सकाळी आयुक्त गगराणी यांनी दादरमधील छत्रपती शिवाजी महाराज मैदानाची पाहणी केली. यावेळी त्यांनी नागरिकांशी संवाद साधला, सूचना ऐकून घेतल्या. मात्र त्यानंतर थेट राज ठाकरे यांच्या निवासस्थानी जाऊन भेट घेतल्याने राजकीय वर्तुळात चर्चा रंगली आहे. ही भेट ठरवून घेतली का, की अचानक घडली, याबाबतही तर्क लढवले जात आहेत. आयुक्तांनी याआधी कधीही राज ठाकरे यांच्या बंगल्यावर भेट दिली नव्हती.

मनसे नेते संदीप देशपांडे यांनी भेट कशासाठी होती व काय चर्चा झाली याबाबत माहिती नसल्याचे सांगितले. पालिकेतील भ्रष्टाचार, शिवाजी पार्कची दुरवस्था, किंवा अलीकडेच चर्चेत असलेले घनकचरा व्यवस्थापन खात्यातील खासगीकरण या कोणत्याही मुद्द्यावर चर्चा झाली असावी, असा अंदाज व्यक्त केला जात आहे. शिवाय निवडणुकांच्या पार्श्वभूमीवर महत्त्वाच्या विषयांवर चर्चा झाली असण्याची शक्यताही वर्तवली जात आहे.

# वसई, ठाणे, नाशिकसह १२ ठिकाणी ईडीची एकाच वेळी छापेमारी

◆**महापालिकेचे माजी आयुक्त अनिलकुमार पवार ईडीच्या जाळ्यात**

◆**कोट्यवधींचा मुद्देमाल जप्त झाल्याची चर्चा**

**प्रतिनिधी**
■ **वसई**

वसई-विरार महानगरपालिकेचे माजी आयुक्त अनिलकुमार पवार यांच्या वसई, ठाणे, आणि नाशिक येथील निवासस्थानी मंगळवारी सक्तवसुली संचालनालयाने (ईडी) एकाच वेळी छापे टाकले. एकूण १२ ठिकाणी ही कारवाई करण्यात आली असून अनधिकृत बांधकाम घोटाळ्याशी संबंधित असल्याची प्राथमिक माहिती मिळत आहे.



सोमवारी मुख्यालयात झालेल्या निरोप समारंभाच्या दुसऱ्याच दिवशी(मंगळवारी) ही कारवाई झाल्याने वसई शहरात खळबळ उडाली आहे.सकाळी पहाटे सुरू झालेल्या या छापेमारी मोहिमेची माहिती अत्यंत गुप्त ठेवण्यात आली होती. वसई, ठाणे व नाशिक येथील १२ ठिकाणी एकाचवेळी धाडी टाकण्यात आल्या. यापैकी बहुतांश ठिकाणे पवार यांच्याशी संबंधित असल्याचे सूत्रांकडून सांगण्यात येत आहे. उशिरापर्यंत कारवाई सुरूच होती, मात्र ईडीकडून कोणतीही अधिकृत माहिती जाहीर करण्यात आलेली नव्हती.

ईडीची कारवाई टळावी यासाठी आयुक्तांनी त्यांचे घर बंद ठेवले होते. ईडीच्या अधिकाऱ्यांनी डोअर बेल वाजवत तासभर प्रतीक्षा केली. दरवाजा न उघडल्याने अधिकाऱ्यांनी शेवटी लॉक तोडून घरात प्रवेश केला. त्यानंतर पवार यांच्या पत्नी, मुलगी व काही नातेवाईकांची चौकशी करण्यात आली.ईडीच्या कारवाईत नाशिकमधील निवासस्थानी दीड ते दोन कोटी रुपये किमतीचा मुद्देमाल जप्त झाल्याची माहिती सूत्रांकडून मिळत आहे. मात्र या दाव्याला अद्याप अधिकृत दुजोरा मिळालेला नाही. ठाणे आणि इतर घरांवरही ईडीने तपास मोहीम राबवली.

सोमवारी झालेल्या निरोप समारंभानंतर पवार यांच्या घरी काही धनाढ्य व्यक्तींच्या वारंवार भेटी झाल्याचे निदर्शनास आल्याने या प्रकरणात आर्थिक देवाणघेवाणीचा संशय बळावला आहे. ईडीकडून संबंधित व्यक्तींवरही

पान 8 वर

मुंबई: जेष्ठ वृत्तपत्र लेखक श्री सुरेंद्र तेलंग यांचा ८६ वा वाढदिवस नुकताच संप्पन्न झाला. यावेळी त्यांच्या वाढदिवसाच्या निमित्ताने शुभेच्छा देण्यासाठी जेष्ठ पत्रकार शशिकांत सावंत, जेष्ठ साहित्यिक विलास खानोलकर,पत्रकार संपादक सा. भगवे वादळ दत्ता खंदारे, लेखक प्रभू अग्रहारकर, कवी, साहित्यिक, भाई नार्वेकर, समाज सेवक दिलीप सातघर, मनसे पदाधिकारी परेश तेलंग तसेच त्यांच्या दोन मुली, जावई, सुन आणि जवळचे नातेवाईक आदी उपस्थित होते.यावेळी शब्दश्री कवी विलास देवळेकर यांच्या कवितेचे वाचन करण्यात आले.



## थोडक्यात

### डॉ. महेश गौड़ यांना डॉ. श्यामाप्रसाद मुखर्जी पुरस्कार प्रदान



**मुंबई:** शिक्षण क्षेत्रात क्रांती घडवून आणणारे सीए डॉ. महेश गौड़ यांना त्यांच्या अद्वितीय विचारसरणी आणि नवोपक्रमासाठी डॉ. श्यामा प्रसाद मुखर्जी मेमोरियल पुरस्काराने सन्मानित करण्यात आले आहे. भारतात मेमरी कोचिंग आणि मोटिवेशनल स्पीकिंगला एक नवीन दिशा दिल्याबद्दल हा पुरस्कार त्यांना देण्यात आला, हा कार्यक्रम टॉपनॉच फाउंडेशनने आयोजित केला होता, ज्यामध्ये देशातील अनेक प्रसिद्ध व्यक्ती उपस्थित होत्या. केंद्रीय मंत्री नारायण राणे, अभिनेता सोनू सूद, महाराष्ट्र विधानसभेचे अध्यक्ष वकील राहुल नार्वेकर आणि शिवसेनेच्या प्रवक्त्या शायना एनसी यासारख्या सन्माननीय पाहुण्यांनी समारंभात उपस्थिती लावली होती. एडुवेदा एडटेक प्रायव्हेट लिमिटेड अंतर्गत चालवले जाणारे डॉ. गौड़ यांनी स्थापन केलेले एज्युक्विक आज देशभरातील विद्यार्थ्यांसाठी आशेचा किरण बनले आहे.

### डॉ. वैभव देवगिरीकरांना समाजसेवेबद्दल 'गोल्डन ह्युम्युनिटी अवॉर्ड '

**मुंबई:** घाटकोपर येथील देव देश प्रतिष्ठानचे अध्यक्ष डॉक्टर वैभव देवगिरीकर यांना सामाजिक क्षेत्रातील योगदानाबद्दल होप मिरर फाउंडेशनच्या वतीने गोल्डन ह्युम्युनिटी अवॉर्ड 2025 हा पुरस्कार देऊन सन्मानित करण्यात आले हा मानाचा समजला जाणारा पुरस्कार माजी मंत्री जितेंद्र आव्हाड यांच्या शुभहस्ते डॉ. देवगिरीकर यांना प्रदान करण्यात आला आरोग्यसेवा, समाजप्रबोधन, वैद्यकीय शिक्षण आणि माणुसकी यासाठी समर्पित केलेल्या योगदानाबद्दल हा पुरस्कार देण्यात आला असून लाखो लोकांसाठी तो प्रेरणादायी ठरणार आहे. या सन्मानाबद्दल देव देश प्रतिष्ठान तसेच कार्यकर्त्यांच्या वतीने डॉ. वैभव देवगिरकर यांचे अभिनंदन करून पुढील वाटचालीसाठी शुभेच्छा देण्यात आल्या.

### पोलीसांमार्फत प्रतिबंधित विदेशी बनावटीच्या सिगारेटी जप्त



**मुंबई:** मुंबईत विदेशी बनावटीच्या सिगारेट वरती कारवाई करून अवैध धंदा करणाऱ्या व्यापाऱ्यास कांदिवली पोलिसांनी अटक केली आहे. कांदिवली पोलीस ठाण्याच्या हद्दीमध्ये साईनाथ पान बिडी आणि जनरल स्टोर्स, आणि शॉप नं. २, विनासंतुर बिल्डींग, साईबाबानगर, पवनबाग रोड, कांदिवली (पश्चिम) येथील २ विविध दुकानावर ही कार्यवाही केली असून आतापर्यंत सुमारे रु. ९,३०० रुपयांचा मुद्देमाल विदेशी बनावटीच्या सिगारेटी जप्त केल्या आहेत. प्रतिबंधित विदेशी बनावटीच्या सिगारेटीचा माल पोलिसांनी मुंबई येथील कांदिवली पश्चिम परीसरात विविध ठिकाणी धाडी टाकून जप्त केला आहे.

**महत्त्वपूर्ण निवेदन**

वृत्तपत्रामध्ये प्रसिद्ध होणाऱ्या जाहिरातीचा मजकूर स्वीकारण्यापूर्वी काळजी घेतली जात असली तरी त्याच्या आशयाची पडताळणी करणे शक्य होत नाही. तरी आपल्या वृत्तपत्रामध्ये प्रसिद्ध होणाऱ्या जाहिरातीतील जाहिरातदार कंपन्या, सहयोगी संस्था अथवा व्यक्तीबरोबर व्यवहार केल्यामुळे कोणत्याही स्वरूपाचे नुकसान व हानी झाल्यास त्यासाठी अथवा संबंधित जाहिरातीतील आशयासाठी मरिक मीडिया अँड कम्युनिकेशन्स प्रा. लि.ला जबाबदार ठरविता येणार नाही. त्यामुळे जाहिरातदारांना कोणतीही रक्कम प्रेषित करण्यापूर्वी अथवा त्याच्याबरोबर कोणत्याही स्वरूपाचे संमतिपत्र कार्यसिद्ध करण्यापूर्वी अथवा एखाद्या जाहिरातीवर आधारित कोणतीही कृती करण्यापूर्वी वाचकांनी आवश्यकती चौकशी करण्याची खबरदारी घ्यावी.

# 'आमदार आपल्या दारी' उपक्रमात समस्या ऐकून तात्काळ निर्णयांचे आदेश

## आमदार राजेंद्र गावित यांचा नागरिकांना मोठा दिलासा



प्रतिनिधी
■ डहाणू

पालघर विधानसभा मतदारसंघाचे लोकप्रिय आमदार राजेंद्र गावित यांच्या उपस्थितीत "आमदार आपल्या दारी" हा महत्त्वपूर्ण लोकसंपर्क उपक्रम पुण्य आचार्य भिसे हायस्कूल, कासा येथे उत्साही वातावरणात पार पडला. या उपक्रमात मतदारसंघातील विविध गावांमधून आलेल्या शेकडो नागरिकांनी सहभाग घेत आपापल्या समस्या, अडचणी आणि मागण्या मांडल्या.या संवादामधून रस्ते, पाणी, वीज, आरोग्य, शिक्षण, महसूल, वन विभाग व शासकीय योजनांचा लाभ या विषयांवर सखोल चर्चा झाली. अनेक वर्षांपासून प्रलंबित असलेल्या समस्या ऐकून आमदार गावित यांनी संबंधित अधिकाऱ्यांना तात्काळ कार्यवाहीचे आदेश दिले.

कार्यक्रमास डहाणूचे प्रांताधिकारी तथा प्रकल्प अधिकारी विशाल खत्री, तहसीलदार सुनील कोळी, गटविकास अधिकारी पल्लवी सस्ते तसेच विविध शासकीय विभागांचे वरिष्ठ अधिकारी उपस्थित होते. नागरिकांनी सादर केलेल्या समस्या थेट अधिकाऱ्यांपर्यंत पोहोचल्या आणि त्यावर जागेवरच चर्चा होऊन निर्णय घेण्यात आले.

या वेळी आमदार गावित म्हणाले, "जनतेने मांडलेले प्रश्न प्राधान्याने सोडवले गेले पाहिजेत. जे प्रश्न प्रलंबित आहेत त्यांची जबाबदारी प्रशासनाने घ्यावी. यासाठी मी स्वतः पाठपुरावा करणार आहे."कार्यक्रमादरम्यान नागरिकांनी तीन प्रतींसह अर्ज सादर केल्याने त्यांची मागणी अधिक प्रभावीपणे नोंदवली गेली. त्यामुळे शासकीय यंत्रणेला मागण्या वर्गवारीनुसार कार्यवाहीस गती देणे सोपे झाले."आमदार आपल्या दारी" या उपक्रमामुळे प्रशासन थेट जनतेच्या संपर्कात येत आहे, आणि गावकऱ्यांच्या समस्या जाणून घेऊन तात्काळ उपाययोजना सुरू करण्यात येत आहेत. प्रशासन आणि जनतेमधील विश्वास अधिक मजबूत होत असल्याचे यावेळी दिसून आले.

# अवैध टॉवर संस्कृती विरोधात ग्रामस्थांची एकजूट

## ३ ऑगस्टला निर्धार चौक सभेचे आयोजन

प्रतिनिधी
■ वसई

वसई पूर्वपट्टीत कॉंक्रिटीकरणाचे जंगल मोठ्या प्रमाणात माजले आहे. पायाभूत सुविधा नसताना तेथे कॉंक्रीटीकरणाचे जंगल उभे करून विविध समस्यांना आमंत्रण दिले जात आहे. प्रशासकीय भोंगळ कारभार आणि आर्थिक वसुल्यांची खाबुगिरी यामुळे वसई पूर्वपट्टीत जेथे हिरवळ नांदत होती. त्या गोकुळाचे स्मशान झाले आहे. अशाच पद्धतीची कॉंक्रिटीकरणाची बीजे वसई पश्चिम पट्ट्यात राहण्याच्या हालचाली सुरू झाल्या आहेत. अवैध टॉवर उभारून पश्चिम पट्ट्याला बेचिराख करण्याचा डाव असल्याने त्या विरोधात आता ग्रामस्थांनी एकजुट दाखवली आहे. येत्या ३ ऑगस्ट रोजी मुळगाव चर्च येथे निर्धार चौक सभा आयोजित करण्यात आली असून अवैध टॉवर संस्कृतीला तीव्र विरोध करण्यात येणार आहे.

जोवर वसई पश्चिम पट्ट्याला पायाभूत सुविधा मिळत नाहीत, तोवर अवैध संस्कृतीचा टॉवर ग्रामीण पश्चिम पट्ट्यात रुजू देणार नाही, असा निर्धार या चौकसभेच्या माध्यमातून ग्रामस्थ करणार आहेत. वसई- विरार हे शहर मुंबई शहर व उपनगरांचे फुफ्फुस म्हणून ओळखले जाते. येथील बागायती शेती, फळशेती, फुलशेती, विविध पालेभाज्या या मुंबईच्या बाजारपेठेत ताज्या प्रमाणे मिळत असल्याने वसई -विरारला मुंबईचे फुफ्फुस म्हणून ओळखले जाते. परंतु या पश्चिम पट्ट्यात अवैध टॉवर संस्कृतीची बीजे रोवण्याचा खटाटोप चालू आहे. त्याला ग्रामस्थांनी कडाडून विरोध दर्शविला आहे. हा विरोध येत्या ३ ऑगस्ट रोजी मुळगाव चर्च येथे चौक सभेच्या माध्यमातून आणखी तीव्र करण्यात येणार असल्याचे दिसून येईल.

वसई पश्चिम पट्टा हा हरित वसईसाठी ओळखला जातो. हरित चळवळ रुजावी म्हणून येथे प्रसिद्ध हरित चळवळ देखील रुजली होती. ती चळवळ आजही तशीच जिवंत आहे. त्यामुळे या चळवळीला भेट देऊन वसई पश्चिम पट्ट्याचे खेळते नंदनवन उद्ध्वस्त होऊ देणार नाही, असा इशारा या चौकसभेच्या माध्यमातून ग्रामस्थ देणार आहेत.

# नायगावच्या स्टार सिटीत बांगलादेशी तरुणींची तस्करी उघड

## गुन्हे शाखेच्या कारवाईत दोन पीडितांची सुटका

प्रतिनिधी
■ वसई

नायगाव पूर्व परिसरातील 'रश्मी स्टार सिटी' येथे पोलिसांनी टाकलेल्या धाडीत वेश्याव्यवसायासाठी बांगलादेशी तरुणींचा सर्रास वापर केला जात असल्याचा धक्कादायक प्रकार उघडकीस आला आहे. या कारवाईत तीन बांगलादेशी दलालांना अटक करण्यात आली असून एका अल्पवयीन मुलीसह एका २१ वर्षीय पीडित तरुणीची सुटका करण्यात पोलिसांना यश आले आहे.

वसई गुन्हे शाखेचे नवनियुक्त पोलीस आयुक्त संदीप डोईफोडे यांच्या मार्गदर्शनाखाली २६ जुलै रोजी ही कारवाई करण्यात आली. विशेष पथकाने नायगाव पूर्वेतील रश्मी स्टार सिटीमधील एका फ्लॅटवर छापा टाकला असता, तेथे बांगलादेशातून फसवून आणलेल्या तरुणींना वेश्याव्यवसायात ढकलल्याचे उघड झाले.अटक करण्यात आलेले तीन दलाल मोहम्मद खालिद व्यापारी, जुबेर हारुन शेख आणि शामिन गफार सरदार हे संबंधित तरुणींना बळजबरीने घरातच ग्राहकांना देत होते. ग्राहकांकडून प्रत्येकी सुमारे पाच हजार रुपये घेत, त्यातून मोबदला, घरभाडे व कमिशन हे तिघे वाटून घेत होते.या कारवायेमुळे केवळ वेश्याव्यवसायच नव्हे तर बांगलादेशी नागरिकांच्या बेकायदेशीर वास्तव्याचा मुद्दा पुन्हा ऐरणीवर आला आहे. वसई-विरार परिसरात अशा परप्रांतीय गुन्हेगारी घटकांच्या वाढत्या उपस्थितीमुळे कायदा-सुव्यवस्थेला मोठे आव्हान निर्माण झाले आहे.पोलिसांनी पीडित महिलांना रेस्क्यू फाउंडेशनमध्ये सुरक्षित ठेवले असून या प्रकरणी आणखी काही गुन्हेगारांचा शोध घेत तपास सुरू आहे.

# श्री क्षेत्र गीतांबिका मंदिरात नागपंचमी साजरी

■ मुंबई

घाटकोपर पश्चिम असल्फा येथील श्री क्षेत्र गीतांबिका मंदिरात 38 व्या नागपंचमी आणि अश्लेषा बाली उत्सव साजरा करण्यात आला. यावेळी संस्थेचे अध्यक्ष सुरेश भंडारी, धर्मपाल कोटियन, सुरेश शेट्टी, माजी नगरसेविका अश्विनी मते, किरण लांडगे, बाबू बत्तेली, चंद्रेश दुबे, नंदू साळुंखे, अनिल गलगली आदी उपस्थित होते. मुंबईतील विविध भागातून मोठया प्रमाणात भाविकांनी गर्दी केली होती.



# जव्हारमध्ये खड्डे की खड्ड्यांमध्ये जव्हार?

## शहरातील रस्त्यांची दयनीय अवस्था–प्रशासनाचे दुर्लक्ष !

प्रतिनिधी
■ मोखाडा

संपूर्ण जव्हार शहरात सध्या पावसामुळे रस्त्यांची अक्षरशः चाळण झाली असून,रस्त्यांवरील खड्डे इतके मोठे झाले आहेत की, कुठे रस्ता आहे आणि कुठे खड्डा,हे ओळखणे कठीण झाले आहे.काही ठिकाणी तर हे खड्डे तळ्याचे स्वरूप घेत आहेत.त्यामुळे वाहनचालकांपासून पादचाऱ्यांपर्यंत सर्वसामान्य जनतेला मोठ्या त्रासाला सामोरे जावे लागत आहे.

शहरातील मुख्य रस्ते,बसस्थानक परिसर, बाजारपेठ,शाळा-कॉलेजच्या रस्त्यांवर पाईपलाईन टाकण्यासाठी



व इतर खड्डे मोठमोठाले पडले आहेत.विशेष म्हणजे हे खड्डे केवळ डागडुजीच्या प्रतीक्षेत नाहीत,तर अनेक महिन्यांपासून दुर्लक्षित अवस्थेत आहेत. पावसाळ्यात पाणी साचल्यामुळे अपघाताचे प्रमाण वाढले आहे. येथील जनतेला रोजचा प्रवास त्रासदायक बनला आहे.

स्थानिक नागरिकांनी यासंदर्भात अनेक वेळा तक्रारी करूनही कोणतेही ठोस पाऊल उचलण्यात आलेले नाही. लोकप्रतिनिधी आणि प्रशासकीय यंत्रणा याकडे डोळेझाक करत असल्याचा आरोप नागरिक करत आहेत.

**खराब रस्त्यांमुळे पर्यटकांत नाराजी**

जव्हार हे पर्यटनदृष्ट्या महत्वाचे शहर असूनही अशा रस्त्यांमुळे पर्यटकांमध्येही नाराजी दिसून येत आहे. प्रशासनाने त्वरित खड्डे बुजवण्याची व रस्ते डागडुजीची कार्यवाही हाती घ्यावी, अशी मागणी नागरिकांकडून जोर धरत आहे.

# एच पश्चिम विभागात 31 जुलैला 14 तास पाणी पुरवठा राहणार बंद

प्रतिनिधी
■ मुंबई

पाली हिल जलाशयाच्या इनलेट व आऊटलेट वरील ४ व्हॉल्व्ह बदलण्याचे काम हाती घेण्यात येणार आहे. त्यामुळे एच पश्चिम विभागातील काही भागांचा पाणीपुरवठा ३१ जुलै २०२५ रोजी सकाळी ९ वाजेपासून रात्री ११ वाजेपर्यंत म्हणजे १४ तास राहणार बंद राहणार आहे तर काही भागात कमी दाबाने पाणीपुरवठा होणार आहे. त्यामुळे एच पश्चिम विभागातील नागरिकांनी पुढील ४ ते ५ दिवस पाणी उकळून व गाळून प्यावे असे बृहन्मुंबई महानगरपालिकेचे आवाहन केले आहे.

कामकाजाच्या दरम्यान पाणीपुरवठा खंडित-११. पाणीपुरवठा परिक्षेत्र -- हनुमान नगर, लक्ष्मी नगर युनियन पार्क मार्ग क्रमांक १ ते ४, पाली हिल आणि च्युईम गावाचा काही भाग (नियमित पाणीपुरवठ्याची वेळ - दुपारी २.०० ते सायंकाळी ५.०० वा.) (पाणीपुरवठा बंद राहणार)

२. नर्गिस दत्त मार्ग, पद्मश्री देव आनंद मार्ग (जिग जॅग मार्ग) (नियमित पाणीपुरवठ्याची वेळ - रात्री १०.०० ते मध्यरात्री १.०० वा.) (पाणीपुरवठा बंद राहणार)३. पंप परिक्षेत्र २ : नर्गिस दत्त मार्ग, पाली माला मार्ग (नियमित पाणीपुरवठ्याची वेळ - सकाळी १०.०० ते दुपारी १२.३० वा.) (पाणीपुरवठा बंद राहणार)

**कमी दाबाने पाणीपुरवठा**

१. पेरी परिक्षेत्र : कांतवाडी परिसराचा काही भाग, पाली नाका, पाली गावठाण, शेरली, राजन व माला गावाचा काही भाग (नियमित पाणीपुरवठ्याची वेळ - सकाळी १०.०० ते दुपारी २.०० वा.) (कमी दाबाने पाणीपुरवठा)२. खारदांडा परिक्षेत्र : खारदांडा कोळीवाडा, दांडपाडा, च्युईम गावठाण, गझधरबंध झोपडपट्टीचा काही भाग, खार पश्चिमेचा काही भाग (नियमित पाणीपुरवठ्याची वेळ - सायंकाळी ५.३० ते रात्री १०.०० वा.) *(कमी दाबाने पाणीपुरवठा)

संबंधित विभागातील नागरिकांनी खबरदारीचा उपाय म्हणून पाण्याचा आवश्यक साठा करुन ठेवावा. पाणीपुरवठा बंदच्या कालावधीत काटकसरीने पाणी वापरुन सहकार्य करावे, तसेच नागरिकांनी खबरदारीचा उपाय म्हणून पुढील ४ ते ५ दिवस पाणी उकळून - गाळून प्यावे, महानगरपालिकेस सहकार्य करावे, असे आवाहन बृहन्मुंबई महानगरपालिका प्रशासनाच्या वतीने करण्यात आले आहे.

# दिशाभूल करणाऱ्यांपासून सावध राहा, मुंबईतील घरांचा हक्क गमावू नका !

## गिरणी कामगार वारस संघर्ष सेवा समिती, मुंबईचे कामगारांना आवाहन

प्रतिनिधी
■ मुंबई

नऊ जुलै २०२५ रोजी विधान भवनावर १४ संघटनेचा प्रचंड मोर्चा निघाला त्या मोर्चाचे फलीत म्हणून राज्य सरकारने आपल्या सर्वच मागण्या मान्य केल्या.पण काही संघटनांचे पित्त त्यामुळे खवळले आहे. काही संघटना मुंबईमध्ये कार्यरत आहेत काही संघटना सातारा सांगली कोल्हापूर या ठिकाणी कार्यरत आहेत आणि ते गिरणी कामगारांची दिशाभूल करत आहेत वांगणी आणि शेलु कर्जत या ठिकाणी घरासाठी काही संघटना स्वतःहून गिरणी कामगारांना फोन करतात त्यांना आमिष दाखवतात आणि त्यांच्याकडून कन्सल्ट सहमतीपत्र घेत आहेत. मी म्हाडा कार्यालयातून बोलत आहे तुम्हाला वांगणीला किंवा शेलूला घर लागले आहे काही तर तुम्हाला मुंबईत घर लागले आहे असे खोटं सांगतात.गिरणी कामगार बिचारा घराच्या प्रतीक्षेत असल्यामुळे लगेच भारावून जातो आणि आपलं कन्सल्ट संमती पत्र ओटीपी देऊन मोकळा होतो आणि मुंबईला घराचा हक्क गमावून बसतो. अशी दिशाभूल करणाऱ्यांपासून कामगारांनी सावध राहावे ,असे आवाहन गिरणी कामगार वारस संघर्ष सेवा समिती, मुंबई यांनी केले आहे

असे दूरध्वनी करणाऱ्याला ओटीपी दिला तर मुंबईच्या घराचा हक्क गेला हे सर्व गिरणी कामगारांनी समजून घ्यावे कोणीही ओटीपी मागितला तर देऊ नका खात्री करून घ्या १४ संघटना तुमच्या बाजूने आहेत त्या कार्यकर्त्यांना विचारा गिरणी कामगार वारस संघर्ष सेवा समिती, मुंबई त्यांचे कार्यकर्ते तुम्हाला सदैव मदत करतील. गिरणी कामगार बंधूआणि भगिनीनो काही शंका असल्यास संघर्ष समितीच्या खालील कार्यकर्त्यांशी संपर्क साधावा असे आवाहन गिरणी कामगार वारस संघर्ष सेवा समिती, मुंबई यांनी केले आहे

गिरणी कामगारांनी शंका निरसनासाठी येथे संपर्क साधावा अध्यक्ष -आनंद मोरे ९८२१९७१०३०,उपाध्यक्ष -सात्तापा पोवार ८६५२८८२२३२,कार्याध्यक्ष सचिन चव्हाण ९५९४९०९३६३,सचिव अर्जुन इंजल ९२२४३५३७६३,महिला प्रमुख अश्विनी घाडगे ९२२००६७४६७,महिला संघटक मनीषा पेंडमकर ९८६७५९९२१९,कार्यवाहक संध्या धामरपूरकर ९९६९४१२२६०.

# ड्रग्जवर पूर्णपणे अंकुश लावता येऊ शकतो !

## एन्काउंटर स्पेशालिस्ट प्रदीप शर्मा यांचा दावा

प्रतिनिधी
■ मुंबई

राज्यात ड्रग्जचा बाजार वाढला असून तरुण पिढी यात ओढली जात आहे. हे रोखण्यासाठी दररोज कुठेना कुठे पोलिसांची कारवाई होताना दिसत आहे. ह्या गंभीर विषयी आपले विचार माध्यमांशी व्यक्त करताना एन्काउंटर स्पेशालिस्ट प्रदीप शर्मा यांनी ड्रग्जवर पूर्णपणे अंकुश लावण्यासाठी उपाय सांगितला आहे. ड्रग्ज बनवण्यासाठी आवश्यक असलेल्या रसायनांची अखंड विक्री थांबवली तेव्हाच ड्रग्जवर पूर्णपणे बंदी घातली जाईल. त्यासाठी पोलिसांसोबतच अन्न आणि औषध विभागालाही सक्रिय राहावे लागेल."

प्रदीप शर्मा पुढे म्हणाले कि , "पोलिस आपले काम उत्तम पद्धतीने करत आहेत. नुकतेच झोन-१० चे पोलिस उपायुक्त दत्ता नलावडे यांच्या मार्गदर्शनाखाली मुंबई पोलिस कर्नाटकात पोहोचले. उत्कृष्ट तपास करत पोलिसांनी ३९० कोटी रुपयांचे एमडी जप्त केले आणि ड्रग्ज फॅक्टरी उघडकीस आणली. पण या ड्रग्ज उत्पादक कंपन्यांना इतक्या मोठ्या प्रमाणात आवश्यक रसायने कोण आणि कुठून पुरवत आहे याचीही चौकशी झाली पाहिजे? आणि रसायनांचा पुरवठा करणाऱ्या कंपन्यांविरुद्ध कायद्याचा कडक वापर केला पाहिजे. प्रदीप शर्मा यांनी स्पष्टपणे सांगितले की, "ड्रग्ज रोखण्यासाठी पोलिस विभागाने केलेल्या सक्रियतेबद्दल त्यांचे कौतुक करावे लागेल, परंतु अन्न आणि औषध विभागालाही या रसायनांच्या प्रतिबंधाकडे विशेष लक्ष द्यावे लागेल. ड्रग्ज रोखण्यासाठी पोलिसांकडून केले जाणारे काम हे झाडाची पाने घासण्यासारखे आहे, तर ड्रग्जचा हा बाजार नष्ट करण्यासाठी त्याची पाळमुळे तोडावी लागतील. यासाठी अन्न आणि औषध विभागाची भूमिका मजबूत करावी लागेल."

# नालेसफाई कामात कंत्राटदारांच्या कामातील अनियमितता उघड, 15 कोटीचा दंड!

प्रतिनिधी
■ मुंबई

मुंबई महापालिकेने यंदाच्या नालेसफाई मोहिमेत कृत्रिम बुद्धिमत्ता (एआय) प्रणालीचा वापर करून थेट कंत्राटदारांच्या कामावर लक्ष ठेवायला सुरुवात केली असून, या डिजिटल यंत्रणेमुळे कंत्राटदाराच्या कामातील अनियमितता समोर आली आली. त्यामुळे सुमारे १५ कोटी रुपयांचा दंड कंत्राटदारांवर ठोठावण्यात आला आहे. नालेसफाईतील त्रुटी ओळखण्यासाठी वापरण्यात आलेल्या एआय तंत्रज्ञानामुळे पालिकेची मोठी आर्थिक बचत झाली आहे.

पावसाळ्यापूर्वी दरवर्षीप्रमाणे यंदाही मुंबईतील लहान-मोठ्या नाल्यांमधून गाळ काढण्याचे काम युद्धपातळीवर सुरू आहे. यासाठी निविदा प्रक्रियेद्वारे २३ कंत्राटदारांची निवड करण्यात आली आहे. पालिकेने प्रत्येक नालेसफाईच्या कामासाठी ३० सेकंदाचा व्हिडीओ आणि फोटो जमा करणे कंत्राटदारांना बंधनकारक केले आहे. हे सर्व व्हिडीओ जिओ-टॅगिंगसह अपलोड केले जात असून,

| नालेसफाई सध्यस्थिती ( मेट्रिक टन ) | | | |
|---|---|---|---|
| | एकूण | काम पूर्ण | टक्क्यांमध्ये |
| शहर | ३०३२४.९८ | ३१०५०.१४ | १०० टक्के |
| पूर्व उपनगरे | १२२५६०.३४ | १३१६१८.८२ | १०० टक्के |
| पश्चिम उपनगरे | २०५९६४.७८ | २२५६७८.३९ | १०० टक्के |
| छोटे नाले | ३९४७१८.९८ | ३११४८५.०० | ७८.९१ टक्के |
| मिठी नदी | २१४३१५.४९ | १६२९०२.८७ | ७६.०१ टक्के |
| एकूण | ९६७८८४.५७ | ८६२७३५.२२ | ८९.१४ टक्के |

याच आधारे कामाचे विश्लेषण एआय प्रणालीद्वारे होते. लहान नाल्यांमध्ये तर पूर्वी आणि नंतरचे सीसीटीव्ही चित्रीकरण अनिवार्य करण्यात आले आहे.

या आधुनिक प्रणालीमुळे ज्या कामांमध्ये जिओ-टॅगिंग नव्हते, तिथे गाळ उपसण्याचे दावे अमान्य करण्यात आले. तसेच, गाळ नेणाऱ्या गाड्यांची फेरे, त्याचा वेळ व प्रवासमार्ग यावरही एआय द्वारे लक्ष ठेवले जात आहे. यामुळे अनेक ठिकाणी अनियमितता उघडकीस आली. प्रशासनाच्या लक्षात आल्यावर कंत्राटदाराच्या हातसफाईवर कारवाई करण्यात आली आहे.

एआयच्या माध्यमातून नालेसफाईच्या कामातील आढळून आलेल्या विविध त्रुटींबाबत कंत्राटदारांवर दंडाची आकारणी करण्यात आली आहे. आतापर्यंत एकूण १५ कोटी पेक्षा जास्त दंड आकारण्यात आला असल्याचे सबंधित अधिकाऱ्याने सांगितले. दरम्यान एआयच्या साह्याने नालेसफाईच्या कामात सुसूत्रता, पारदर्शकता आणि उत्तरदायित्व वाढवण्याचा महापालिकेचा प्रयत्न असून, भविष्यात इतर नागरी प्रकल्पांमध्येही अशा प्रकारच्या तंत्रज्ञानाचा वापर केला जाण्याची शक्यता वर्तवली जात आहे.

# विमानतळ प्राधिकरणातील नवपाडा परिसरात नागरिकांमांना सुरुवात

## माजी नगरसेविका सुषमा राय यांचे प्रयत्न



प्रतिनिधी
■ मुंबई

अंधेरी नवपाडा येथील विमानतळ प्राधिकरणाच्या हद्दी मध्ये राहणाऱ्या वसाहतीमध्ये नागरी सुविधा उपलब्ध करून देण्यात लोकप्रतिनिधीना बऱ्याच अडचणी येत असतात त्या सोडवण्यात प्रयत्न केला तर ते काम शक्य असल्याचे मरोळ येथील माजी नगरसेविका सुषमा कमलेश राय यांनी दाखून दिले आहे. विमानतळ प्राधिकरणाच्या हद्दीतील नवपाडा परिसरात शासन व महानगरपालिका मार्फत सार्वजनिक काम करण्यासाठी पूर्व परवानगी आवश्यक असते.

शिवसेना उपनेते कमलेश राय यांच्या मार्गदर्शनाखाली माजी नगरसेविका सुषमा कमलेश राय यांनी विमानतळ प्राधिकरणामार्फत ना हरकत प्रमाणपत्र घेऊन वरिष्ठ विमानतळ अधिकाऱ्यांसह नवपाडा येथील वसाहतीत भेट दिली आणि परिसराची पाहणी करून सार्वजनिक कल्याणकारी कामांना सुरुवात केली. याबद्दल नवपाडा येथील लोकांनी माजी नगरसेविका सुषमा कमलेश राय यांचे आभार मानले.

Printed and Published by **Bhushan B.Mhatre** for Owner **Marik Media And Communication Pvt .Ltd.** at S.R.Publicatiinns ,Mohan Arjun Compound ,Godown No. 8,9 And 10 , Near Ghartan Pada ,Vaishali Nagar ,Last Bus Stop ,Dahisar (E ) ,Mumbai -400068 and Published From Marik Media And Communication Pvt .Ltd.,102, Shyam Sunder Sadan ,Sitaram Jadhav Marg, Lower Parel ,Mumbai 400013. Editor - **Deepak B. Mhatre**, E-mail vruttmanas1@ gmail.com ,telephone 2498546,24985609. Resident Editor - **Sham Deulkar**

As per PRB Act Editorial Responsibilities On Deepak B. Mhatre Nespaper Related Desputes Lies Under Jurisdiction of Mumbai Courts

Year - Thirty
Issu - 40
R.N.I. Registration No. - 65609/96

मुद्रक आणि प्रकाशक **भूषण भा. म्हात्रे** यांनी मालक **मरिक मीडिया अँड कम्युनिकेशन्स प्रा. लि.** साठी, एस. आर. पब्लिकेशन, मोहन अर्जुन कंपाऊंड, गोडाऊन नं. ८,९ आणि १०, घारटन पाडाजवळ, वैशालीनगर लास्ट बस स्टॉप, दहिसर (पूर्व), मुंबई - ४०० ०६८ येथे छापून मरिक मीडिया अँड कम्युनिकेशन्स प्रा. लि., १०२, श्याम सुंदर सदन, सीताराम जाधव मार्ग, लोअर परळ (पश्चिम), मुंबई - ४०० ०१३ येथून प्रकाशित केले. संपादक - **दीपक भा. म्हात्रे,** E-mail: vrittamanas1@gmail.com दूरध्वनी क्रमांक - २४९८५४६, २४९८५६०९ निवासी संपादक - **शाम देऊलकर**

पी. आर. बी. कायद्यानुसार संपादकीय जबाबदारी दीपक भा. म्हात्रे यांच्यावर राहील. सदर वृत्तपत्रासंबंधीच्या विवादित बाबी मुंबई न्यायालय क्षेत्रात येतील.

वर्ष- तीसावे
अंक - ४०
आर.एन.आय. रजिस्ट्रेशन क्र.- ६५६०९/९६

मुंबई: श्रावण महिन्याच्या शुभ मुहूर्तावर, गोरेगाव येथे "सकला हिंदू समाज" कडून एक भव्य कांवड यात्रा चे आयोजित करण्यात आले होते. या यात्रेचा समारोप राम मंदिर रोड रेल्वे स्टेशन लगत असलेल्या राम मंदिर देवस्थान येथे भोले बाबांना जल अर्पण करून करण्यात आला.यावेळी स्व. जयनाथ यादव प्रतिष्ठानने ग कावड्यांसाठी प्रसाद वाटपाचा कार्यक्रम आयोजित केला होता.श्रावण महिन्याच्या शुभ मुहूर्तावर शेकडो लोकांनी गोरेगाव राम मंदिरात जलाभिषेक घेतला. विविध भागातील शिव मंदिरांमध्ये जलाभिषेक केला गेला. यानिमित्ताने स्व. जयनाथ यादव प्रतिष्ठानच्या वतीने मनोज यादव यांच्या हस्ते भव्य प्रसाद भंडारा आयोजित करण्यात आला होता. यावेळी हजारो लोकांनी प्रसाद घेतला.



### राज्य मंत्रिमंडळ बैठकीत महत्वाचा निर्णय

# महिला अत्याचार प्रकरणे निकाली काढण्यासाठी गोंदिया, रत्नागिरी, वाशिम येथे विशेष न्यायालये

प्रतिनिधी
■ मुंबई

महिला अत्याचाराची प्रकरणे गतीने निकाली काढण्यासाठी गोंदिया, रत्नागिरी आणि वाशिम येथे विशेष न्यायालये स्थापन करण्यास आज झालेल्या मंत्रिमंडळ बैठकीत मान्यता देण्यात आली. बैठकीच्या अध्यक्षस्थानी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस होते.याशिवाय महिला बचत गटांच्या उत्पादनांसाठी १० जिल्ह्यांमध्ये 'उमेद मॉल',राज्यात 'मुख्यमंत्री समृद्ध पंचायतराज अभियान' राबविणार असे अनेक महत्वपूर्ण निर्णय या बैठकीत घेण्यात आले.



नव्याने स्थापन करण्यात येणाऱ्या या तीन न्यायालयांसाठी प्रत्येकी ५ नियमित पदे (१ जिल्हा व अतिरिक्त सत्र न्यायाधीश, १ लघुलेखक, १ अधीक्षक, १ वरिष्ठ लिपिक, १ कनिष्ठ लिपिक) व प्रत्येकी २ मनुष्यबळ सेवा (१ हवालदार, १ शिपाई) बाह्ययंत्रणेद्वारे उपलब्ध करून घेण्यास मान्यता देण्यात आली आहे. राज्यात महिलांवरील अत्याचाराची प्रकरणे त्वरेने निकाली काढण्यासाठी आतापर्यंत २७ ठिकाणी विशेष न्यायालये स्थापन करण्यात आली आहेत. या न्यायालयांमध्ये मोठ्या प्रमाणात प्रकरणे निकाली निघाली आहेत. या न्यायालयांची उपयुक्तता विचारात घेता अत्याचारांच्या घटनांमुळे पीडित महिलांना त्वरेने न्याय मिळण्यासाठी गोंदिया, रत्नागिरी आणि वाशिम या ठिकाणी देखील विशेष न्यायालये स्थापन करण्याचा निर्णय घेण्यात आला. या न्यायालयांसाठी २ कोटी ३९ लाख ७८ हजार रुपयांच्या खर्चाच्या तरतुदीस मंत्रिमंडळ बैठकीत मान्यता देण्यात आली.

ग्रामीण भागातील महिला बचत गटांच्या उत्पादनांना हक्काची बाजारपेठ उपलब्ध करून देण्यासाठी ग्रामविकास विभागाच्या 'उमेद-महाराष्ट्र राज्य ग्रामीण जीवनोन्नती अभियाना'अंतर्गत राज्यातील १० जिल्ह्यांमध्ये 'उमेद मॉल' (जिल्हा विक्री केंद्र) उभारण्यास आज झालेल्या मंत्रिमंडळ बैठकीत मंजुरी देण्यात आली. बैठकीच्या अध्यक्षस्थानी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस होते. योजनेसाठी एकूण २०० कोटी रुपयांचा निधी मंजूर करण्यात आला आहे.

### महिला बचत गटांच्या उत्पादनांसाठी १० जिल्ह्यांमध्ये 'उमेद मॉल'

ग्रामीण भागातील महिला बचत गटांच्या उत्पादनांना हक्काची बाजारपेठ उपलब्ध करून देण्यासाठी ग्रामविकास विभागाच्या 'उमेद-महाराष्ट्र राज्य ग्रामीण जीवनोन्नती अभियाना'अंतर्गत राज्यातील १० जिल्ह्यांमध्ये 'उमेद मॉल' (जिल्हा विक्री केंद्र) उभारण्यास आज झालेल्या मंत्रिमंडळ बैठकीत मंजुरी देण्यात आली. योजनेसाठी एकूण २०० कोटी रुपयांचा निधी मंजूर करण्यात आला आहे.ग्रामीण भागातील महिलांतील उद्यमशीलतेला चालना देण्यासाठी सुरू झालेल्या स्वयं सहाय्यता समूहांच्या (SHG) विविध उत्पादनांना स्थानिक आणि राष्ट्रीय बाजारपेठ मिळावी या उद्देशाने हे केंद्र उभारले जाणार आहे. पहिल्या टप्प्यात १० जिल्ह्यांमध्ये हे मॉल कार्यान्वित करण्यात येणार असून, नंतर टप्प्याटप्प्याने ही योजना इतर जिल्ह्यात विस्तारली जाणार आहे.

### काँग्रेसची खोचक टीका

# मंत्र्यांवर गोमूत्र शिंपडून त्यांना पवित्र करुन घ्या!

### कृषिमंत्री कोकाटे यांचा राजीनामा न घेणे हि मोठी असंवेदनशीलताच

प्रतिनिधी
■ मुंबई

राज्याचे कृषिमंत्री शेतकऱ्यांविरोधात विधान करतात, विधी मंडळात कामकाज सुरू असताना रम्मीचा गेम खेळतात आणि सरकार बेजबाबदार मंत्र्यांचा राजीनामा घेत नाही, कृषिमंत्री कोकाटे यांचा राजीनामा न घेणे म्हणजे सरकार शेतकऱ्यांच्या प्रती असंवेदनशील असल्याचे स्पष्ट झाले, असा आरोप काँग्रेस विधिमंडळ नेते विजय वडेट्टीवार यांनी केला आहे.



मुंबईत पत्रकार परिषदेला संबोधित करताना वडेट्टीवार म्हणाले, राज्याचे गृहराज्यमंत्री डान्सबार चालवतात, एका मंत्र्यांकडे पैश्याचा बॅगा सापडतात पण तरीही यांची पाठराखण जर करण्यात येत असेल तर या सर्व मंत्र्यांवर गोमूत्र शिंपडून त्यांना पवित्र करून घ्यावे. लाडकी बहिण म्हणायचे आणि बारमध्ये बहिणींना नाचवायचे असा किळसवाणा प्रकार महाराष्ट्राच्या राजकारणात कधी झाला नव्हता, अशी टीका विधिमंडळ नेते वडेट्टीवार यांनी केली. नागपूर मधील बार मध्ये अधिकारी फाईली घेऊन बसतात, गडचिरोलीचे ते अधिकारी असल्याची माहिती समोर येते. गडचिरोलीचे पालकमंत्री मुख्यमंत्री आहेत, असा कारभार सुरू असल्याची टीका वडेट्टीवार यांनी केली.

एकीकडे शेतकरी आत्महत्या करत आहे, कंत्राटदार आत्महत्या करत आहे बिल थकली आहेत. राज्यातील शेतकऱ्यांची बँकाकडे ३५ हजार कोटींची थकबाकी आहे. शेतकरी आता कर्ज घेऊ शकणार नाही, शेतकरी अडचणीत आला आहे पण सरकारला त्याचे देणेघेणे नाही. शक्तिपीठ महामार्गाला शेतकरी विरोध करत आहे, तरी त्या महामार्गासाठी सरकार पैसे द्यायला तयार आहे पण शेतकरी कर्जमाफी मागत आहे त्यासाठी सरकार तयार नाही, अशी टीका वडेट्टीवार यांनी केली.

महायुती सरकारमध्ये शीतयुद्ध सुरू आहे. बाहेरून दाखवायला सगळ सुरळीत आहे पण आतून प्रचंड असंतोष आहे. या सरकारमधील दोन पक्षांना सत्तेत टिकून रहायचे म्हणून तोंड दाबून मुका मार सहन करत आहे अशी टीका विधिमंडळ नेते विजय वडेट्टीवार यांनी केली.

# व्याघ्र संवर्धनात नागरिकांच्या व्यापक सहभागासाठी धोरण आखणार - मुख्यमंत्री फडणवीस

### जागतिक व्याघ्र दिनानिमित्त 'एशियाटिक बिग कॅट सोसायटी' राष्ट्रीय पुरस्कार प्रदान

प्रतिनिधी
■ मुंबई

महाराष्ट्रातील व्याघ्र संवर्धनाची वाटचाल देशात आदर्श ठरली आहे. राज्यात वन विभागाच्या प्रयत्नांमुळे वाघांची संख्या वाढली आहे. आज आपण केवळ व्याघ्रसंवर्धन करत नाही, तर वन पर्यटनाच्या माध्यमातून अर्थव्यवस्था घडवत आहोत. पुढील काळात व्याघ्र संवर्धनात नागरिकांचा व्यापक सहभाग वाढविण्यासाठी नवीन धोरण आखण्यात येईल, असे प्रतिपादन मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी केले.



जागतिक व्याघ्र दिनानिमित्त महाराष्ट्र वन विभाग व एशियाटिक बिग कॅट सोसायटीच्या वतीने आयोजित कार्यक्रमात मुख्यमंत्री फडणवीस बोलत होते. यावेळी महसूल मंत्री चंद्रशेखर बावनकुळे, जलसंपदा मंत्री गिरीश महाजन, वन विभागाचे अपर मुख्य सचिव मिलिंद म्हैसकर आदी उपस्थित होते.

महाराष्ट्र वन विभागाच्या वन्यजीव शाखेच्या वतीने निर्मित 'वाईल्ड ताडोबा' या माहितीपट ट्रेलरचे अनावरण मुख्यमंत्री फडणवीस यांच्या हस्ते झाले. तसेच एशियाटिक बिग कॅट सोसायटीच्यावतीने वन्यजीव संवर्धन आणि जागरूकता क्षेत्रात उत्कृष्ट कामगिरी करणाऱ्या प्रख्यात वन्यजीव चित्रपट निर्माते सुब्बिया नल्लामुथु यांना मुख्यमंत्री फडणवीस यांच्या हस्ते एशियाटिक बिग कॅट सोसायटी राष्ट्रीय पुरस्कार 2025 प्रदान करण्यात आला.

### 'वाईल्ड ताडोबा' माहितीपटामुळे ताडोबाचे सौंदर्य जागतिक पातळीवर पोहोचेल

महाराष्ट्रात वाघांची संख्या वाढवण्यासाठी जे प्रयत्न झाले, त्याचे कौतुक देशभर होत आहे. व्याघ्र संवर्धनाच्या क्षेत्रात महाराष्ट्र आघाडीवर आहे, याचा अभिमान वाटतो असे सांगून मुख्यमंत्री फडणवीस म्हणाले, "ताडोबा अंधारी व्याघ्र प्रकल्प आज राष्ट्रीयच नव्हे, तर आंतरराष्ट्रीय स्तरावर ओळख मिळवत आहे. देशभरातील पर्यटक आणि संशोधक येथे भेट देतात. परिणामी स्थानिकांना रोजगाराच्या संधी उपलब्ध होत असून त्यातून एक मोठी अर्थव्यवस्था निर्माण झाली आहे. ही जैवविविधतेची संपत्ती आता आपण जगासमोर मांडू शकतो. या प्रकल्पावर तयार केलेली 'वाईल्ड ताडोबा' ही चित्रफीत ताडोबाचं सौंदर्य आणि संवर्धनाचे कार्य जागतिक पातळीवर पोहोचवेल."

# मुंबादेवीत शिवसेनेकडून छत्री वाटप

प्रतिनिधी
■ मुंबई

मुंबादेवीत शिवसेनेकडून ज्येष्ठ नागरिकांचा सन्मान आणि छत्री वाटपाचा कार्यक्रम हाती घेण्यात आला होता. या कार्यक्रमाप्रसंगी असंख्य नागरिकांनी मोठ्या प्रमाणात गर्दी करून कार्यक्रमाची शोभा वाढवण्यात हातभार लावला.ज्येष्ठ नागरिकांचा सन्मान, शिवसेनेचा अभिमान! या ब्रिद वाक्याखाली मुंबादेवी विधानसभा वॉर्ड क्र. २२३ मध्ये विधानसभा संघटक रूपेश पाटील व महिला उपविभाग प्रमुख सौ. प्रिया रूपेश पाटील यांच्या माध्यमातून १५०० ज्येष्ठ नागरिकांचा यथोचित सन्मान आणि मोफत छत्री वाटप उपक्रम उत्साहात पार पडला. या उपक्रमास शिवसेना नेत्या मीनाताई कांबळी, शिवसेना प्रवक्त्या शायना एन. सी., विभागप्रमुख दिलीप नाईक, विधानसभा प्रमुख रेखा सुरणकर, शाखाप्रमुख उमेश माने, संतोष यादव, दत्ता मोहिते, मुंबादेवी विधानसभा युवासेना विभाग प्रमुख अभय म्हात्रे, शिवसेनेचे पदाधिकारी तसेच आपला रुपेश फाऊंडेशनचे सदस्य उपस्थित होते.



# उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्या वाढदिवसानिमित माता रमाबाई नगरात जनविश्वास सप्ताहाचे आयोजन

प्रतिनिधी
■ मुंबई

राज्याचे उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्या वाढदिवसानिमित राष्ट्रवादी काँग्रेसच्या सामाजिक न्याय विभाग मुंबई प्रदेशाच्या वतीने २२ ते ३० जुलैपर्यंत 'जनविश्वास सप्ताह' साजरा केला जात आहे. या पार्श्वभूमीवर मुंबईतील आंबेडकरी वस्त्यांत विविध उपक्रम राबवले जात आहेत. त्याचाच एक भाग म्हणून घाटकोपर येथील माता रमाबाई आंबेडकर नगरात आरोग्य शिबिर आयोजित करण्यात आले. यावेळी सामान्यांपासून ते पोलीस, कार्यक्रते, गरजू आदींनी याचा लाभ घेतला. बापू धुमाळे यांच्या मार्गदर्शनाखाली आयोजित केलेल्या या शिबिरामध्ये नागरिक, सर्वसामान्य , पोलीस , कष्टकरी यांनी उस्फुर्त प्रतिसाद देत आपल्या आरोग्याची मोफत तपासणी करून घेतली. हे शिबीर यशस्वी करण्यासाठी मुंबई सामाजिक न्याय विभागातील भाग्यश्री गायकवाड, रोहिणी खरात, दिपक भोसले, भीमराव बनसोडे, नामदेवराव अहिरे, श्रीकांत दोडके, विजय नायर, रमेश टपाल, आलम शेख यांचे योगदाना लाभले. यावेळी तालुका अध्यक्ष जंगम , वॉर्ड अध्यक्ष महेश नेम, सचिन धुमाळ यांनी भेट दिली अशी माहिती राष्ट्रवादी काँग्रेसचे सामाजिक न्याय विभाग मुंबई अध्यक्ष बापू धुमाळे यांनी दिली. हा कार्यक्रम विविध ठिकाणी ३० जुलैपर्यंत 'जनविश्वास सप्ताह' साजरा होत आहे.



# राष्ट्रीयकृत बँका वाचवण्यासाठी काँग्रेसचा पुढाकार : 1 ऑगस्ट रोजी काँग्रेसची बैठक

प्रतिनिधी
■ मुंबई

इंदिरा गांधी यांनी बँकांचे राष्ट्रीयकरण करून सर्वसामान्य जनतेला बँकांचे दरवाजे खुले केले. या ऐतिहासिक घटनेला आज ५६ वर्ष झाली. पण आता मात्र केंद्रातील भाजपा सरकारची धोरणे राष्ट्रीयकृत बँकांच्या हिताची नाहीत. राष्ट्रीयकृत बँका भांडवलदारांच्या दावणीला बांधण्याचा प्रयत्न सुरु आहे. बँकिंग क्षेत्रातील तज्ञ, सर्वसामान्य जनता व समविचारी संघटनांनी मोदी सरकारचा हा प्रयत्न हाणून पाडला पाहिजे. यासाठी काँग्रेसच्या पुढाकाराने प्रदेशाध्यक्ष हर्षवर्धन सपकाळ यांच्या उपस्थितीतो १ ऑगस्ट रोजी दुपारी ४ वाजता दादरच्या टिळक भवन येथे एका बैठकीचे आयोजन केले आहे, अशी माहिती बँकिंग क्षेत्रातील तज्ञ विश्वास उटगी यांनी दिली आहे.

या सभेला काँग्रेस प्रदेशाध्यक्ष हर्षवर्धन सपकाळ, माजी खासदार कुमार केतकर, विश्वास उटगी, संजीव चांदोरकर यांच्यासह बँकिंग क्षेत्रातील लोक उपस्थित राहणार आहेत असे विश्वास उटगी यांनी सांगितले. यासंदर्भातील सविस्तर माहिती देताना ते म्हणाले की, बँकांचे ताळेबंद सशक्त आहेत पण भारत सरकार व रिजर्व बँक, सार्वजनिक क्षेत्रातील मोठी बँक IDBI ची विक्री विदेशी बँकांना करीत आहे. अर्थ व्यवस्थेत बॅंकीग क्षेत्रात विदेशी भांडवलाचा प्रवेश हा राष्ट्रीय सुरक्षेचा मुद्दा आहे पण राष्ट्रीयकरण संपविणे ही या प्रक्रियेची सुरुवात आहे. १२ राष्ट्रीयकरण झालेल्या बॅंकांपैकी ५ बॅंकांना केंद्र सरकारच्या असेट मोनेटायझेशन पाइपलाइन मार्फत Disinvestment कार्यक्रम राबविण्यात येईल व या बॅंकांच्या खाजगीकरणाची सुरुवात होईल. यांची विक्री विदेशी भांडवलदारांना होणे हे जनतेला मान्य होणारे नाही. याला कडाडून विरोध करणे आवश्यक आहे. बँक कामगार संघटना हे काम करीत आहेत.

**मध्य रेल्वे**

मुंबई विभाग

**निविदा क्र. ०८/२०२५ दिनांक २५.०७.२०२५**
**साहित्य खरेदीकरीता**

भारताच्या राष्ट्रपतींसाठी आणि त्यांच्या वतीने वरिष्ठ विभागिय साहित्य व्यवस्थापक, मुंबई विभाग, छ.शि.म.ट., मुंबई द्वारे खालील बाबींसाठी इलेक्ट्रॉनिक निविदा मागवित आहेत. **अ. क्र.१, निविदा क्र.** ९२२४६३२३ सी, **वर्णन :** मच्छरदाणी फ्रेमसह धातूचा पलंग, **परी.** ३४१ नग **इसारा रककम:** १०८५१०.०० **उघडण्याचा दिनांक :** १४.०८.२०२५. **अ. क्र. २, निविदा क्र.** ९२२५५६९७ सी, **वर्णन :** हायड्रोलिक रि-रेलिंग उपकरणाचे डिझाईन, उत्पादन, पुरवठा, स्थापना, परीक्षण, कार्यान्वयन आणि प्रमाणीकरण, **परी.** ०१ संच **इसारा रककम:** १३६०००.०० **उघडण्याचा दिनांक :** ११.०८.२०२५. **टीप: १.** वरील निविदा आयआरईपीएस संकेतस्थळावर म्हणजेच www.ireps.gov.in. अपलोड केल्या आहेत. वरील ई-निविदांमध्ये सहभागी होऊ इच्छिणाऱ्या संस्थाना उपरोक्त संकेतस्थळावर इलेक्ट्रॉनिक पद्धतीने नोंदणी करण्याचा सल्ला देण्यात येत आहे. सदर ई-निविदांकरीता प्रत्यक्ष प्रस्ताव स्वीकारले जाणार नाहीत. **२.** बोलीदारांना आयआरईपीएसद्वारे इरठेचा ऑनलाइन भरणा करावा लागेल. **३.** या निविदांच्या तपशीलांसाठी आणि इतर नियमन अटींसाठी, कृपया www.ireps.gov.in संकेतस्थळाला भेट द्या. **४.** कोणत्याही प्रश्नांसाठी, कृपया वरिष्ठ विभागीय साहित्य व्यवस्थापक, मध्य रेल्वे, डीआरएम कार्यालय, मुंबई सीएसएमटी-४००००१ ह्यांच्याशी संपर्क करा. ई-मेल: srdmm@bb.railnet.gov.in **टीप: सदर निविदा सार्वजनिक प्रापण धोरण आदेश २०१७ / दिनांकित १५.०६.२०१७ अनुसार मान्यताप्राप्त आहे.**

SUN 311 **वरिष्ठ विभागिय साहित्य व्यवस्थापक**

असुरक्षित तथा अनाधिकृत रूप से रेल लाइन के पास कार्य करना दंडनीय अपराध है

**बृहन्मुंबई विद्युत पुरवठा आणि परिवहन उपक्रम**
(बृहन्मुंबई महानगरपालिका)
परिवहन अभियांत्रिकी विभाग

**श्री. कुणाल भास्कर आग्रे, स्वच्छक (मो.वा.), परि क्र.३२७६१३/५५-१०, मरोळ आगार** यांना या जाहिरातीद्वारे असे सूचित करण्यात येत आहे की, सप्रअ (आ-३/४) यांनी दि.१३/६/२५ रोजी पाठविलेल्या अहवालानुसार कामगार **दि.२०/२/२५ ते दि.१३/६/२५ (अहवाल दिनांकापर्यंत)** परवानगीशिवाय, खाती रजा शिल्लक नसतानादेखील सतत पंधरा दिवसांपेक्षा जास्त दिवस उपक्रमाला कोणत्याही माध्यमातून न कळविता कामावरुन गैरहजर राहिलेले आहेत. आपल्या या कृत्याचा समावेश गैरवर्तणूकीत होत असल्याने आपल्याविरुद्ध स्थायी आदेशानुसार खालील गैरवर्तणूकीचे आरोप ठेवण्यात आलेले आहेत.

**स्थायी आदेश क्र. २० (एफ) -** **परवानगीशिवाय सतत पंधरा दिवसांपेक्षा जास्त दिवस कामावरून गैरहजर राहाणे.**

**स्थायी आदेश क्र. २० (के) -** **कोणत्याही विभागाच्या कामासाठी आणि सुव्यवस्थेसाठी केलेले नियम, विनियम (रेग्युलेशन) व आज्ञा यांचा भंग करणे. (परवानगीशिवाय न कळविता कामावरून गैरहजर राहणे-पुनर्चक्रमुद्रांकित परिपत्रक क्रमांक प्रअपअ/आअप/१९०४८/११९१/९६, दि. १९/१२/९६.)**

सदर गैरवर्तणूकीसाठी आपल्याविरोधात दाखल केलेले **आरोपपत्र क्र. सीएच / १३१/१२९५/ २५,** दि. १६/६/२५ हे आरोपपत्र मरोल आगारात पाठविले असता, आपण दि.२०/२/२५ पासून कामावर गैरहजर असल्याचे दि. २६/६/२५ रोजीच्या विभागीय पत्रानुसार कळविले होते. त्यामुळे आपल्या सेवाभिलेखात नोंद केलेल्या स्थानिक तसेच गांवच्या पत्त्यावर डाकनोंद पत्राद्वारे आरोपपत्र पाकीट दि.७/७/२५ रोजी पाठविण्यात आले होते व त्यानुसार आपणांस दि. २३/७/२५ रोजी स. ११.०० वा. खातेनिहाय चौकशीस उपस्थित राहण्याबाबत कळविण्यात आले होते. सदर दोन्ही पत्त्यावरील पत्रपाकीट उपक्रमास परत प्राप्त झालेली आहेत.

यास्तव या जाहिरातीद्वारे आपणांस एक शेवटची संधी म्हणून असे कळविण्यात येत आहे की, तुमच्याविरुद्धच्या सदर आरोपपत्राची खातेनिहाय चौकशी आता **मंगळवार, दि. ५/८/२५ रोजी सकाळी १०.३० वाजता** कामगार अधिकारी परिवहन यांचे कार्यालय, दादर कार्यशाळा, टिळक मार्ग, दादर, मुंबई- १४ येथे होणार आहे. सदर चौकशीत तुम्हाला तुमच्याविरुद्ध लावलेल्या वरील आरोपाबाबत खुलासा करण्याची संधी देण्यात येईल.

चौकशीचे कामकाज चालू असताना मुंबई औद्योगिक संबंध अधिनियम १९४६ च्या कलम ३० अनुसार प्रतिनिधीद्वारे अथवा एम.आर.टी.यु आणि पी.यु.एल.पी. नियम १९७५ च्या नियम क्र.२० सह वाचावयाच्या, एम. आर.टी.यु आणि पी.यु.एल.पी. अधिनियम १९७१ च्या कलम २२ अनुसार या उपक्रमात कार्यशील असलेल्या व श्रमिक संघ अधिनियम १९२६ साली नोंदविण्यात आलेल्या कामगार संघटनेचे तुम्ही सभासद असल्यास अशा कामगार संघटनेच्या अधिकाऱ्याद्वारे अथवा उपक्रमातील कर्मचाऱ्यामधून तुम्ही निवडलेल्या कोणत्याही कर्मचाऱ्याद्वारे स्वतःचा बचाव करण्याची परवानगी मिळेल.

सदर चौकशीस आपण अनुपस्थित राहिल्यास आपणास या चौकशीत स्वारस्य नाही, असे समजून तुमच्या अनुपस्थितीत चौकशीचे कामकाज '**एकतर्फी**' चालविले जाईल व चौकशीत घेतलेला निर्णय आपणांस बंधनकारक राहील, याची नोंद घ्यावी.

**बृ.मुं.वि.पु. आणि प. उपक्रमाकरीता**
**स्वाक्षरी/-**
**(राहुल हे. परमार )**
**उप कामगार अधिकारी (प.अ.)**
**सक्षम अधिकारी**

**ज.सं.अ./का.अ.प./४६/२०२५.**



**मुंबई: दहिसर पूर्व विधानसभा उद्धव ठाकरे सेनेच्या शाखा क्र.२ तर्फे पक्षप्रमुख उद्धव ठाकरे यांच्या वाढदिवसानिमित्त सोमवारी विविध सामाजिक उपक्रम आयोजित करण्यात आले होते. सर्व पदाधिकारी आणि ज्येष्ठ नागरिकांना छत्री वाटप ,गरजूं विद्यार्थ्यांना वह्या व गरीब रुग्णाना फळ वाटप करण्यात आले . या प्रसंगी शिवसेनेचे उपनेते माजी आमदार विनोद घोसाळकर, विभाग प्रमुख उद्देश पाटेकर, विधानसभा प्रमुख बाळकृष्ण ढमाले, उपविभाग प्रमुख उदय सुर्वे शाखा प्रमुख उत्तम परब, शाखा संघटीका दिपाली आवारी, पदाधिकारी हेमा तांबट, शशिकांत मोरे, सुप्रिया शिर्के , गजानन गावडे, राजेंद्र गावडे उपस्थित होते.**

# पोस्टाच्या आयटी प्रणाली 2.0 चा 4 ऑगस्टला होणार शुभारंभ

### मुंबई सेंट्रल अंतर्गत टपाल कार्यालये होणार हायटेक

प्रतिनिधी
■ मुंबई

भारतीय डाक विभाग अत्यंत अभिमानाने जाहिर करत आहे की पुढच्या पिढीतील APT आयटी प्रणालीचा शुभारंभ होत आहे. जो डिजिटल उत्कृष्टतेकडे आणि राष्ट्रनिर्मितीकडे वाटचाल करणारा महत्त्वपूर्ण टप्पा ठरेल, याच परिवर्तनशील उपक्रमाचा भाग म्हणून, ही अद्ययावत प्रणाली मुंबई सेंट्रल प्रधान डाकघर व त्याअंतर्गत येणाऱ्या उपडाकघरांमध्ये ०४.०८.२०२५ रोजी अंमलात आणली जाणार आहे.

या प्रगत डिजिटल प्रणालीकडे सुरळीत आणि सुरक्षित संक्रमण घडवून आणण्यासाठी २ऑगस्ट रोजी नियोजित डाउनटाइम ठेवण्यात आलेला आहे. त्यामुळे २ ऑगस्ट रोजी कोणतेही सार्वजनिक व्यवहार टपाल कार्यालयांमध्ये स्वीकारले जाणार नाहीत. ही सेवा तात्पुरती स्थगित करणे आवश्यक आहे कारण डेटा स्थलांतरण, प्रणाली पडताळणी आणि कॉन्फिगरेशन प्रक्रिया यामध्ये वेळ लागणार आहे, जेणेकरून नवीन प्रणाली प्रभावीपणे आणि निर्विघ्नपणे सुरु होईल. APT प्रणालीचा उद्देश अधिक चांगला वापरकर्ता अनुभव, जलद सेवा पुरवठा आणि ग्राहक-अनुकूल इंटरफेस प्रदान करण्याचा आहे, ज्यामुळे आपली कार्यपद्धती अधिक बुद्धिमान, कार्यक्षम आणि भविष्यातील गरजांसाठी तयार होईल. ग्राहकांनी कृपया आपल्या भेटींचे नियोजन अगोदरच करावे आणि या तात्पुरत्या व्यत्ययाबद्दल समजूत दाखवावी, असे आवाहन प्रवर अधीक्षक, टपाल कार्यालय,मुंबई पश्चिम विभाग डाक विभाग यांनी केले आहे.

**मुंबई इमारत दुरुस्ती व पुनर्रचना मंडळ**
**(म्हाडाचा घटक)**

म्हाडा MHADA

**ई-निविदा सूचना ०६ / २०२५-२०२६**
**Main Portal: https://mahatenders.gov.in,**
**MHADA Portal :https://mhada.gov.in**

कार्यकारी अभियंता (फ/उत्तर) विभाग, मुंबई इमारत दुरुस्ती व पुनर्रचना मंडळ, म्हाडाचा विभागीय घटक, सोनावाला बिल्डींग, नं.८, शंकर आबाजी पालव मार्ग, दादर (पूर्व), मुंबई ४०००१४, यांचेकडे मुंबई शहर जिल्हा अंतर्गत Deputy District Registar यांचेकडे उचित वर्गात नोंदणीकृत असलेल्या म्हाडा नोंदणीकृत पात्र मजुर सहकारी संस्थांकडुन एकुण ०१ कामाकरीता बी - १ (Percentage Rate) नमुन्यातील ई-निविदा प्रणालीद्वारे (ऑनलाईन) निविदा मागविण्यात येत आहेत. निविदा कागदपत्र शासनाच्या संकेत स्थळावर https://mahatenders.gov.in उपलब्ध असतील. सदर निविदेचे वेळापत्रक खालीलप्रमाणे आहे.

निविदा विक्री आणि स्विकृती दि. ३०/०७/२०२५ रोजी सकाळी १०:३० वाजता सुरु होऊन दि. १३/०८/२०२५ रोजी संध्याकाळी ०४ वाजता बंद होईल. तांत्रिक बोली दि. १४/०८/२०२५ रोजी दुपारी ४:०० नंतर उघडण्यात येतील. तसेच पात्र निविदाची आर्थिक बोली दि. १५/०८/२०२५ रोजी सकाळी १०.३० नंतर उघडण्यात येतील.

सक्षम प्राधिकारी यांनी एक किंवा सर्व निविदा कोणतेही कारण न देता नाकारण्याचा अधिकार राखुन ठेवले आहेत. अट असलेली निविदा स्विकारली जाणार नाही.

टिप: १ विस्तृत ई-निविदा सुचना उपरोक्त संकेतस्थळावर उपलब्ध असेल.
टिपः २ निविदा सुचनेबाबत शुध्दिपत्रक / बदल असल्यास फक्त संकेतस्थळावर प्रकाशित केले जातील.

**सही/-**
**कार्यकारी अभियंता फ/ उत्तर विभाग**
**मुंबई इमारत दुरुस्ती व पुनर्रचना मंडळ**

CPRO/A/617

म्हाडा - गृहनिर्मान क्षेत्रातील देशातील अग्रगण्य संस्था

Follow us : mhadaofficial

**पनवेल महानगरपालिका**
**शहर अभियंता विभाग**
कार्यालय : २७४५८०४०/४९/४२ फॅक्स नं. : ०२२-२७४५२२३३
Email : panvelcorporation@gmail.com

निविदा सुचना क्र.पमपा/बांधकाम/५८२५/प्र.क्र.०१/२६७६/२०२५ दिनांक : २९/०७/२०२५

**फेर ई-निविदा सुचना**

आयुक्त, पनवेल महानगरपालिका खालील नमूद कामाकरीता सार्वजनिक बांधकाम विभाग, केंद्रीय सार्वजनिक बांधकाम विभाग, महाराष्ट्र जीवन प्राधिकरण, सिडको इत्यादी शासकीय / निम शासकीय (Central Government / State Government / Government under taking ) विभागात खालील कामासाठी नोंदणीकृत पात्र अनुभवी ठेकेदाराकडून बी-१ शतमान पध्दतीनुसार फेर ई-निविदा (2nd Call) मागवित आहेत.

| अ. क्र. | निविदा क्र. | कामाचे नाव | निविदा रक्कम रु. (Without GST) |
|---|---|---|---|
| १ | PMC/CE/ ३६ / २०२५-२६ | पनवेल महानगरपालिका हद्दीतील तक्का गावामधील अंतर्गत रस्ते / गल्ली कॉंक्रीटीकरण करणे. ( Rnd Call) | ९२,०२,२१०/- |

या कामाच्या ई- निविदे बाबतची माहिती शासनाच्या 'http://mahatenders.gov.in या संकेतस्थळावर दि.३१/०७/२०२५ रोजी प्रसिध्द करण्यात येईल. संबंधित निविदाधारकांनी याची नोंद घ्यावी.

जा.क्र. पमपा / जनसंपर्क./३१२५/प्र.क्र.३६९ / ३७७/२०२५
दिनांक :- २९/०७/२०२५
संदर्भ :- जा.क्र. पमपा/बांधकाम/८५२५/प्र.क्र.०१/२६७६/२०२५
दिनांक:- २९/०७/२०२५ रोजीचे पत्रान्वये

**सही/-**
**अतिरिक्त आयुक्त - I**
**पनवेल महानगरपालिका**

मैत्री हे प्रेमाचे सर्वात शुद्ध रुप आहे. जिथे कुठलीही अट नसते, कुठलीही मर्यादा नसते. मैत्री हे मानवी जीवनातील सर्वात निर्मळ नाते आहे.



- आचार्य रजनीश (ओशो)

वृत्तमानस
मुंबई, बुधवार, ३० जुलै २०२५

# गुप्ततेची काळजी घेऊया

हवामान खात्याने पावसाचा इशारा दिला की तो खोटा ठरवत चक्क ऊन पडते हे कायम पाहण्यात येते. आता हवामान अंदाजमध्ये देशाने उत्तम प्रगती केली असून ती जगभरामध्ये असलेल्या अनेक मोठ्या देशाच्या देशांच्या यादीत समाविष्ट होऊ शकते. स्थानिक पातळीवरील हवामानाचा अचूक अंदाज वर्तविण्यासाठी 'इंडियन इन्स्टिट्यूट ऑफ ट्रॉपिकाल मीटिअरॉलजी'ने 'भारत फोरकास्ट' ही नवी प्रणाली विकसित केली आहे., जी उच्च-रिझोल्यूशन हवामान अंदाज देण्यासाठी सक्षम आहे. यामुळे, अतिवृष्टी आणि चक्रीवादळांसारख्या नैसर्गिक आपत्तींचा अंदाज वर्तवण्यात अधिक अचूकता येईल, ज्यामुळे जीवित आणि वित्तहानी कमी होण्यास मदत करू शकते असा अंदाज आहे. भारतात हवामानाचा अचूक अंदाज व्यक्त करणे अनेकदा कठीण असते. भारताच्या भौगोलिक परिस्थितीमध्ये पाऊस, वादळाचा अचूक अंदाज बांधता येत नाही. आधीच्या प्रणालींना विशिष्ट क्षेत्रासाठी अंदाज तयार करायला 12-14 तास लागत होते, पण आता 'मिशन मौसम' अंतर्गत फक्त 4-6 तासांमध्ये अचूक अंदाज वर्तवता येईल असे सांगितले जाते. विशेष म्हणजे ही प्रणाली सामान्य नागरिकांपासून शेतकऱ्यांपर्यंत सर्वांसाठी उपयुक्त ठरणार आहे. नवी प्रणाली यशस्वीपणे समाविष्ट केल्यामुळे, भारत हा रिअल टाइममध्ये उच्च रिझोल्यूशनवर जागतिक हवामान मॉडेल चालवणारा एकमेव देश ठरला आहे. ही प्रणाली 2022 पासून चाचणी टप्प्यावर होती आणि आता ती पूर्णतः कार्यरत झाली आहे. भारतीय हवामान विभागाचा अंदाज हा हवामानाच्या अंदाजाचा अधिकृत स्रोत समजला जातो. याशिवाय कृषी विद्यापीठांच्या परिसरात हवामान केंद्रे स्थापन केलेली असतात. तिथेही हवामानाचे अंदाज व्यक्त केले जातात. स्कायमेट ही हवामानाचा अंदाज देणारी खासगी संस्था आहे. भारतीय हवामान विभाग आणि स्कायमेट यांनी वर्तवलेल्या अंदाजाची आपल्याकडे मोठ्या प्रमाणावर चर्चा होत असते. हवामानाचा संबंध प्रत्येक माणसाच्या जीवनाशी असतो. त्याचा प्रत्येकावर सकारात्मक आणि नकारात्मक परिणाम होतो. खराब हवामानामुळे कोणतीही व्यक्ती वैयक्तिकरित्या आजारी पडू संपूर्ण जगाच्या अर्थव्यवस्थेवर त्याचे अल्पकालीन आणि दीर्घकालीन परिणाम होतात. हवामानातील बदल थांबवता येत नाही. पण हवामानाचा अंदाज घेऊन त्याहून होणारे नुकसान टाळता येते. तसंच पीक निवड, व्यवसाय, प्रवासाचं नियोजन व इतर नियोजन त्यानुसार शक्य आहे. हवामानाचा अंदाज घेण्यासाठी काळानुरुप आधुनिक हवामान प्रयोगशाळा असणं आवश्यक आहे. यासाठी भारतीय हवामान विभागाची स्थापना करण्यात आलीय. 15 जानेवारी 1875 रोजी कोलकाता इथं भारतीय हवामान विभागाची स्थापना झाली होती. त्याला यंदा 150 वर्षे पूर्ण झाली हा सुद्धा एक योग मानावा लागेल. हवामान खात्याचा इतिहास खरोखरच मनोरंजक आहे, असे म्हणायला नाही. याचे कारण म्हणजे जेव्हा एखादी गोष्ट नव्याने स्थापित करण्याची संकल्पना पुढे येते, त्यावेळेस त्या विषयातील तज्ञांच्या वारंवार बैठका होतात, तज्ज्ञांचे मार्गदर्शन आणि अभिप्राय मागविले जातात. त्यांनतर त्याचा प्राथमिक आराखडा आणि आकृती बंध तयार करुन त्याला अंतिम स्वरुप दिले जाते. एवढ्या सर्व प्रक्रियेतून गेल्यानंतर त्या संस्थेच्या उदय होतो. म्हणूनच भारतीय हवामान संस्थेचा इतिहास मनोरंजक आहे, असे म्हणावे लागते. ब्रिटिश ईस्ट इंडिया कंपनीचे विल्यम पेट्री नावाचे एक अधिकारी होते. या अधिकाऱ्याने स्वतःच्या खर्चाने आणि प्रयासाने चेन्नई येथे एक खाजगी खगोलशास्त्रीय वेधशाळा उभारली होती. ती आपल्या निवृत्तीनंतर त्यांनी 1789 साली कंपनीच्या स्वाधीन केली. तिचे 1792 साली भारतातील पहिल्या वेधशाळेत रूपांतर झाले. हवामानाच्या नोंदी तेथे 1796 मध्ये सुरू झाल्या. खगोलशास्त्रीय उपकरणे ठेवण्यासाठी तेथे जे स्तंभ उभे केले होते ते आजही सुस्थितीत आहेत. त्यानंतरच्या काळात 1828 साली कंपनी सरकाने मुंबईत कुलाबा येथे, 1829 साली सर्व्हे ऑफ इंडियाने त्याच्या कोलकत्यातील पार्क स्ट्रीटवरील कार्यालयाच्या आवारात, आणि 1836 Hdfc त्रावणकोरच्या महाराजांनी तिरुवनंतपुरम येथे वेधशाळा उभारल्या. ह्या ठिकाणी केलेल्या पावसाच्या आणि तापमानाच्या प्राचीन नोंदी आज हवामानशास्त्रज्ञांना हवामान बदलाचे संशोधन करण्यासाठी उपलब्ध आहेत. भारतातील वेधशाळांत स्टीवनसन स्क्रीन 1921 साली प्रथम वापरात आले. यापूर्वी वेधशाळेच्या आवारात अक्षरशः एक झोपडी असायची. तिच्या छपराखाली तापमापक बसवलेले असायचे आणि हवामानाचे निरीक्षक झोपडीच्या आत शिरून तापमानाच्या नोंदी करायचे. आजच्या काळी स्टीवनसन स्क्रीन जे काही काम करते म्हणजे तापमापकाचे उन्हापावसापासून संरक्षण करणे आणि त्याच्याभोवती हवा खेळती ठेवणे, ते सर्व ही झोपडी करायची. गंमत ही की, हल्ली चीनचा भाग असलेल्या हाँगकाँग येथील वेधशाळेत ब्रिटिश राजवटीपासून चालत आलेली अशी एक झोपडी अजूनही उपयोगात आहे. मागील दीड-दोन शतकात जग बदलले आहे. पृथ्वीचे हवामान बदलले आहे. त्याबरोबर हवामानशास्त्र आणि हवामानशास्त्रज्ञांच्या कार्यपद्धती बदलत गेल्या आहेत. 2047 चं उद्दिष्ट गाठण्यासाठी भारतीय हवामान विभाग काय योगदान देऊ शकतो हे पाहण्याची वेळ आली आहे. संभाव्य हानी टाळून फायदे वाढवत भारतीय अर्थव्यवस्थेला सर्वोच्च स्थानी नेण्यासाठी भारतीय हवामान विभागाच्या भूमिकेवर सरकारने आता विशेष लक्ष दिले आहे ही समाधानाची बाब मानावी लागेल. नवीन प्रणाली ही खूप फायदेशीर ठरू शकते. यापूर्वीची हवामान प्रणाली 12 किलोमीटरच्या क्षेत्रातला अंदाज वर्तवू शकत होती. पण हाय रिझोल्युशन असणारी ही नवीन प्रणाली सहा किलोमीटरच्या क्षेत्रापर्यंत हवामानाचा अंदाज अधिक अचूकपणे वर्तवू शकेल. अगदी लहान भागांमध्ये हवामानात होणारे बदल यामुळे अधिक स्पष्टपणे समजू शकतील. स्थानिक पातळीवर पंचायत किंवा काही गावांसाठीचा हवामानाचा अंदाजही त्यामुळे वर्तवता येईल. देशभरातल्या 40 डॉप्लर रडारकडून मिळणारा डेटा या बीएफएस मॉडेलसाठी वापरला जाईल. रडारची ही संख्या हळूहळू वाढवत 100 पर्यंत नेण्याचीही योजना आहे. या प्रणालीमुळे शेतीसाठी अधिक अचूक हवामान अंदाज वर्तवण्यात आणि पिकांचे नुकसान टाळण्यास मदत मिळू शकेल. अतिवृष्टी आणि चक्रीवादळ यासारख्या अतितीव्र हवामान संकटाचा अचूक अंदाज मांडता येईल ज्यामुळे आपत्ती व्यवस्थापन अधिक प्रभावीपणे करता येईल आणि जीवितहानी टाळता येईल. मुळात भारताची ही हवामान अंदाज प्रणाली अशा काळात सुरू होत आहे, जेव्हा हवामान अधिक अनिश्चित होत चालले आहे आणि हवामान बदलातील तीव्रता वाढत आहे. या नवीन अंदाज प्रणालीमुळे अंदाजामध्ये 30 टक्के सुधारणा होईल. हवामान बदलाच्या परिणामांना सामोरे जाण्यासाठी हे अत्यावश्यक आहे. बीएफएस 2022 पासून प्रायोगिक तत्वावर कार्यरत आहे आणि मंत्रालयाच्या माहितीनुसार या प्रणालीनुसार अतिवृष्टीच्या घटनांचे अंदाज देण्यात 30 टक्के सुधारणा झाली आहे याशिवाय, चक्रीवादळांचा मार्ग आणि तीव्रतेचा अंदाज देण्यातही ही प्रणाली अधिक अचूक ठरली आहे. भविष्यात शेती, ऊर्जा, स्वास्थ्य, जलसंसाधन, वायूप्रदूषण, अशा विविध क्षेत्रांत हवामानशास्त्राचा मोठा सहभाग राहणार आहे. या संभाव्य आव्हानांना सामोरे जायला हवामानशास्त्र सज्ज असल्याचे चित्र आहे. एक गोष्ट मात्र फारशी बदललेली नाही. हवामानाचे अंदाज पूर्वी चुकायचे, तसे ते आताही चुकतात. कारण हे की, भविष्य जाणण्याची क्षमता मानवाला मुळात दिलेली नाही. विज्ञान आणि तंत्रज्ञान प्रगती करत राहिले तरी निसर्गाने गुप्त ठेवलेली सर्व रहस्ये उलगडणे अजून दूरचे आहे.

# वाघ... केवळ शिकारी नव्हे, तर जैवश्रृंखलेचा श्वास!

**भारतीय संस्कृतीत वाघ हे केवळ वन्य प्राणी नाही, तर सामर्थ्य, शौर्य आणि पर्यावरणीय संतुलनाचे प्रतीक मानले गेले आहे. देवी दुर्गेच्या वाहनापासून ते छत्रपती शिवाजी महाराजांच्या तोफांवरील कोरीव वाघापर्यंत याचा प्रभाव स्पष्टपणे दिसतो. याच वाघाच्या संवर्धनासाठी दरवर्षी २९ जुलै रोजी जागतिक व्याघ्र दिन साजरा केला जातो – एक दिवस केवळ प्राण्यांसाठी नाही, तर आपल्याच संवेदना जागवणारा.**



**युवराज पाटील**

**वाघ हा** अन्नसाखळीतील सर्वोच्च शिकारी असला, तरी त्याचे अस्तित्व म्हणजे संपूर्ण जैवविविधतेचे आरोग्य. एक वाघ सुमारे ५० ते १०० चौ.किमी परिसर व्यापतो आणि त्या अधिवासातील अनेक प्रजाती, झाडे, जलस्रोत यांचे संरक्षणही नकळत घडते. म्हणूनच म्हटले जाते – वाघ वाचला, तर जंगल वाचेल आणि जंगल वाचले, तर माणसाचे आयुष्यही सुरक्षित राहील. एकेकाळी भारतात ४० हजार वाघ होते, परंतु अविचारी शिकारी व जंगलतोडीमुळे १९७२ पर्यंत केवळ १,४०० इतकी संख्या उरली. या घटलेल्या संख्येच्या पार्श्वभूमीवर 'प्रोजेक्ट टायगर' ही ऐतिहासिक मोहीम सुरू झाली आणि आज भारतात पुन्हा ३,१६७ वाघ अस्तित्वात आहेत – जगातील सर्वाधिक!

महाराष्ट्रातील वाघ संवर्धनात जळगाव जिल्ह्याचाही वाटा वाढतो आहे. विशेषतः यावल प्रादेशिक वनविभागात २०११ नंतर पुन्हा वाघ दाखल झाला. मेळघाटातून वाघ वाघदऱ्या, वढोदा रेंजमार्गे स्थलांतर करून यावलच्या जंगलात येतो, हे आता संशोधनातून सिद्ध झाले आहे. २०२४ मध्ये ट्रॅप कॅमेऱ्यात स्पष्टपणे वाघाचे दृश्य नोंदवले गेले. २०२५ मध्ये गौताळा-ऑट्रामघाट परिसरातही अशाच प्रकारच्या वाघाच्या उपस्थितीच्या बातम्या मिळाल्या. यावल विभागाचे सहाय्यक वनसंरक्षक समाधान पाटील यांच्या माहितीनुसार सध्या यावल परिसरात दोन वाघ ट्रांझिट अवस्थेत आहेत, तर मुक्ताईनगर भागात 'बनाना टायगर' म्हणून ओळखला जाणारा वाघ अधूनमधून दिसून येतो. त्याचप्रमाणे पाल जंगल सफारी मार्गावर वाघाच्या पावलांचे चिन्हही अलीकडेच आढळले आहेत आणि जंगल सफारी लवकरच सुरु होणार असल्याचे संकेत मिळाले आहेत.

या साऱ्या घडामोडींच्या पार्श्वभूमीवर, यावल प्रादेशिक वनविभागात १२ मे २०२४ रोजी बुद्ध पौर्णिमेच्या लख्ख चांदण्यात पार पडलेली वन्यप्राणी गणना ही एक वेगळाच अनुभव देणारी ठरली. यामध्ये चोपडा, वैजापूर, अडावद, देवझिरी, यावल (पूर्व-पश्चिम), आणि रावेर अशा सातही वनक्षेत्रात एकूण ३९ मचानींवर प्राणीगणना झाली. ८० निसर्गप्रेमींनी सहभाग घेतला आणि एकूण ५८४ वन्य प्राण्यांची नोंद झाली. यामध्ये निलगाय, चिंकारा, भेकर, सांबर, चौशिंगा, काळवीट यांसारखे शाकाहारी, तसेच बिबट, लांडगा, कोल्हा, रानमांजर, तरस, अस्वल यांसारखे शिकारी प्राणी दिसून आले. विशेष म्हणजे रावेर वनक्षेत्रात एक वाघ आणि चार बिबटांचे प्रत्यक्ष दर्शन झाले. हे सर्व प्राणी वाघाच्या नैसर्गिक अधिवासात सहअस्तित्व करणारे आहेत, म्हणूनच ही प्रजाती साखळी वाघाच्या अस्तित्वाला पूरक ठरते.

या संपूर्ण उपक्रमाचे यश हे केवळ वनविभागाचे नसून संपूर्ण जिल्ह्याचे आहे. जिल्हा प्रशासनाचे सहकार्य, निसर्गप्रेमींचा उत्साह, आणि श्रीमती निनू सोमराज (म. वनसंरक्षक), जमीर शेख (उपवनसंरक्षक), समाधान पाटील (सहायक वनसंरक्षक), तसेच चोख प्रशासन व मैदानातील वन अधिकारी व कर्मचाऱ्यांचे समन्वयाने हे शक्य झाले. वाघ वाचवणे म्हणजे केवळ एक प्रजाती वाचवणे नव्हे, तर हवामान, पाणी, माती, जंगल आणि पर्यायाने आपलेच भविष्य सुरक्षित ठेवणे होय. म्हणूनच आपण सर्वांनी जंगलतोड रोखणे, शिकारीविरोधात आवाज उठवणे, पर्यावरण शिक्षण वाढवणे आणि जबाबदार पर्यटनाला प्रोत्साहन देणे या गोष्टींकडे गांभीर्याने पाहिले पाहिजे. आजच्या दिवशी, जागतिक व्याघ्र दिनाच्या निमित्ताने आपण संकल्प करूया –"वाघ वाचवा, जंगल वाचवा, जीवन वाचवा!"

**- लेखक जिल्हा माहिती अधिकारी, जळगाव**

# उंच गणेशमुर्त्यांचे विसर्जन व्यवस्थितच व्हायला हवे !

**सार्वजनिक** गणेशमूर्ती विसर्जनाबाबत अनेक दिवसांपासून प्रलंबित असलेला निर्णय उच्च न्यायालयाने अखेर दिला आहे. नवीन निर्णयानुसार ६ फुटांपर्यन्तच्या गणेशमूर्तींचे विसर्जन कृत्रिम तलावांत करणे बंधनकारक असणार आहे, तर ६ फुटांपेक्षा अधिक उंची असलेल्या गणेशमूर्त्या समुद्र आणि नैसर्गिक जलस्रोतांत विसर्जित करण्याची परवानगी देण्यात आली आहे. गणेशोत्सव हा मुंबईतील सर्वांत मोठा उत्सव. गणेशोत्सव काळात गिरगाव, लालबाग आणि परळ या भागांत रात्रीचा दिवस झालेला असतो. सर्वत्र विद्युत रोषणाईचा झगमगाट आणि गणेशभक्तांची वर्दळ या दहा दिवसांत दिसून येते. भक्ती आणि जल्लोष यांचा संगम असलेला हा उत्सव पाहण्यासाठी, त्याचा आनंद लुटण्यासाठी आणि मनात त्याच्या आठवणी कायमच्या कोरण्यासाठी हजारो विदेशी पर्यटक या दिवसांत मुंबईत दाखल होतात. गणेशभक्तांना आकर्षित करण्यासाठी मुंबईतील अनेक मंडळांत उंच गणेशमूर्ती आणण्याची प्रथा गेल्या काही वर्षांपासून पडली आहे. काही मंडळे सजावटीवर अधिक खर्च न करता मंडळात केवळ उंच मूर्ती बसवण्यावर भर देतात. मुंबईतील हा उत्साह पाहून गेल्या काही वर्षांपासून समुद्र किनारा लाभलेल्या मुंबई बाहेरील जिल्ह्यांतही उंच मुर्त्या बसवण्यात येऊ लागल्या आहेत. गणेशमुर्त्यांच्या उंचीबाबत बाजूबाजूच्या मंडळांमध्ये दरवर्षी स्पर्धा रंगलेली पाहायला मिळते. वर्तमानपत्र, वृत्तवाहिन्या यांमध्ये या उंच मुर्त्यांची छायाचित्रे झळकत असल्याने त्या जवळून



पाहण्यासाठी गणेशभक्त मित्रमंडळी आणि नातेवाईकांसह दिवस-दिवसभर रांगेत उभे राहतात. १० दिवस मंडपात राजासमान विराजमान झालेल्या श्री गणेशमूर्ती विसर्जनाचा दिवस जेव्हा येतो तेव्हा तिला समुद्रापर्यंत नेण्यासाठी कार्यकर्त्यांना चांगलीच कसरत करावी लागते. रस्त्यातील अडथळे आणि गर्दीतून वाट काढत श्रींची मूर्ती समुद्रापर्यंत आणताना त्यांची चांगलीच दमछाक होते. उंच गणेशमूर्त्या खरेतर खोल समुद्रात विसर्जित करणे अपेक्षित असते; मात्र अनेक मंडळे विसर्जनाच्या वेळी मुर्त्या अर्ध्या पाण्यात अक्षरशः ढकलून पाडतात. त्या बुडण्यासाठी कार्यकर्ते मुर्त्यांवर उभे राहतात. त्यांचे पूर्णपणे विसर्जन झाले कि नाही याकडे मागे वळून न पाहता तिथून पळ काढतात. तर काही मंडळे उंच मुर्त्या तशाच अर्धवट पाण्यात सोडून निघून जातात. ओहोटीच्या वेळी पाणी किनाऱ्यापासून दूर गेल्यावर या मुर्त्या समुद्र किनाऱ्यावर तशाच उभ्या असलेल्या दिसून येतात. अनेक मुर्त्यांचे भग्न अवशेष किनाऱ्यावर आलेले पाहायला मिळतात. ज्या गणेशमूर्तीमध्ये प्रत्यक्ष श्रीगणेश विराजमान आहेत या भावाने आपण १० दिवस तिची मनोभावे पूजा करतो, त्या मूर्तीची विसर्जनाच्या वेळेस होणारी अवहेलना कोणत्याही गणेशभक्तांच्या डोळ्यात पाणी आणणारी असते. लक्षावधी गणेशभक्तांचे श्रद्धास्थान असणाऱ्या लालबागच्या राजा गणेशोत्सव मंडळातील श्रीच्या मूर्तीचे विसर्जन दरवर्षी तराफांच्या साहाय्याने खोल समुद्रात केले जाते. तो दिव्य सोहळा पाहताना आणि बाप्पाला निरोप देताना अनेकांच्या डोळ्याचे पारणे फिटते. जर लालबागच्या राजा मंडळाच्या उंच मूर्तीचे विसर्जन खोल समुद्रात केले जाऊ शकते तर इतरांना ते का शक्य नाही. आणि ज्यांना उंच गणेशमूर्त्यांचे विसर्जन विधिवत आणि भावपूर्ण करता येत नसेल अशा मुर्त्यांनी उंच गणेशमूर्त्या बसवून श्रीगणेशाची अवहेलना तरी करू नये. श्रीगणेशमूर्ती ही सजावटीची किंवा देखाव्याची वस्तू नव्हे, जी दहा दिवस सजवून मंडपात बसवली आणि अनंत चतुर्दशीला समुद्रावर सोडून दिली. गणेश भक्तांच्या श्रद्धेमुळे गणेशोत्सवादरम्यान गणेशमुर्तीमध्ये श्री गणेशाचे तत्व मोठ्या प्रमाणात अवतरित झालेले असते त्यामुळे त्या मूर्तीचा योग्य तो आदर-सन्मान राखला जायला हवा. तिचे विसर्जन शास्त्रशुध्दच व्हायला हवे अन्यथा श्री गणेशाच्या कृपेपेक्षा अवकृपेसच आपण पात्र होऊ.

**- जगन घाणेकर, मुंबई**

# वाचाल तर वाचाल !!

गुणवत्तापूर्ण जगायचे असेल व जीवनाचा दर्जा उंचावायचा असेल तर वाचन अतिशय महत्वाचे आहे. म्हणूनच जाणत्यांनी म्हटलं आहे...

'वाचाल तर वाचाल.'

**कोणी वाचावं?**

जी व्यक्ती जिवंत आहे, जीला मेंदू आहे, त्या सर्व व्यक्तींनी वाचन करावे.

फक्त विद्यार्थ्यांनीच वाचन करावे असे नाही तर शिक्षक, पालक, ज्येष्ठ नागरीक, तरूण, मध्यमवयीन व्यक्ती या सर्वांनी वाचन करणे गरजेचे आहे.

**का वाचावं ?**

१) ज्ञान-माहिती मिळळयासाठी
२) ज्ञानाची वाढ करणे.
३) दृढीकरण करणे.
४) मनोरंजन.
५) गुणवत्तापूर्ण जगण्यासाठी
६) जौवनाचा दर्जा उंचावण्यासाठी.
७) एकाग्रता वाढविणे.

**कसं वाचावं?**

१) चित्रमय
२)रंजक
३)साधे, हलके-फुलके
४)वाचनाला सुरुवात करणे महत्वपूर्ण टप्पा
५) सातत्य असणे गरजेचे
६) समजपूर्वक वाचनाला महत्व
७) पुस्तक काढून त्यावर टीपणे काढावीत
८) त्यावर नवीन विचार लिहावे
९) सारांश लिहावा.

**वाचनाची आवश्यकता**

१) योजनापुर्वक वृत्ती नियोजन
२) जाणून घेणे (नवीन विचार)
३) तपासणे
४) स्पष्ट करणे
५) व्यक्तीची बौदधिक पातळी वाढविणे.
६) चिकीत्सक विचारकौशल्य वाढते.
७)एकाग्रता वाढविणे.

ठरवून वाचन करणे महत्वाचे ठरते. त्यासाठी वेळ ठरवावी वाचनात प्रथम १५ दिवस सातत्य ठेवावे म्हणजे हे सातत्य सवयीत बदलत जाते.

ऑनलाईन वाचावे की ऑफलाईन...

हल्ली तरूणमंडळी ऑनलाईन वाचन करतात आपण what's app व फेसबुक वर विविध पोस्ट वाचत असतो संध्याकाळपर्यंत त्या आपल्या लक्षात राहतात. पण काही काळाने आपण त्या विसरत जातो. परंतू निवांत बसून वाचलेल्या कथा, लहानपणी, तरुणपणी वाचलेल्या गोष्टी आपल्या आजही लक्षात राहतात. आपण कुठे, बसून, कधी तो क्षण देखील आपल्याला लख्ख आठवत असतो. म्हणूनच ऑनलाईन वाचनापेक्षा ऑफलाईन वाचन केव्हाही छान शांत असते. आपण एकाग्रतेने वाचतो, मन शांत कधी विदयार्थी सांगतात, मी वाचले पण लक्षात राहिले राहिले यासाठी एकाग्रता व निवांत वाचन हवे. पुन्हा वाचणे गरजेचे असता वाचाव, घाई करु नये, समजून उमजून वाचावे, संकल्पना समजून घेणे आवश्यक आहे. ''वाचन ही सर्वात मोठी गुंतवणूक आहे.'' हल्ली पुस्तके भेट देतात ही अतिशय सुंदर कल्पना आहे परस्परांना देऊन 'पुस्तक फिरती ठेवणे मला महत्व पूर्ण वाटते.

**कधी वाचावे ?**

विद्याथ्यांनी भल्या पहाटे किंवा रात्रीच्या शांततेत् वाचावे. पहाटे, रात्रभर मेंदू जागृत होऊन लवकर माहिती टिपून होतो व रात्री वाचल्यास सर्वत्र शांतता असते त्यामूळे शांत व निवांत वाचण्यास मोकळा वेळ मिळतो.

"केव्हाही का असेना- शांततेत व निवांत वाचन महत्वाचे. " मला लोकमान्य टिळकांचा एक किस्सा येथे आठवतो. टिळकांना कोणी - तरी गृहस्थाने विचारले 'स्वर्ग' आणि पुस्तके यात, तुम्ही काय निवडाल ? तेव्हा टिळकांनी संब क्षणाचाही विलंब न लावता सांगितले की 'पुस्तके, कारखा जेथे पुस्तके आहेत तेथे स्वर्ग आपोआपच तयार होत असतो. अशाप्रकारे 'वाचन'च आपणाला वाचवू शकते. अजून एका व्यक्तीचा मी आवर्जून येथे उल्लेख करीन ने म्हणजे माझे गुरु श्री. किरण खोत सर यांचा, ते उत्तम उत्तम गायक, निवेदक, वादक, लेखक, सुंदर, हस्ताक्षर असणारे, लोकप्रिय व अत्यंत व्यस्त व्यक्तीमत्व ते दिवसातला रोजचा थोडा वेळ असून देखील सकाळी चालण्यासाठी व दुसरा वाचनासाठी काढतातच. अगदी एक किंवा दोन पाने वाचून ते त्यावर सारांश काढतात. अर्थपूर्ण वाचून आपण त्यांतले कार्य घ्यावे व जीवनात अंमलात आणावे हा देखील महत्त्वाचा टप्पा ठरतो. चला तर मित्रांनो, वाचकांनो, आपण देखील वाचाय सुरुवात करूया व इतरांना देखील प्रेरित करुया. धन्यवाद !!

**- सौ. मेघा महेश देवरुखकर**
**(राजभोज) जि.प.शाळा, धानिव**
**ता. वसई, जि. पालघर**

## श्री रामशेठ ठाकूर सामाजिक विकास मंडळाच्या माध्यमातून वह्यांचे वाटप

**पनवेल :** श्री रामशेठ ठाकूर सामाजिक विकास मंडळाच्या माध्यमातून सुकापूर येथील शाळांमधील विद्यार्थ्यांना आज वह्यांचे वाटप करण्यात आले. भाजपचे राज्य परिषद सदस्य अरुणशेठ भगत यांच्या हस्ते विद्यार्थ्यांना वह्यांचे वाटप करण्यात आले असून त्यांनी मार्गदर्शन करत वह्यांचा वापर करून चांगला अभ्यास करून आपले भविष्य उज्वल करावे असा सल्ला विद्यार्थ्यांना दिला. श्री रामशेठ ठाकूर सामाजिक विकास मंडळाच्या माध्यमातून गेल्या तीस वर्षांपासून दरवर्षी विविध शैक्षणिक उपक्रम राबवून गरजू विद्यार्थ्यांची मदत करण्याचे काम होत आहे.त्यानुसार मंडळाच्या वतीने दरवर्षी प्रमाणे यांदाही गरजू विद्यार्थ्यांना वह्या वाटप करण्यात येत आले. मंगळवारी सुकापूर येथील रायगड एज्युकेशन सोसायटीच्या न्यू इंग्लीश स्कूल आणि सेंट मेरी स्कूलमध्ये वह्यांचे वाटप करण्यात आले. या कार्यक्रमाला रायगड जिल्हा परिषदेचे माजी सदस्य राजेंद्र पाटील, अमित जाधव, नवीन पनवेल मंडल अध्यक्ष दशरथ म्हात्रे, यांच्यासह पदाधिकारी, कार्यकर्ते, शिक्षक आणि विद्यार्थी उपस्थित होते.




# शेकापच्या मंचावर राज ठाकरे

## रायगडमध्ये नव्या समीकरणांची 'राज'नीती

प्रतिनिधी
■ पनवेल

रायगडच्या राजकीय पटलावर एका नव्या आणि अनपेक्षित अध्यायाची नांदी होण्याची शक्यता आहे. पक्षांतर्गत कलह आणि मोठ्या गळतीने ग्रासलेला शेतकरी कामगार पक्ष (शेकाप) आपल्या ७८ व्या वर्धापन दिनी एक मोठी राजकीय खेळी करण्याच्या तयारीत आहे.

येत्या शनिवारी नवीन पनवेल येथे होणाऱ्या या मेळाव्याच्या मंचावर प्रमुख पाहुणे म्हणून महाराष्ट्र नवनिर्माण सेनेचे (मनसे) अध्यक्ष राज ठाकरे उपस्थित राहणार आहेत. महाविकास आघाडीचा घटक असलेल्या शेकापच्या लाल बावट्याच्या कार्यक्रमात महायुतीचे समर्थक असलेले राज ठाकरे काय बोलणार, याकडे अवघ्या राज्याचे लक्ष लागले असून, ही घडामोड रायगडमधील नव्या राजकीय समीकरणांचे संकेत देत असल्याच्या





चर्चेला उधाण आले आहे.

शेकापसाठी यंदाचा वर्धापन दिन मेळावा केवळ एक उत्सव नसून, तो अस्तित्वाच्या लढाईचा एक महत्त्वाचा टप्पा आहे. गेल्या वर्षी पंढरपूर येथील मेळाव्यात सरचिटणीस जयंत पाटील आणि त्यांचे बंधू पंडित पाटील यांच्यातील वाद चव्हाट्यावर आला होता. यानंतर पाटील कुटुंबातील अंतर्गत कलह इतका विकोपाला गेला की, माजी आमदार पंडित पाटील, ॲड. आस्वाद पाटील यांच्यासह अनेक प्रमुख सदस्यांनी पक्षाला 'रामराम' ठोकत भाजपमध्ये प्रवेश केला.

या फुटीची जखम ताजी असतानाच, पेणचे माजी आमदार आणि विद्यमान खासदार धैर्यशील पाटील यांनीही भाजपची वाट धरली. नुकतेच पनवेलमधील पक्षाचे खंदे आधारस्तंभ मानले जाणारे जे. एम. म्हात्रे आणि प्रीतम म्हात्रे यांनीही भाजपमध्ये प्रवेश केल्याने शेकापला मोठा धक्का बसला आहे. या मोठ्या गळतीच्या पार्श्वभूमीवर कार्यकर्त्यांमध्ये नवचैतन्य निर्माण करण्याचे आणि पक्षाची ताकद दाखवून देण्याचे मोठे आव्हान जयंत पाटील यांच्यासमोर आहे.

शेकापचे सरचिटणीस जयंत पाटील यांचे सर्वपक्षीय नेत्यांशी असलेले सलोख्याचे संबंध सर्वश्रुत आहेत. मात्र, राज ठाकरे यांना निमंत्रित करण्यामागे केवळ व्यक्तिगत स्नेह नाही, तर एक धोरणात्मक राजकारण दडलेले दिसते. 'भूमिपुत्रांचे हक्क' आणि 'स्थानिकांचे प्रश्न' हा शेकाप आणि मनसे यांच्यातील समान धागा आहे. आगामी स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुका डोळ्यासमोर ठेवून, रायगडमध्ये एक नवी राजकीय आघाडी उभी करण्याचा हा प्रयत्न असू शकतो. महाविकास आघाडीत राहूनही, स्थानिक पातळीवर मनसेसोबत हातमिळवणी करून शिंदे गट आणि भाजपला शह देण्याची ही 'बेरजेची राज'नीती' असू शकते, असा अंदाज राजकीय विश्लेषक वर्तवत आहेत.

### राजन विचारे यांचा आरोप

# टक्केवारीच्या नादात नवे ठाणे रेल्वे स्थानक, सॅटीस प्रकल्प रखडले

प्रतिनिधी
■ ठाणे

नवीन ठाणे रेल्वे स्थानक, सॅटिस पूर्व प्रकल्प यांसारखे अनेक ठाण्यातील प्रकल्प टक्केवारीच्या नादात रखडले आहेत. या प्रकल्पांना चालना देण्यात सत्ताधारी अपयशी झाले असल्याचा आरोप ठाकरे गटाचे नेते माजी खासदार राजन विचारे यांनी केला. सोमवारी सॅटिस पूर्व प्रकल्पाचे गर्डर टाकण्याच्या कामाची पाहणी राजन विचारे यांनी केली.

ठाणे शहरातील पूर्वेकडे सॅटीस दोन या प्रकल्पाचे काम सुरू आहे. या प्रकल्पातील कोपरी रेल्वे पुलावरील गर्डर टाकण्याचे काम दोन दिवस सुरू आहे. राजन विचारे यांनी सोमवारी ठाणे महापालिकेचे अधिकारी, रेल्वे प्रशासनाचे अधिकारी यांच्यासोबत पाहणी दौरा आयोजित करून या गर्डरचे काम कितपत पूर्ण झाले आहे याची माहिती घेतली. तसेच सत्तेत असणाऱ्या कोणत्याही लोकप्रतिनिधींनी या ठिकाणी येऊन आढावा घेतला नाही आणि साधी पाहणी देखील केली नसल्याचा आरोप विचारे यांनी केला. शिंदे गटाचे राजकारण फोडाफोडी, दमबाजी यात व्यस्त असल्याने त्यांना विकासाचे काहीही पडले नसल्याचेही ते म्हणाले.

**वाहतूक कोंडी लवकरच सुटणार**

कोपरी जुना पूलावर ४.५० मीटरचे पाच गर्डर असून हे गर्डर टाकण्यात आले आहेत. त्यावर स्टील काँक्रीट करून हा पूल एकमेकांना जोडून २.२४ किलोमीटर लांबीचा उन्नत मार्ग तयार होणार आहे. त्यामुळे ठाणे पुर्व, स्थानक परिसरात होणारी वाहतूक कोंडी लवकरच सुटणार आहे. हा प्रकल्प सप्टेंबर अखेरपर्यंत पूर्ण होणार असल्याचे अधिकाऱ्यांनी राजन विचारे यांना सांगितले.

या मार्गावर ५९ खांब उभे करण्यात आले. परंतु गेल्या वर्षभरापासून ब्लॉक घेण्यासाठी रेल्वे कडे पाठपुरावा नसल्याने गर्डर टाकण्यास विलंब लागला होता. सध्याचे खासदार संसदेत फोटो काढण्यात व्यस्त आहेत बहुतेक त्यांना विकास कामांकडेही लक्ष देण्यास वेळ नसावा असा आरोप राजन विचारे यांनी खासदार नरेश म्हस्के यांचावर केला.

सॅटीस -२ या प्रकल्पाला २०१८ मध्ये मंजुरी मिळाली. त्यानंतर या प्रकल्पाला स्मार्ट सिटी अंतर्गत समावेश करून घेण्यासाठी केंद्र शासनाकडे व तत्कालीन महापालिका आयुक्त संजीव जयस्वाल यांच्याकडे पाठपुरावा झाला. २६१ कोटी आणि रेल्वे पुलासाठी ३९ कोटी अशी एकूण २९८ कोटी रुपयांची मान्यता मिळाली. दिल्लीच्या आयआरडीसी विभागाकडूनही मंजुरी घेण्यात आली. १९ फेब्रुवारी २०२२ रोजी सॅटिस डेकचे भूमिपूजन करण्यात आले. या प्रकल्पाचे काम टप्प्याटप्प्यामध्ये सुरू झाले.

## बदलापूर एमआयडीसीत केमिकल कंपनीला आग

प्रतिनिधी
■ बदलापूर

बदलापूर एमआयडीसीमधील केमिकल कंपनीच्या बॉयलरला आग लागल्याची घटना घडली आहे.सोमवारी रात्री ही घटना घडली असून अग्निशमन दलाने ही आग आटोक्यात आणली आहे. बदलापूर एमआयडीसीच्या माणकिवली भागातील एव्हीए केमिकल कंपनी आहे. या कंपनीतील बॉयलरला सोमवारी सायंकाळच्या सुमारास अचानक आग लागली.

आगीची माहिती मिळताच बदलापूर नगरपरिषद आणि एमआयडीसी अग्निशमन दलाच्या गाड्या घटनास्थळी पोहोचल्या त्यांनी आग आटोक्यात आणली आहे. अशाप्रकारे बदलापूर एमआयडीसीमध्ये कंपन्यांना आग लागण्याच्या घटना वारंवार घडत आहेत. अशा वारंवार लागणाऱ्या आगीमुळे केमिकल कंपन्यांच्या सुरक्षेचा मुद्दा पुन्हा एकदा ऐरणीवर आला आहे. आग लागलेल्या कंपनीकडे फायरची एनओसी नसल्याची चर्चा सुरू आहे. अशा निष्काळजीपणा करणाऱ्या कंपन्यांवर कारवाई करण्याची मागणी होत आहे.

## चिखले गावातील गायरान जमिनीच्या वादामुळे सरपंच व त्यांच्या पतीचा आत्महत्येचा प्रयत्न

प्रतिनिधी
■ पनवेल

पनवेल तालुक्यातील चिखले गावातील गायरान जमीन प्रकरणात दीर्घ काळ न्याय न मिळाल्याने गावच्या सरपंच दिपाली तांडेल व त्यांचे पती दत्तात्रय यांनी मंगळवारी राहत्या घरात आत्महत्येचा प्रयत्न केला. सरकारी अधिकारी व पोलिसांनी सरपंच व त्यांच्या पतींना समजावण्याचा प्रयत्न केला. मात्र पोलिसांच्या या संवादाला यश आले नाही. अखेर सरपंचांनी घराबाहेर पोलीस बंदोबस्त असतानाच स्वताला कोंडून घेत विष पिऊन आत्महत्येचा प्रयत्न केला. या घटनेमुळे गावात एकच खळबळ माजली. गावात



तणावाचे वातावरण निर्माण झाले. सध्या तांडेल दाम्पत्यावर पनवेल शहरातील उपजिल्हा रुग्णालयात उपचार सुरू आहेत.

१७ मार्च रोजी सरपंच तांडेल व त्यांच्या पतींनी उपोषण सुरू केले होते. सलग १२ दिवस उपोषण केल्यानंतर प्रांत अधिकाऱ्यांनी ८ दिवसांत बैठक घेऊन प्रश्न सोडवण्याचे आश्वासन दिले होते. मात्र, आजतागायत ना बैठक झाली, ना निर्णय झाला. सरपंच दिपाली व त्यांच्या पतीने सांगितले की, न्याय मिळत नसल्याने आम्ही हे पाऊल उचलत आहोत.

ग्रामपंचायतीच्या नावावर असलेल्या गायरान जमिनीचा साठे करार करून तो करार रजिस्टर नोंदणी केला गेला. तसेच त्याच जमिनीवर मोठ्या प्रमाणात माती उत्खनन करण्यात आली. गेल्या पाच महिन्यांपासून पाठपुरावा करूनही पोलीस व महसूल विभाग माती चोरांना पकडू शकले नाही आणि बेकायदा पद्धतीने जमिनीचे साठेकरार करणाऱ्यांवर फौजदारी कारवाई करु शकले नाही त्यामुळे सरपंच तांडेल व त्यांच्या पतीने संतापाने हे पाऊल उचलल्याचे मंगळवारी प्रसारमाध्यमांच्या प्रतिनिधींना सांगितले.

या गैरव्यवहारामध्ये याच गावचे तत्कालीन सरपंच तसेच ग्रामसेवकांचा सुद्धा हात असल्याचा आरोप तांडेल यांनी केलेल्या अर्जात केला आहे. या जमिनीचा लाभ घेणारे मोकाट सुटू नये म्हणून त्यांच्यावर चौकशी करुन फौजदारी गुन्हा दाखल करावा अशी माफक मागणी तांडेल दाम्पत्यांची होती. मात्र त्याकडे दुर्लक्ष होत असल्याने तांडेल दाम्पत्याने टोकाचे पाऊल उचलले.

## ठाण्याच्या गडकरी रंगायतनला स्वातंत्र्य दिनाचा मुहूर्त...

प्रतिनिधी
■ ठाणे

ठाणे शहरामध्ये ४५ वर्षांपुर्वी उभारण्यात आलेल्या गडकरी रंगायतन नाट्यगृहाच्या नुतनीकरणाचे काम करण्यात येत आहे. या नाट्यगृहाच्या दुरुस्तीचे काम पुर्ण होत असून आता तिथे बसविण्यात आलेली विद्युत यंत्रणेची तसेच ध्वनीक्षेपकाच्या आवाजाची पातळीची तपासणी येत्या दोन दिवसांत करण्यात येणार आहे. यामुळे गेल्या काही महिन्यांपासून बंद असलेले रंगायतन आता १५ ऑगस्टपर्यंत खुले होण्याची शक्यता व्यक्त केली जात आहे.



ठाणे शहराचा सांस्कृतिक केंद्रबिंदू म्हणून राम गणेश गडकरी रंगायतन नाट्यगृह ओळखले जाते. ठाणे शहराच्या मध्यवर्ती भागात असलेल्या मासुंदा तलावाच्या काठालगतच हे नाट्यगृह आहे. १९८० मध्ये या नाट्यगृहाची उभारणी करण्यात आली. या नाट्यगृहात नाटक तसेच इतर सांस्कृतिक कार्यक्रमांसाठी नागरिक मोठ्या संख्येने येतात. नाटक पाहण्यासाठी येणाऱ्यांमध्ये ज्येष्ठ नागरिकांची संख्या मोठी आहे. या नाट्यगृहात उदवाहकाची व्यवस्था नव्हती. यामुळे ज्येष्ठ नागरिकांना जिने चढावे लागत होते. यामुळे त्यांची दमछाक होत होती. तसेच या नाट्यगृहाचे बांधकाम ४५ वर्षे जुने असल्याने ना दुरुस्त झाले होते. या बांधकामाची काही वर्षांपुर्वी तात्पुरती दुरुस्ती करण्यात आली होती. आता नाट्यगृहात पुन्हा दुरुस्तीचे काम निघाले होते. त्यामुळे पालिकेने या नाट्यगृहाची तात्पुरती दुरुस्ती करण्याऐवजी त्याचे नुतनीकरण करण्याचा निर्णय घेतला होता. त्यासाठी नगरविकासव विभागाने निधी दिला होता. या कामामुळे गेल्या आठ महिन्यांपासून हे नाट्यगृह बंद आहे. यामुळे नागरिकांना मानपाडा येथील डॉ. काशीनाथ घाणेकर नाट्यगृह येथे जावे लागत आहे.

## उरण-करंजा रस्ता महिन्यांतच उखडला

प्रतिनिधी
■ उरण

सार्वजनिक बांधकाम विभागाच्या अखत्यारीत नुकतेच तयार करण्यात आलेल्या उरण-करंजा रस्त्याची स्थिती अवघ्या दोन ते तीन महिन्यांतच अत्यंत खराब झाली आहे. रस्त्याची खडी उखडली असून, अनेक ठिकाणी डांबरी थर गेलेले दिसून येत आहेत. या निकृष्ट दर्जाच्या कामामुळे स्थानिक ग्रामस्थांमध्ये संतापाची लाट उसळली आहे.

चाणजे ग्रामपंचायतीचे सरपंच अजय म्हात्रे यांनी या प्रकाराची तीव्र दखल घेत सार्वजनिक बांधकाम विभागाकडे तक्रार दाखल केली आहे.उरण-करंजा रस्ता गेल्या अनेक वर्षांपासून दुर्लक्षित होता. जिल्हा परिषद, सिडको तसेच सार्वजनिक बांधकाम विभाग यांच्यात संबंधित रस्त्याच्या दुरुस्तीबाबत गोंधळ होता. अखेर स्थानिक आमदार महेश बालदी यांच्या प्रयत्नांतून सुमारे चार कोटी रुपये निधी मंजूर होऊन डांबरीकरण आणि काँक्रीटीकरण असे दोन टप्प्यात काम सुरू झाले, परंतु प्रत्यक्षात कामाच्या गुणवत्तेवर प्रश्नचिन्ह निर्माण झाले आहे.

सुरुवातीलाच चाणजे गावाजवळील काम निकृष्ट असल्याचे सरपंच अजय म्हात्रे यांनी निदर्शनास आणल्याने त्या भागाचे काम पुन्हा करून घेण्यात आले होते, मात्र आता संपूर्ण मार्गावर खडी बाहेर आली असून, डांबरी थर सरकलेला दिसतो. त्यामुळे फक्त वरवर डांबर घालून काम पूर्ण केल्याचा बनाव तर नाही ना, असा सवाल नागरिक उपस्थित करत आहेत, तर काम सुरू होण्याच्या सुरुवातीलाच पुन्हा बांधकाम करावे लागले आणि आता पुन्हा रस्ता खराब होतोय, यावरून या कामाची गंभीर तपासणी व दोषी ठेकेदारावर कारवाईची मागणी ग्रामस्थ व सरपंच अजय म्हात्रे यांनी केली आहे. निकृष्ट कामांमुळे सार्वजनिक निधीचा अपव्यय आणि नागरिकांचे हाल होत असल्याने, रस्ते कामात पारदर्शकता आणि कठोर गुणवत्ता नियंत्रणाची गरज अधोरेखित होत आहे.

## नवी मुंबई महानगरपालिकेच्या स्वच्छतादूत व सफाईमित्रांची आरोग्य तपासणी



प्रतिनिधी
■ नवी मुंबई

सर्व ऋतुंमध्ये शहर स्वच्छतेची काळजी घेणा-या स्वच्छतामित्र, स्वच्छतासखी व सफाईमित्रांच्या आरोग्याची काळजी घेण्याच्या दृष्टीने आज सफाई अपनाओ, बिमारी भगाओ अभियानांतर्गत विशेष आरोग्य तपासणी शिबीरे महापालिका आयुक्त डॉ. कैलास शिंदे यांच्या मार्गदर्शनाखाली ठिकठिकाणी राबविण्यात आली.

महानगरपालिकेचे अतिरिक्त आयुक्त श्री.सुनिल पवार यांच्या नियंत्रणाखाली तसेच घनकचरा व्यवस्थापन विभागाचे उपआयुक्त डॉ.अजय गडदे व श्रीम.स्मिता काळे आणि परिमंडळ 1 उपआयुक्त श्री. सोमनाथ पोटरे व परिमंडळ 2 उपआयुक्त श्री.संजय शिंदे यांच्या निरीक्षणाखाली, वैद्यकिय आरोग्य अधिकारी डॉ.प्रशांत जवादे यांच्या माध्यमातून प्राथमिक नागरी आरोग्य केंद्रांचे वैद्यकिय अधिकारी यांच्या सहयोगाने आठही विभागांचे सहाय्यक आयुक्त व स्वच्छता अधिकारी यांनी आपल्या सहका-यांसह हा उपक्रम यशस्वी केला.


यामध्ये बेलापूर विभागात माता बाल रुग्णालय, बेलापूर गाव, वाशी विभागात नागरी आरोग्य केंद्र वाशी से.1, घणसोली विभागात नागरी आरोग्य केंद्र घणसोली, ऐरोली विभागात नागरी आरोग्य केंद्र से.2 ऐरोली व दिघा विभागात नागरी आरोग्य केंद्र दिघा आणि नागरी आरोग्य केंद्र इलठणपाडा याठिकाणी आरोग्य तपासणी शिबीरे आयोजित करुन स्वच्छतामित्र, स्वच्छतासखी व सफाईमित्रांची आरोग्य तपासणी करण्यात आली. तपासणीमध्ये पुढील उपचारांची गरज असलेल्या स्वच्छताकर्मींना पुढील उपचारासाठी महानगरपालिकेच्या सार्वजनिक रुग्णालयामध्ये संदर्भीत करण्यात आले.

1 जुलै पासून सुरु झालेल्या सफाई अपनाओ, बिमारी भगाओ अभियान अंतर्गत दररोज स्वच्छता आणि आरोग्य विषयक विविध उपक्रमांचे आयोजन करुन त्यामध्ये लोकसहभागावर भर देत शहर स्वच्छतेचा वसा जपला जात आहे.

## अतिक्रमण विभागामार्फत कोपरखैरणे विभागात निष्कासनाची कारवाई

प्रतिनिधी
■ नवी मुंबई

नवी मुंबई महापालिकेच्या अतिक्रमण विभागाच्या वतीने नोटीस देऊनही संबधितांनी नोटिशीची दखल न घेतल्यामुळे अनधिकृत बांधकामाविरोधात नवी मुंबई महानगरपालिका विभागामार्फत मा. आयुक्त डॉ. कैलास शिंदे यांच्या निर्देशानुसार व अतिरिक्त आयुक्त (2) डॉ. राहुल गेठे व उप आयुक्त (अतिक्रमण) डॉ. कैलास गायकवाड यांच्या मार्गदर्शनाखाली अतिक्रमण




विभागाने कोपरखैरणे विभागात निष्कासनाची कारवाई करण्यात आली.

नवी मुंबई महानगरपालिकेच्या कार्यक्षेत्रातील कोपरखैरणे विभाग अंतर्गत श्री. अब्दुल अझीझ ए रजक पटेल घर नं -23, खैरणेगाव, तलावाजवळ, कोपरखैरणे, नवी मुंबई यांच्या बांधकामास महाराष्ट्र प्रादेशिक नियोजन व नगररचना अधिनियम, 1966 मधील कलम 54 अन्वये दिनांक 17-01-2025 रोजी नोटीस बजावण्यात आली होती. सदर बांधकामावर तिसऱ्यांदा निष्कासनाची तोडक कार्यवाही करण्यात आली. सदर अनधिकृत बांधकामावर कोपरखैरणे विभागामार्फत तोडक मोहिमेचे आयोजन करण्यात आलेले होते. या धडक मोहिमेसाठी कोपरखैरणे विभागाचे सहाय्यक आयुक्त तथा विभाग अधिकारी श्री. भरत ऊ धांडे, कनिष्ठ अभियंता श्री.चंद्रकांत धोत्रे व इतर अधिकारी/कर्मचारी व न.मुं.म.पा पोलीस बंदोबस्त उपस्थित होते. तसेच सदर कारवाईसाठी १२ मजूर, पिकअप व्हॅन 01, पोकलन 01, वापर करण्यात आले. यापुढे देखील अशा प्रकारे अतिक्रमण विरोधी कारवाई तीव्र करण्यात येणार आहे.

## श्रावणी सोमवारनिमित्त अलिबागमध्ये भाविकांची गर्दी

**अलिबाग:** श्रावण महिन्यातील दुसऱ्या सोमवारी अलिबाग तालुक्यातील विविध महादेव मंदिरांत भक्तांची प्रचंड गर्दी पाहायला मिळाली. कनकेश्वर, गोकुळेश्वर आणि काशी विश्वेश्वर मंदिरात भाविकांनी पहाटेपासून दर्शनासाठी रांगा लावल्या. मंदिर परिसरात बेल, दुर्वा, फुले, नारळ यांची दुकाने उभारली गेली होती, ज्यामुळे परिसरात जत्रेचे स्वरूप आले. काशी विश्वेश्वर हे ऐतिहासिक आणि आंग्रेकालीन मंदिर असून ते शहराच्या मध्यभागी आहे. याठिकाणी नवविवाहित महिलांनी बेल, दुर्वा, दूध आणि तांदूळ अर्पण करत महादेवाची विशेष पूजा केली.



## डॉ. चित्रा मात्रे यांचे 'नेट'मध्ये दैदीप्यमान यश

### अनुसूचित जाती प्रवर्गातून संपूर्ण देशात प्रथम क्रमांक

प्रतिनिधी
■ कल्याण

विद्यापीठ अनुदान आयोगाच्या (UGC) वतीने राष्ट्रीय परीक्षा एजन्सीने (NTA) घेतलेल्या युजीसी नेट (जून 2025) परीक्षेचा निकाल नुकताच जाहीर झाला असून, कल्याण येथील रहिवासी डॉ. चित्रा नितीश मात्रे यांनी 99.31 पर्सेंटाइल गुणांसह परीक्षेत उत्तीर्ण होत देशपातळीवर अनुसूचित जाती प्रवर्गातून प्रथम क्रमांक, तर एकूण गुणवत्तेत द्वितीय क्रमांक पटकावला आहे. डॉ. चित्रा नितीश मात्रे या मिलिंद महाविद्यालय, डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ, संभाजीनगर येथून "पाली आणि बुद्धिझम" या विषयात मे 2025 मध्ये एम.ए. ही पदव्युत्तर परीक्षा 84 टक्के गुणांसह उत्तीर्ण झाल्या आहेत. पाली भाषेत त्यांनी नेट परीक्षा उत्तीर्ण करत असिस्टंट प्रोफेसर पदासाठी आणि पीएच. डी.साठी पात्रता मिळवली आहे. कौटुंबिक जबाबदाऱ्या सांभाळत मिळवलेल्या या यशामुळे त्यांचे सर्वत्र कौतुक होत आहे. पाली भाषा आणि बुद्ध धम्माच्या प्रचार-प्रसाराचे कार्य त्या गेल्या काही वर्षांपासून त्या करत आहेत. आपल्या यशाचे श्रेय त्यांनी डॉ. संघमित्रा जाधव (कल्याण), डॉ. प्रमोद इंगोले सर (पाली विभाग प्रमुख, मिलिंद महाविद्यालय), भन्ते डॉ. यश काश्यपायन,भन्ते नीतेश वर्धन , डॉ. किर्तीराज लोणारे सर, पुंडकर सर, पती नितीश सदाशिव मात्रे यांना दिले आहे.

**ठाणे महानगरपालिका, ठाणे**

सार्वजनिक बांधकाम विभाग
निविदा सुचना

ठाणे महानगरपालिका क्षेत्रात "आपत्ती व्यवस्थापन व पूर नियंत्रण"या लेखाशिर्षका उथळसर प्रभाग समिती कार्यक्षेत्रात गोकुळदासवाडी येथे सोहम स्वस्तिक इमारती समोरील संरक्षक भिंती मागील डेब्रिज काढणे व इतर स्थापत्य कामे करणेबाबत. या कामाची ऑनलाईन निविदा मागविण्यात येत आहेत. ज्या कंत्राटदारांविरुध्द शासकिय /निमशासकिय /सार्वजनिक क्षेत्रातील संस्था व उपक्रम /स्थानिक स्वराज्य संस्था इ. यांनी शिस्त भंगाचे कार्यवाहीच्या अनुषंगाने नोंदणी पत्र रद्द करण्याची कार्यवाही केली /सुरु आहे. अशा कंत्राटदारांना निविदा प्रक्रियेत भाग घेता येणार नाही. निविदा सुचना ठाणे महानगरपालिकेचे संकेतस्थळ https://mahatenders.gov.in वर दि.३०/०७/२०२५ ते दि.०६/०८/२०२५ पर्यंत उपलब्ध आहेत. ऑनलाईन निविदा महानगरपालिकेचे संकेतस्थळ येथे दि.०६/०८/२०२५ रोजी सायं. १५.०० वाजेपर्यंत स्विकारण्यात येतील. निविदा दि. ०८/०८/२०२५ रोजी सायं १५.०० वाजता निविदाकार अथवा त्यांचे प्रतिनिधी यांचे समक्ष उघडण्यात येतील.

ठामपा/पिआरओ/सा.बा-उ. प्र.स /४७५/२०२५-२६
दि.२९.०७.२०२५
Pls visit our oficial web-site
www.thanecity.gov.in

सही/-
कार्यकारी अभियंता
ठाणेमहानगरपालिका,ठाणे

## महत्त्वाचे

### अनैतिक व्यवसायातून बांगलादेशी मुलीची सुटका

**भाईंदर :**बांगलादेशातून वेश्याव्यवसायासाठी आणलेल्या एका अल्पवयीन मुलीसह दोन मुलींची मिरा-भाईंदरच्या अनैतिक मानवी वाहतूक प्रतिबंध कक्षाने सुटका केली आहे. याप्रकरणी तीन बांगलादेशी दलालांना अटक करण्यात आली आहे..नायगाव येथे रहाणाऱ्या वेश्यादलालांकडे बांगलादेशी अल्पवयीन मुली असून ते गिऱ्हाईकाकडून वेश्यागमनाचा मोबदला, कमीशन व रुम भाडे असे मिळून एकूण पाच हजार घेवून मुलींना वेश्याव्यवसायासाठी बाहेर पाठवितात, तसेच स्वतःच्या रहात्या घरीदेखील मुलीकडून जबरदस्तीने वेश्याव्यवसाय करून घेतात, अशी माहिती अनैतिक मानवी वाहतूक कक्षाला मिळाली होती. त्यानुसार पोलिसांनी बोगस गिऱ्हाईक तयार करून माहितीची सत्यता पडताळली व शनिवारी (ता. २६) दुपारी छापा टाकला. बांगलादेशी दलाल मोहम्मद खालीद बापारी, जुबेर हारुण शेख, शामिन गफार सरदार यांना ताब्यात घेण्यात आले. या वेळी एका अल्पवयीन मुलीसह दोघींची सुटका करण्यात आली.

### पेणमध्ये नागपंचमी साजरी

**पेण:** नागपंचमीचा सण पेण तालुक्यात उत्साहात पारंपरिक श्रद्धेने साजरा करण्यात आला. काही घरांमध्ये शाडू किंवा मातीपासून बनवलेल्या नागदेवतेच्या मूर्तींची विधीवत पूजा करण्यात आली. दूर्वा, आघाडा, लाह्या, दूध यांचा नैवेद्य दाखवून पूजा करण्याचा परंपरागत विधी पार पाडण्यात आला. काही भक्तांनी नवनाग स्तोत्राचे पठण केले, तर अनेक ठिकाणी घरच्या पाटांवर रांगोळीच्या सहाय्याने नागोबाची चित्रे काढून पूजन करण्यात आले. विशेष म्हणजे काही ठिकाणी गारुडींनी जिवंत नागोब्याची पूजा करून लोकांची श्रद्धा पूर्ण केली. त्यांच्याबरोबर घराघरांत जाऊन नागदेवतेचे दर्शन घडवले गेले.

### सुदर्शन केमिकलतर्फे वनसंवर्धन दिन साजरा

**रोहा:** एक झाड पुढच्या पिढीसाठी या प्रेरणादायी सामाजिक संकल्पनेखाली सुदर्शन केमिकल इंडस्ट्रीज लिमिटेड, रोहा आणि वनविभाग यांच्या संयुक्त विद्यमाने चिंचवली तर्फे दिवाळी येथे वनसंवर्धन दिन मोठ्या उत्साहात साजरा करण्यात आला. साईट हेड विवेक गर्ग आणि सीएसआर प्रमुख माधुरी सणस यांच्या संकल्पनेतून हा उपक्रम राबवण्यात आला. या कार्यक्रमांतर्गत रविवारी (ता. २७) एकाच दिवशी तब्बल एक हजार भारतीय प्रजातींच्या झाडांचे वृक्षारोपण करण्यात आले. कार्यक्रमाचे उद्घाटन माजी आमदार अनिकेत तटकरे यांच्या हस्ते झाले. तटकरे यांनी पर्यावरण रक्षणाची गरज अधोरेखित करत वृक्षसंवर्धनाबरोबरच जैवविविधतेचे संरक्षण करण्याचा संदेश दिला.

### क्षयरोग रुग्णांसाठी पोषण आहाराचे वाटप

**खालापूर :** क्षयरोग निर्मूलन मोहिमेत सामाजिक जबाबदारीची भूमिका स्विकारून इनोव्होसिंथ इंडिया कंपनीने पुढाकार घेतला असून तालुक्यातील १०० क्षयरोग रुग्णांसाठी कोरड्या पोषण आहार किट्सचे वाटप करण्यात आले. या उपक्रमात खोपोली नगरपालिका दवाखान्यात सोमवारी आयोजित कार्यक्रमात रुग्णांना सहा महिन्यांसाठी पोषण आहाराची किट्स देण्यात आल्या. यामध्ये प्रथिने, जीवनसत्त्वयुक्त पदार्थ यांचा समावेश असून रुग्णाच्या शरीरबलासाठी उपयुक्त ठरणार आहेत.

## दारुड्या मुलाच्या मारहाणीत बापाचा मृत्यू

**तासगाव :** येथील कांबळेवाडी या उपनगरात राहावयास असलेल्या कांबळे कुटुंबात वादातून चिडून दारूड्या मुलाने केलेल्या मारहाणीत बापाचा मृत्यू झाला. याप्रकरणी पोलिसांनी मुलगा संतोष सुधाकर कांबळे (वय 45) याला अटक केली आहे. सुधाकर तुकाराम कांबळे (70) असे मृताचे नाव आहे. रात्री उशिरा मृत सुधाकर यांची पुतणी सुनीता अशोक कांबळे (40) यांनी फिर्याद दाखल केली आहे. खुनाचा गुन्हा नोंद झाला. सुधाकर आणि संतोष मजुरी करून कुटुंब चालवत होते. पण दोघांनाही दारूचे व्यसन. त्यांच्यात दररोज वाद, मारहाण होत असे. संशयित संतोष हा दररोज दारू पिऊन वडिलांना मारहाण करीत असे. शेजारील, भावकीतील लोकांनी अनेकवेळा या कुटुंबातील वाद मिटविण्याचा प्रयत्न केला. पण त्याचा उपयोग झाला नाही.



### महत्त्वाचे

## कराडमध्ये अश्लील चित्रफीत प्रकरणी गुन्हा

**कराड :** विवाहितेची अश्लील चित्रफीत समाजमाध्यमावर प्रसारित केल्याप्रकरणी पीडित महिलेच्या फिर्यादीनंतर कराड ग्रामीण पोलीस ठाण्यात एकावर गुन्हा दाखल करण्यात आला आहे. पोलिसांकडून मिळालेली माहिती अशी, की तालुक्यातील एका गावातील पीडित महिलेची संशयिताशी ओळख झाली. त्या ओळखीचा फायदा घेत त्याने विवाहितेशी जवळीक वाढवली. तसेच तुझे इतरांशी बोलतानाची छायाचित्रे माझ्याकडे आहेत. ती तुझ्या घरी दाखवून तुझी बदनामी करेन, अशी धमकी देत त्याने १० मे २०२३ पासून विवाहितेवर वारंवार अत्याचार केला. या दरम्यानच त्याने चोरून चित्रफीत तयार केली. सुरुवातीला भीतीपोटी विवाहितेने याबाबतची माहिती कोणालाही दिली नाही. मात्र, संशयिताने वारंवार हाच प्रकार केल्यामुळे पीडितेने याबाबत आपल्या भावाला माहिती दिली. भावाने संशयिताला बोलावून घेत समज दिली. मात्र, त्यानंतरही त्याने पीडितेला त्रास देणे सुरूच ठेवले

## बदलीसाठी पोलिसांकडे खंडणीची मागणी

**नाशिक :** शहर परिसरातील गुन्हेगारीचा वाढता आलेख पाहता पोलिसांच्या कार्यशैलीवर सातत्याने प्रश्नचिन्ह उभे केले जात आहेत. पोलीस आयुक्तालयाकडून खांदेपालट करत समाजकंटकांना शह देण्याचा प्रयत्न होत असला तरी या बदली सत्राने अंतर्गत नाराज अधिकारी आणि कर्मचारी हेरुन काही दलालांकडून त्यांच्या बदलीसाठी खंडणी मागण्याचा प्रयत्न होत असल्याचा धक्कादायक प्रकार उघड झाला आहे. याप्रकरणी मुंबई नाका पोलीस ठाण्यात दोन खंडणीचे गुन्हे दाखल झाले. एका संशयिताला पोलिसांनी ताब्यात घेतले. एक जण फरार आहे. शहरातील काही महत्वाच्या पोलीस ठाण्यात बदलीसाठी पोलीस अधिकारी – कर्मचारी यांचे प्रयत्न होत असतात. आपल्या आवडत्या कामाच्या ठिकाणी कामाचा आवाका आणि वरिष्ठांचा वरदहस्त महत्वाचा ठरतो. नाशिकरोड पोलीस ठाण्याचे अंमलदार प्रशांत नागरे यांनी मुंबई नाका पोलिसांत दिलेल्या तक्रारीनुसार नितीन सपकाळे आणि सागर पांगरे-पाटील या दोन संशयितांवर गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

## कृष्णा आणि वारणा नदीवरील 16 बंधारे पाण्याखाली

**सांगली :** सांगली जिल्ह्यात दोन दिवसांपासून मुसळधार पाऊस होत आहे. या पावसामुळे जनजीवन विस्कळीत झाले असून सांगलीच्या कृष्णा आणि वारणा नदीवरील १६ बंधारे देखील पाण्याखाली गेले आहेत. इतकेच नाही तर वारणेच्या नदी पात्रातून पाणी बाहेर पडले असल्याने आजूबाजूच्या परिसरातील अनेक शेतांमध्ये पाणीच पाणी साचले आहे. परिणामी शेतातील पिके पाण्याखाली गेले आहेत. राज्यात अनेक भागात पावसाचा जोर वाढला आहे. अनेक भागात मुसळधार पाऊस होत असल्याने पूरस्थिती निर्माण झाली आहे. त्यानुसार सांगली जिल्ह्यात वारणा धरणाच्या पाणलोट क्षेत्रात जोरदार पाऊस झाल्यामुळे वारणा व कृष्णा नदीला पूर आला आहे. यामुळे प्रशासनाकडून नदी काठच्या गावांना सतर्कतेचा इशारा देण्यात आला आहे. नद्यांना पूर आल्यामुळे आजूबाजूच्या शेतांमध्ये पुराचे पाणी शिरले आहे. जोरदार पडणारा पाऊस आणि कोयनेतुन होणारा विसर्ग त्यामुळे कृष्णा आणि वारणा नदीपात्रामध्ये पाण्याची वाढ होत आहे.

# माझ्या कुटुंबाची रेकी केली जातेय

## पोलिसांचा व्हिडीओ शेअर करत खडसेंचा आरोप

प्रतिनिधी

■ जळगाव

राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाचे नेते एकनाथ खडसे यांनी त्यांच्या कुटुंबाची रेकी केली जात असल्याचा आरोप सोशल मीडियावरून केला आहे. खडसे यांनी ट्विटरवरुन दोन व्हिडीओ शेअर केले आहेत. त्या व्हिडीओत काही साध्या वेषातील पोलीस हे त्यांची मुलगी व राष्ट्रवादीच्या नेत्या रोहिणी खडसे यांच्या घराबाहेर उभे असल्याचे दिसत आहेत. त्या व्हिडीओसोबत एक पोस्ट शेअर करत खडसे यांनी त्यांच्या घराची रेकी केली जात असल्याचा आरोप केला आहे.

>”आज माझ्या मुलीच्या पुण्यातील राहत्या घरी मी पत्रकार परिषद घेतली. या पत्रकार परिषदेला काही अनोळखी लोक शिरले असल्याचे पत्रकार बांधवांनी माझ्या निदर्शनास आणून दिले. या माणसांना आम्ही जाब विचारला तर त्यांनी पोलीस कर्मचारी असल्याचे सांगितले. तब्बल 10-12 लोक ? (हेडकॉन्स्टेबल दिपक कांबळे, चंद्रकांत रेजीतवाड, पोलीस इन्स्पेक्टर विक्रम गौर अशी काहींची नावे आहेत) या लोकांनी कोणते तरी जगदाळे म्हणून अधिकारी आहेत त्यांना फोन जोडून दिला तर या जगदाळेंनी कबूल केले की त्यांनीच ही माणसं पाठवली. हे जगदाळे कोण ? त्यांची ही माणसं माझ्या मुलीच्या घरात अशीच कशी शिरतात ? त्यांना कुणी परवानगी दिली ? या लोकांचा हेतू काय ? या जगदाळेंचा बॉस कोण आहे ? कुणाच्या इशाऱ्यावर ही माणसं पाठवली गेली होती ? याचे उत्तर आम्हाला हवे आहे, असे खडसे यांनी या ट्विटमध्ये म्हटले आहे.



माझ्या कुटुंबाची अजूनही रेकी केली जात आहे. माझ्या कुटुंबाविरोधात कुणाला आणखी एखादं कुभांड रचत आहे का ? असा प्रश्न मला पडतो आहे. माझ्या 35-40 वर्षांच्या संसदीय कारकीर्देत मी इतक्या खालच्या पातळीचे राजकारण पाहिले नाही असेही खडसे या ट्विटमध्ये म्हणाले आहेत.

आज माझ्या मुलीच्या पुण्यातील राहत्या घरी मी पत्रकार परिषद घेतली. या पत्रकार परिषदेला काही अनोळखी लोक शिरले असल्याचे पत्रकार बांधवांनी माझ्या निदर्शनास आणून दिले.या माणसांना आम्ही जाब विचारला तर त्यांनी पोलीस कर्मचारी असल्याचे सांगितले.

### पुणे रेव्ह पार्टी प्रकरणी प्रांजल खेवलकरसह ५ जणांना दोन दिवसांची पोलीस कोठडी

पुणे : संपूर्ण महाराष्ट्रात खळबळ उडवून देणाऱ्या हाय-प्रोफाइल पुणे रेव्ह पार्टी प्रकरणी आज शिवाजीनगर न्यायालयात महत्त्वपूर्ण सुनावणी पार पडली. याप्रकरणी मुख्य आरोपी प्रांजल खेवलकरसह पाच जणांना दोन दिवसांची पोलीस कोठडी सुनावण्यात आली आहे, तर दोन महिला आरोपींना न्यायालयीन कोठडीत पाठवण्याचा आदेश न्यायालयाने दिला. या निकालामुळे आता प्रकरणाच्या तपासाला नवी दिशा मिळण्याची शक्यता आहे. आजच्या सुनावणीवेळी राष्ट्रवादी काँग्रेसच्या नेत्या रोहिणी खडसे आणि ठाकरे गटाच्या नेत्या रुपाली पाटील ठोंबरे यांनी वकिलाच्या भूमिकेत कोर्टात हजेरी लावल्याने या प्रकरणाला आणखी महत्त्व प्राप्त झाले होते. पोलीस दलाच्या वतीने न्यायालयात बाजू मांडताना तपासातील महत्त्वाचे टप्पे आणि अडचणी मांडण्यात आल्या. पोलिसांनी खालील मुद्दे कोर्टासमोर ठेवले.

# गोपीनाथ मुंडेंच्या तिसऱ्या लेकीची निवडणुकीतून माघार

■ बीड

भाजपचे दिवंगत नेते आणि माजी केंद्रीय मंत्री गोपीनाथ मुंडे यांच्या तिसऱ्या कन्या यशश्री मुंडे या वैद्यनाथ अर्बन को-ऑपरेटिव्ह बँकेच्या संचालक मंडळाच्या निवडणुकीत रिंगणात उतरल्या होत्या. मात्र, त्यांनी अचानक निवडणुकीतून माघार घेतल्याने राजकीय वर्तुळात चर्चांना सुरुवात झाली आहे.

वैद्यनाथ बँकेच्या 17 संचालक जागांसाठी निवडणूक प्रक्रिया सुरू असून 10 ऑगस्ट रोजी मतदान होणार आहे. आज अर्ज माघारी घेण्याचा शेवटचा दिवस होता. खेळीमेळीच्या वातावरणात ही निवडणूक पार पडत असून यशश्री मुंडे यांनी माघार घेतल्यानंतर अनेकांच्या भुवया उंचावल्या आहेत.

दरम्यान, संचालक मंडळाने माजी खासदार डॉ. प्रीतम मुंडे यांच्याकडे नेतृत्वाची धुरा सोपवण्याचा निर्णय घेतला आहे. त्यामुळे प्रीतम मुंडे व सुरेखा मेनकुदळे या दोघी महिलांमध्ये बिनविरोध निवडून आल्या आहेत. निवडणुकीची अंतिम यादी उद्या (30 जुलै) जाहीर होणार असून 10 ऑगस्ट रोजी मतदान होणार आहे.

### यशश्री मुंडेंनी घेतला अर्ज मागे

### वैद्यनाथ बँकेची 10 ऑगस्ट रोजी निवडणूक

वैद्यनाथ बँकेच्या निवडणुकीसाठी पहिल्यांदाच यशश्री मुंडे निवडणुकीच्या रिंगणात उतरल्या होत्या. मात्र, त्यांनी आता माघार घेतली आहे. यशश्री मुंडे यांनी या पूर्वी वैद्यनाथ साखर कारखान्याचे कामकाज देखील पाहिले होते. मात्र संचालक मंडळाच्या निर्णयानुसार त्यांनी माघार घेतल्याचे दिसून आले आहे.

# धुळे जिल्ह्यात बस अपघातात विद्यार्थिनीचा मृत्यू, 22 प्रवासी जखमी

प्रतिनिधी

■ धुळे

राज्य परिवहन महामंडळाची शिरपूर- शिंदखेडा बस आणि भरधाव मालमोटार यांची धडक झाल्याने शाळकरी मुलींसह बसचे चालक वाहक आणि २२ प्रवासी जखमी झाले. या अपघातात आठ वर्षांच्या एका मुलीचा मृत्यू झाला. शिंदखेडा तालुक्यात मुंबई-आग्रा महामार्गावरील दभाषी फाट्यावर हा अपघात झाला.

शिंदखेडा आगाराची शिरपूर बस सकाळी शिंदखेडा येथे जाण्यासाठी निघाली होती. मुंबई-आग्रा महामार्गावरील दभाशी फाट्यावर बस आली असता भरधाव मालमोटारीची बसला समोरुन धडक बसली. अपघातात नुपूर सोनवणे (आठ, रा.पाटण, शिंदखेडा) या विद्यार्थिनीचा मृत्यू झाला. बसचे चालक शैलेंद्र परदेशी आणि राहुल विंचुरकर यांच्यासह बसमधील २३ पैकी २२ प्रवासी जखमी झाले. दभाशी गावाजवळील वळणावर बस चालकाला समोरून भरधाव येणाऱ्या मालमोटारीचा अंदाज आला नाही. यामुळे मालमोटार बसवर धडकली, अशी माहिती घटनास्थळी उपस्थित असलेल्यांकडून देण्यात आली.

## ‘डीजे’ला विसर्जन मिरवणुकीच्या दुसऱ्या दिवशीची परवानगी घेण्याची गरज नाही

प्रतिनिधी

■ पुणे

गणेशोत्सव काही दिवसांवर येऊन ठेपला आहे. सर्वत्र गणरायाच्या आगमनासाठी लगबग सुरु झाली आहे. घरगुती गणपतींसह मंडळांकडूनही जय्यत तयारी सुरु आहे.या पार्श्वभूमीवर पुणे शहरात विसर्जन मिरवणुकीसाठी कडक नियोजन आखण्यात आलं असून, पोलिस आयुक्त अमितेश कुमार यांनी यासंदर्भात महत्वाचे निर्णय जाहीर केले आहेत. यावेळी त्यांनी टिळक रोडवरील मागील वर्षीच्या नियोजनातील त्रुटी मान्य करत यंदा अधिक काटेकोर नियोजन करण्याचा निर्धार व्यक्त केला.

गणेशोत्सवाच्या पार्श्वभूमीवर खबरदारी म्हणून पुणे पोलीस आयुक्त अमितेश कुमार यांनी यासंदर्भात महत्वाचे निर्णय जाहीर केले आहेत. ते म्हणाले, “ गणपती विसर्जन मिरवणुकीच्या दिवशी वापरण्यात येणाऱ्या डीजे सिस्टीमसाठी दुसऱ्या दिवशी वेगळी परवानगी घेण्याची आवश्यकता नाही. दहाव्या दिवशी मिळालेली परवानगी अकराव्या दिवशीसाठी वैध राहील यासंदर्भात लवकरच लिखित आदेश काढण्यात येतील. तसेच यंदाचा गणेशोत्सव पूर्णपणे निर्बंधमुक्त असणार आहे. मात्र, कार्यकर्त्यांनी स्वानुशासन पाळावे.” असे आवाहन पुणे आयुक्तांनी केले आहे.

पुढे अमितेश कुमार म्हणाले,” टिळक रोडवरील मिरवणूक रात्री १२ वाजेपर्यंत पूर्ण करण्याचा पोलिसांचा प्रयत्न असून, हे शक्य आहे की नाही हे माहीत नाही, पण नागरिकांचा पाठिंबा मिळाल्यास नक्कीच साध्य होईल. तसेच विसर्जन मिरवणुकीच्या दिवशी कोणताही व्यक्ती दारू विकत घेताना आढळल्यास संबंधित दुकानांवर कठोर कारवाई केली जाईल. आणि अशी कारवाई करु की त्या दुकानदाराच्या ७ पिढ्या विसरू शकणार नाहीत.” असा कठोर इशाराही आयुक्तांनी दिला.

दरम्यान मिरवणुकीच्या दिवशी शाळांच्या आवारात वाहन पार्किंगची व्यवस्था करण्यावर विचार सुरु असून टिळक रोडवर एक स्वतंत्र स्वागत कक्षही उभारण्यात येणार असल्याचं पुणे पोलिस आयुक्त अमितेश कुमार म्हणाले आहेत. पुणे पोलिस दल हे सर्व गणेश भक्तांच्या पाठीशी ठामपणे उभं असून, शिस्त आणि सहकार्याच्या माध्यमातून यंदाचा गणेशोत्सव अधिक साजेसा आणि सुरक्षित करण्याचा निर्धार यावेळी पोलिस प्रशासनाने व्यक्त केला आहे.

# मालेगावात पुन्हा शिक्षक भरती घोटाळा

## 2 कोटी 69 लाखात फसवणूक केल्याचे उघड

प्रतिनिधी

■ नाशिक

पाच जणांवर गुन्हा दाखल

शिक्षक भरती घोटाळा पुन्हा एकदा मालेगावमध्ये उघड झाला आहे. विशेष म्हणजे शिक्षणमंत्र्यांच्या गावातच हे प्रकार उघड होत असल्याचे समोर येत आहे. आता उघडकीस आलेल्या घोटाळयात सेवाज्येष्ठता डावलून मागील १३ वर्षांपासून नियुक्ती करण्यात आल्याचे शिक्षकांना भासविण्याचा आले होते. हे प्रकरण उघडकीस आल्यानंतर पाच जणांविरोधात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

नाशिकच्या मालेगाव शहरातील उर्दु माध्यमाच्या बडी हायस्कुलमध्ये हा घोटाळा उघडकीस आला आहे. या शाळेत सेवा जेष्ठता डावलून शिक्षकांची नव्याने नियुक्ती करण्यात आली होती. मात्र या शिक्षकांना मागील १३ वर्षा पासून कार्यरत असल्याचे भासवत शासनाला दोन कोटी ६९ लाख ५६ हजारांना फसविल्याचे उघडीस आले आहे. या प्रकरणी मालेगावच्या पवार वाडी पोलिसात संस्थाचालक व मुख्याध्यापकासह तीन जणां विरोधात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. शाळेत नियुक्त करण्यात आलेल्या शिक्षिकेने दिलेल्या तक्रारीवरून दोन शिक्षिकांची २०१३ मध्ये विनाअनुदानित तत्वावर नियुक्ती करण्यात आली होती. त्यानुसार काम करीत असतांना त्यांना २० टक्के अनुदान तत्वावर लाभ देण्यात आला होता. मात्र याच हायस्कुल मध्ये २०२४ मध्ये १३ शिक्षक २०१२ ते २०२१ या काळात कार्यरत असल्याचे बनावट कागदपत्र सादर करून शिक्षणाधिकारी यांच्याकडे संच मान्यतेसाठी प्रस्ताव पाठविण्यात आला आणि तो मंजूर होऊन त्यांना १०० टक्के अनुदान लागू झाले.

**पाच जणांवर गुन्हा दाखल**

दरम्यान या शिक्षकांच्या थकीत वेतानापोटी दोन कोटी ६९ लाख ५६ हजार रुपयांचा लाभ घेतल्याचे देण्यात आलेल्या तक्रारीत नमूद करण्यात आले आहे. याची दखल घेत पोलिसांनी संस्थाचालक, मुख्याध्यापक, वरिष्ठ लिपिक, लिपिक व महापालिका शिक्षण मंडळ शाळेतील एक शिक्षक अशा पाच जणांविरोधात गुन्हा दाखल केला आहे.

## शाळेत जाताना विद्यार्थिनीवर काळाची झडप

# चिखलात सायकल स्लिप होताच ट्रॅक्टरची धडक, विद्यार्थिनीचा जागीच मृत्यू

प्रतिनिधी

■ भंडारा

रोजप्रमाणे शाळेत जाण्यासाठी निघालेल्या विद्यार्थिनीवर काळाने झडप घातली आहे. पावसामुळे रस्त्यावर झालेल्या चिखलात सायकल स्लिप झाली. यामुळे खाली पडताच ट्रॅक्टरने धडक दिली. यात मुलीचा जागीच मृत्यू झाल्याची घटना भंडाऱ्याच्या बाम्हणी येथे घडली आहे. तर तिच्यासोबत असलेल्या मैत्रिणी थोडक्यात बचावल्या आहेत.

भंडारा जिल्ह्यातील बाम्हणी येथे सदरची घटना आज सकाळी घडली. सिमरन श्याम ठवकर (वय १५) असे अपघातात मृत झालेल्या विद्यार्थिनीचे नाव आहे. दरम्यान सिमरन हि रोज सकाळी सायकलने शाळेत जात असायची. त्यानुसार आज देखील सकाळी ती चार मैत्रिणीसोबत सायकलवरून शाळेकडे निघाली होती. पण, काही अंतरावर गेल्यानंतर नियतीने घात केला आणि सिमरनला जीव गमवावा लागला आहे.

दरम्यान पाऊस झाल्यामुळे रस्त्यांवर चिखल झाला आहे. रस्त्यावरील चिखलामुळे सिमरनची सायकल स्लीप झाली आणि ती खाली कोसळली. याच वेळी समोरून येणाऱ्या ट्रॅक्टरच्या मागचा लोखंडी भाग सिमरनच्या डोक्याला लागला. यामुळे डोक्यातून मोठ्या प्रमाणावर रक्तस्राव झाल्याने तिचा जागीच मृत्यू झाला. सोबतच्या इतर मैत्रिणी थोडक्यात बचावल्या. हा हृदयद्रावक अपघात बाम्हणी रस्त्यावर घडला.

## पोलिसी अमानुषतेचा कळस

# तिघा तरुणांना मारहाण करुन लैंगिक कृत्य करण्यास भाग पाडले

प्रतिनिधी

■ जळगाव

अल्पवयीन मुलीच्या अपहरणाच्या संशयावरुन ताब्यात घेतलेल्या तीन तरुणांना पट्ट्याने अमानुषपणे मारहाण करून त्यांना परस्परांशी लैंगिक चाळे करण्यास भाग पाडले. या प्रकरणी पोलिस उपनिरीक्षक सज्जनसिंह नार्हेडा निलंबित करण्यात आले आहे. या प्रकारामुळे जळगाव जिल्ह्यासह खान्देशात खळबळ उडाली आहे.

चोपडा ग्रामीण पोलिस स्टेशनला दाखल गुन्ह्यात अल्पवयीन मुलीला पळवून नेल्याच्या गुन्हा दाखल होता. याप्रकरणात संशयित म्हणून तिघा तरुणांना पोलीस उपनिरीक्षक सज्जनसिंह नार्हेडाने पोलीस स्टेशनला बोलावले होते. यानंतर या तिघा तरुणांना अंगावरचे कपडे काढून त्यांना पट्ट्याने अमानुषपणे मारहाण केली. यावेळी या तिघा तरुणांना नग्न व्हायला सांगून एकमेकांसोबत लैंगिक चाळे करायला भाग पाडल्याचा घाणेरडा प्रकार पोलीस उपनिरीक्षक सज्जनसिंह नार्हेडा याने पोलीस स्टेशनमध्ये केल्याचे म्हटले जात आहे.

एका महिलेला सुद्धा अश्लील शिवीगाळ करून तिला मारहाण केल्याची तक्रार महिलेने केली आहे. या गंभीर घटनेनंतर संबंधित पीडित तरुणांच्या कुटुंबियांनी तसेच एका संघटनेने तक्रार केल्यानंतर पोलीस उपनिरीक्षकाला निलंबित करुन त्याची चौकशी करण्यात येत आहे. पोलीस उपनिरीक्षक उपनिरीक्षक सज्जनसिंह नार्हेडा यांच्यावर गुन्हा दाखल करून कठोर कारवाई करण्याची मागणी पीडित तरुणांच्या कुटुंबीयांसह एका संघटनेने निवेदनाद्वारे पोलीस अधीक्षकांकडे केली आहे. याप्रकरणी पोलीस उपनिरीक्षक उपनिरीक्षक सज्जनसिंह नार्हेडा याला निलंबित करण्यात येऊन त्याची विभागीय चौकशी सुरू करण्यात आली आहे. चौकशीत दोषी निष्पन्न झाल्यानंतर गुन्हा दाखल करून पुढील कारवाई करण्यात येईल अशी माहिती पोलिसांनी दिली आहे.

## स्मार्ट मीटर सक्तीविरोधात सावंतवाडीत ग्राहकांचे आंदोलन; वीज वितरण कंपनीला घेराव

प्रतिनिधी

■ सावंतवाडी

वीज ग्राहकांच्या परवानगीशिवाय स्मार्ट मीटर बसवून त्यांना भरमसाठ वीज बिल आकारले जात असल्याच्या निषेधार्थ ठाकरे शिवसेनेसह सर्व पक्षीय ग्राहकांनी आज सावंतवाडीत तीव्र आंदोलन केले. शहर संघटक निशांत तोरसकर यांच्या नेतृत्वाखालील



कार्यकर्त्यांनी वीज वितरण कंपनीचे उपअभियंता श्री. राक्षे यांना घेराव घालून जाब विचारला. स्मार्ट मीटरची सक्ती तात्काळ थांबवावी आणि परवानगीशिवाय बसवलेले मीटर त्वरित काढून टाकावेत, अन्यथा ४ ऑगस्ट रोजी जनआंदोलन छेडण्याचा इशारा यावेळी आंदोलकांनी दिला.

सावंतवाडी तालुक्यात सुमारे ४ हजार स्मार्ट मीटर नादुरुस्त ठरवून ग्राहकांना सक्तीने लावण्यात आले असल्याचा आरोप यावेळी करण्यात आला. या स्मार्ट मीटरमुळे ग्राहकांना दुप्पट बिले येत असल्याने ते आर्थिक अडचणीत सापडले आहेत, असेही आंदोलकांनी अधिकाऱ्यांच्या निदर्शनास आणून दिले. खासगी कंपन्यांच्या फायद्यासाठी सर्वसामान्य जनतेवर आर्थिक भुर्दंड लादू नये, अशी मागणीही यावेळी करण्यात आली.

# 80 लाखांच्या फसवणूकप्रकरणी पणदरेच्या टोळीविरुद्ध दोषारोपपत्र दाखल!

प्रतिनिधी

■ पुणे

ठरवून दिलेल्या कंपनीला मालाची विक्री न करता पदाचा गैरवापर करत 'सॉफ्टहार्ट ऑटोमेशन कंपनी प्रा. लि.'ची 80 लाखांना फसवणूक केल्याप्रकरणी सात आरोपींच्या विरोधात नुकतेच दोषारोपपत्र दाखल करण्यात आले आहे. फसवणूक करणाऱ्या या टोळीतील प्रमुख आरोपी मूळचे पणदरे (ता. बारामती) येथील असून सध्या पुण्यात वास्तव्यास आहेत.

सॉफ्टहार्ट ऑटोमेशन कंपनीच्या विक्री विभागातील माधव कल्याण जगताप (वय 36), धनश्री माधव जगताप (वय 33, दोघेही रा. मूळ पणदरे ह.मु. जय शंकर अपार्टमेंट, आंबेगाव पठार), राहुल अनिल सुलाखे (रा. साई अंगण सोसायटी, इंद्रायणीनगर), प्रशांत जयराम जगताप (35, रा. गोकुळनगर, कात्रज), पूजा सचिन जगताप (34, रा. कात्रज-कोंढवा रस्ता), मीनाक्षी कदम आणि धर्मेंद्र रामचंद्र सुतार (47, रा. वाहगाव, कराड) यांच्याविरोधात हे दोषारोपपत्र दाखल करण्यात आले आहे.

IPC कलम 420 (फसवणूक), 408 (विश्वासघात) आणि 34 (सामूहिक सुनियोजित गुन्हा) यानुसार हे दोषारोपपत्र आहे. 2018 ते 2022 दरम्यान, हा अपहाराचा गुन्हा घडल्याची तक्रार 2024 मध्ये कंपनीच्या अशोक विठोबा वर्षे यांनी सहकारनगर पोलिस ठाण्यात फिर्याद दिली आहे. त्यानुसार आरोपींवर गुन्हा दाखल करण्यात आला आहे. माधव कल्याण जगताप व कंपनीचे यापूर्वीचे कामगार राहुल अनिल सुलाखे, पूजा जगताप, मीनाक्षी कदम व धर्मेंद्र सुतार यांनी त्यांच्या पदाचा व अधिकाराचा गैरवापर व आपसांत संगनमत करून अपहार केला.

फिर्यादी कार्यरत असलेल्या कंपनीच्या मालाची एका नामांकित कंपनीला विक्री न करता अन्य कंपन्यांना परस्पर विक्री केली. त्यातून आलेली 79 लाख 10 हजार 499 इतकी रक्कम कंपनीच्या खात्यावर न भरता माधव जगताप याने स्वतः, पत्नी धनश्री जगताप व मित्र प्रशांत जगताप यांच्या खात्यावर जमा करून कंपनीची फसवणूक केली. बनावट सेल्स ऑर्डर, बनावट बिलिंग, इतर कंपन्यांना माल विक्री, कंपनी ERP/ टॅलीमध्ये नोंदी न करता हे पैसे स्वतःच्या/नातेवाईकांच्या खात्यात वळवले गेले.

हा माल संजय साहू (शेजल रेफ्रिजरेशन), कॉनकॉर्ड इंजिनिअर, रनोमॅन लॉजिस्टिक्स, अक्षय एअरकॉन, रुपेश कोहली (लखनऊ) यांसारख्या विविध कंपन्यांना विकला. तपासादरम्यान सातही आरोपींची माहिती,

## मोटार सुरु करताना विजेच्या धक्क्याने महिलेचा मृत्यू

**जळगाव :** पाणी भरण्यासाठी मोटार सुरु होती. याच वेळी वीजपंपाला स्पर्श होऊन विजेचा जोरदार झटका बसला. यात महिलेचा मृत्यू झाल्याची घटना भुसावळ तालुक्यातील वांजोळा येथे घडली आहे. दरम्यान या घटनेनंतर मात्र महिलेच्या माहेरच्या मंडळींनी सासरच्या मंडळींवर आरोप करत घातपात केल्याचा संशय व्यक्त केला आहे. या प्रकरणी पोलिसांकडून अधिक तपास सुरु आहे. भुसावळ तालुक्यातील वांजोळा येथील दीपाली चेतन तायडे (वय २५) असे घटनेत मृत झालेल्या महिलेचे नाव आहे. महिलेच्या पश्चात पती, चार वर्षांचा मुलगा आणि दोन वर्षांची मुलगी असा परिवार आहे. सदरची घटना २५ जुलैला घडली आहे.

## जगातील पहिले ऑटोमॅटिक टी मेकर 'चाय मॅजिक' लाँच

**मुंबई :** भारतातील आघाडीचा किचन अप्लायन्स ब्रँड वंडरशेफने आज भारतीय शैलीतील चहासाठी डिझाइन केलेले जगातील पहिले ऑटोमॅटिक टी मेकर चाय मॅजिक लाँच केले. लाँचप्रसंगी वंडरशेफचे सह-संस्थापक शेफ संजीव कपूर आणि रवी सक्सेना उपस्थित होते. या लाँचप्रसंगी चाय मॅजिकचा लाईव्ह डेमोदेखील दाखवण्यात आला, ज्यामध्ये मसाला चहापासून ते आल्याच्या चहापर्यंत आणि क्लासिक दुधाच्या चहापासून ते काश्मिरी कहवापर्यंत विविध प्रकारच्या चहा बनवण्याचे प्रात्यक्षिक दाखवण्यात आले. चाय मॅजिक वापरण्यास अत्यंत सोपे आहे आणि पूर्ण नियंत्रणासह स्वादिष्ट चहा कसा तयार करतो हे डेमोमध्ये दाखवण्यात आले. यामध्ये, चहा बनवण्याची प्रक्रिया कोणत्याही देखरेखीशिवाय आपोआप पूर्ण होते, फक्त एक बटण दाबून तुम्ही तुमच्या आवडत्या चहाचा आनंद घेऊ शकता.




## गणेश विसर्जनासाठी 'आरे भास्कर'वर कृत्रिम तलाव उभारण्याची मागणी

प्रतिनिधी
■ मुंबई



गोरेगाव पूर्व येथील प्रभाग क्र. ५२ मध्ये गणेश भक्तांसाठी कृत्रिम तलाव व सजावट करावी. अशी माजी नगरसेविका प्रिती सातम यांनी मुंबई महापालिकेकडे लेखी स्वरूपात केली आहे.प्रभाग क्र. ५२ मध्ये गणेश भक्तांना सुरक्षित, सन्मानपूर्वक व भक्तिपूर्ण विसर्जनाची सुविधा मिळावी, म्हणून त्यांनी ही मागणी केली आहे.

गेल्या पाच वर्षांपासून गोकुळधाम आरे भास्कर मैदान येथे कृत्रिम तलावाची व्यवस्था करण्यात येत असून, नागरिकांना पर्यावरणस्नेही आणि सुरक्षित विसर्जनाचा पर्याय दिला जात आहे. परंतु, यावर्षी अद्याप कोणतीही तयारी सुरू नसल्यामुळे नागरिकांमध्ये चिंतेचे वातावरण निर्माण झाले आहे. त्यामुळे यंदाही आरे भास्कर मैदान येथे लवकरात लवकर कृत्रिम तलावाची उभारणी करण्यात यावी, अशी त्यांची आग्रही मागणी आहे. प्रिती सातम यांनी विसर्जन स्थळी भाविकांचा अनुभव अधिक सुरक्षित, भक्तिमय आणि सुंदर व्हावा, यासाठी सौंदर्यीकरणाच्या खालील बाबी महापालिकेकडे सुचवल्या आहेत:

### या सुविधाही हव्यात

- कृत्रिम तलाव परिसरात आकर्षक लाईटिंग, पारंपरिक फुलांची सजावट
- गणेश संकल्पनेवर आधारित थीम मंडप व फोटोपॉइंट्स – "बाप्पा मोरया", "Eco-Friendly Visarjan 2025"
- महिलांसाठी व ज्येष्ठ नागरिकांसाठी बसण्याची सोय आणि शुद्ध पिण्याचे पाणी
- पर्यावरण जनजागृती करणारे माहिती फलक व विसर्जन मार्गदर्शक
- प्राथमिक उपचार सुविधा
- सुस्थित स्वच्छता, कचरापेट्यांची सोय आणि तत्काळ साफसफाई व्यवस्था



*मुंबई : शिवसेना पक्ष प्रमुख उद्धव बाळासाहेब ठाकरे यांच्या वाढदिवसानिमित्त शिवसेना शाखा कांजूरमार्ग पूर्व येथे आधार कार्ड शिबीर आयोजित करण्यात आले होते. म्युनिसिपल कामगार सेना अध्यक्ष बाबा कदम, शाखाप्रमुख रविन्द्र महाडिक, युवासेना सहसचिव योगेश पेडणेकर, विश्वास घाग, मिलिंद खानविलकर, विपुल शिंदे, प्रकाश खानविलकर हेमचंद्र गोलतकर हे या शिबिराचे आयोजक होते.*

## जा करायचंय ते कर, निघ इथून आणि लायकीत राहा!

● मैदानातच घातला गंभीर यांनी पिच क्युरेटर्सशी वाद ● ३१ जुलैपासून सुरु होणार पाचवी कसोटी

वृत्तसंस्था
■ लंडन

मंगळवारी टीम इंडियाचे मुख्य प्रशिक्षक गौतम गंभीर यांचा ओव्हल क्रिकेट स्टेडियमचे मुख्य पिच क्युरेटर ली फोर्टिस यांच्याशी वाद झाला. वृत्तसंस्था पीटीआयने या वादाचा व्हिडिओ प्रसिद्ध केला. इतकेच नाही तर भारतीय प्रशिक्षक पिचवर खूश नसल्याचा दावाही त्यांनी केला.फोर्टिस यांना गंभीर यांनी जा काय करायचे ते कर ,निघ इथून आणि लायकीचा राहा ,अशा संतप्त शब्दांत सुनावले

गंभीर खेळपट्टीची पाहणी करत असताना ही घटना घडली. काही मुद्द्यांवरून दोघांमध्ये जोरदार वाद झाला. टीम इंडियाचे 'महागुरू'गंभीर यांनी पिच क्युरेटरला मैदानातच खडे बोल सुनावले. भारत आणि इंग्लंड यांच्यातील कसोटी मालिकेतील पाचवा सामना ३१ जुलैपासून येथे खेळला जाणार आहे. भारताला तो जिंकून मालिका २-२ अशी बरोबरी साधण्याची संधी आहे. सध्या इंग्लंड संघ २-१ असा बरोबरीत आहे.




### खेळपट्टीच्या परिस्थितीवर गंभीर नाखूष

गंभीर खेळपट्टीच्या सेटिंग्जवर रागावलेला दिसत होता आणि मैदानावर पोहोचल्यानंतर ते थेट क्युरेटरशी बोलले. खेळपट्टीची स्थिती आणि वर्तन याबाबत दोघांमध्ये मतभेद दिसून आले.सूत्रांनी दिलेल्या माहितीनुसार, गंभीर म्हणाले, "तू इथे फक्त ग्राउंड्समन आहेस." खेळाडू त्यांच्या रन-अप क्षेत्रांचे चिन्हांकन करत असताना नेट्समध्ये वाद झाला. नंतर, फलंदाजी प्रशिक्षक सीतांशू कोटक आले आणि क्युरेटरला सोबत घेऊन गेले आणि त्यांच्याशी बोलले, तर गंभीर अजूनही दूरवरून क्युरेटरशी वाद घालत होता.

## माझ्या पोरीनं जग जिंकलंय! जरा थांबा मला फक्त एक मिनिट द्या!!

### दिव्या ग्रँडमास्टर झाल्याचं कळताच काकू डॉ. स्मिता देशमुख यांची रुग्णांना विनंती




प्रतिनिधी
■ नागपूर

महिला बुद्धिबळ विश्वचषकामध्ये नागपूरच्या दिव्याने भारताच्याच कोनेरू हम्पीचा पराभव केला. दिव्या जिंकल्यावर तिच्या कुटुंबियांना आनंद झाला आहे. दवाखान्यामध्ये असलेल्या तिच्या काकू डॉक्टर स्मिता देशमुखांनी विजयाची बातमी समजल्यावर पेशंटला थांबायला लावल्याचं सांगितलं.

दिव्याच्या काकू डॉ. स्मिता देशमुख यांनी आपल्या भावना व्यक्त करताना सांगितलं, मी हॉस्पिटलमध्ये पेशंट बघत होते, पण जेव्हा दिव्याच्या विजयाची बातमी आली, तेव्हा मी पेशंटला थांबायला सांगितलं मी त्यांना म्हणाले की, मला फक्त एक मिनिट द्या माझ्या मुलीने जग जिंकली जिंकलंय .हा आमच्या कुटुंबासाठी, नागपूरसाठी आणि देशासाठी अत्यंत अभिमानाचा क्षण आहे. दिव्याने जी मेहनत केली, तिचं फळ आज मिळालं.

### ही नागपूरसाठी ऐतिहासिक उपलब्धी

नागपूर चेस असोसिएशनचे अध्यक्ष एस.एस. सोमण यांनी सांगितलं, ही नागपूरसाठी ऐतिहासिक उपलब्धी आहे. दिव्याने केवळ स्पर्धा जिंकली नाही, तर भारतातल्या एक अत्यंत अनुभवी खेळाडूला नमवत आपली बुद्धिबळातील ताकद दाखवून दिली. ही तिच्या करिअरमधील महत्त्वाची उंची आहे. दिव्या देशमुखचा हा विजय म्हणजे वयाच्या मर्यादा पार करून केवळ कौशल्य, चिकाटी आणि मानसिक समृद्धतेचा विजय आहे. तिचं लवकरच आंतरराष्ट्रीय बुद्धिबळ पटलावर प्रबळ स्थान निर्माण होईल, असा विश्वास बुद्धिबळ क्षेत्रातील जाणकार व्यक्त करत आहेत.

## निवासी चाळीतील बेकायदेशीर लोखंडी कारखान्यामुळे नागरिकांचा जीव धोक्यात

### रहिवाश्यांकडून कारवाईची मागणी

प्रतिनिधी
■ मुंबई

घाटकोपर वॉर्ड क्रमांक १२९ मधील पारशी वाडीच्या अंबिका बुक डेपोसमोर बनवारी चाळीत बेकायदेशीरपणे लोखंडी कारखाना चालवला जात असल्यामुळे स्थानिक रहिवाशांच्या जीवाला गंभीर धोका निर्माण झाला आहे. हा परिसर पूर्णपणे निवासी आहे, जिथे मध्यम आणि निम्नवर्गीय कुटुंबे राहतात. या निवासी भागात कोणताही वैध परवाना, अग्निशमन दलाचा एनओसी आणि महापालिकेच्या परवानगीशिवाय बेकायदेशीर लोखंडी कारखाना चालवला जात आहे.

असे सांगितले जात आहे की कारखाना चालवणारा राकेश अग्निहोत्री नावाचा व्यक्ती आहे, ज्याचे वर्तन कटक आहे आणि तो स्थानिक लोकांना विरोध केल्यास धमकावतो. याबाबत स्थानिक सामाजिक कार्यकर्ते नागेश खरटमोल यांनी मुख्यमंत्री, महानगरपालिका आयुक्त आणि पोलिस आयुक्तांना पत्र लिहून हा कारखाना तात्काळ बंद करण्याची मागणी केली आहे. प्रशासनाने वेळीच हे बेकायदेशीर काम थांबवले नाही तर ते मुंबई उच्च न्यायालयात जनहित याचिका दाखल करतील, असा इशारा त्यांनी दिला आहे. यात नागेश खरटमोल यांनी म्हटले आहे की, कारखान्यात घरगुती एलपीजी सिलिंडरचा व्यावसायिक वापर केला जात आहे, ज्यामुळे गॅसचा स्फोट होण्याचा मोठा धोका आहे. विजेच्या जास्त भारामुळे यापूर्वी अनेक वेळा शॉर्ट सर्किट झाले आहेत, ज्यामध्ये जवळच्या झोपडपट्ट्यांमध्ये राहणारे नागरिक जखमी झाले आहेत. इतकेच नाही तर कारखान्यात काम करणाऱ्या कामगारांकडे कोणतेही सुरक्षा उपकरणे नाहीत, ज्यामुळे कधीही मोठी दुर्घटना घडू शकते. काही महिन्यांपूर्वी, त्याच परिसरात शॉर्ट सर्किटच्या घटनेत एका १० वर्षांचा मुलागा गंभीरपणे भाजला होता. या कारखान्यातील 'अर्धा माला देखील बेकायदेशीरपणे बांधण्यात असून तो पूर्णपणे जीर्ण अवस्थेत आहे आणि कधीही कोसळून जीवघेणा अपघात होऊ शकतो.

## अंधेरी साईवाडीत जेष्ठ नागरिकांसाठी दर बुधवारी आरोग्य शिबिर

**मुंबई:** श्रीसाईनगर लोकसेवा समिती हाउसिंग फेडरेशन संस्था संघटना) साईवाडी (अंधेरी पूर्व) येथे ३०/०७/२०२५ पासून श्रीसाईनगर(साईवाडी) ऑफिसमध्ये जेष्ठ नागरिक आणि रहिवासी यांच्यासाठी दर बुधवारी (वेळ दुपारी १:३० ते संध्याकाळी ५:००) या वेळेत आरोग्य शिबीर आयोजित करण्यात येत असते, सदर शिबीरात पूर्ण मोफत चेकअप व सर्व आजारांवर मोफत औषधोपचार घेऊन लाभ घ्यावा. असे आवाहन मधू शिरोडकर, शशिकांत लाखन, दिपक भाऊ सावंत, श्रध्दानंद जाधव, वासुदेव दळवी, गिरीश शेलार, वासुदेव पाष्टे, शंकरराव सुगदरे, अनुराधा मोहिते ताई,विश्वनाथ पाटणकर, सतिश राणे, सुहास कदम, विलास कदम यांनी केले आहे.

## मुंब्रा येथे युथ ॲथलेटिक्स स्पर्धा

**ठाणे:** सालाबाद प्रमाणे यंदा हि प्रज्ञा वर्धिनी फॉउंडेशन आणि मॅक्सज्ञान स्पोर्ट्स ह्यांनी राष्ट्रीय क्रीडा दिनानिमित्त येत्या शनिवारी, 2 ऑगस्ट 2025 रोजी टीएमसी स्टेडियम, मुंब्रा, ठाणे येथे १९ वर्षांखालील यूथ ॲथलेटिक्स स्पर्धा* आयोजित केली आहे. ठाणे आणि नवी मुंबई जिल्ह्यातील 50 पेक्षा विविध शाळा आणि महाविद्यालयांमधील ४०० हुन अधिक खेळाडू या स्पर्धेत सहभागी होतील. भारतासाठी ऑलीम्पियन्स खेळाडू घडवण्याचे ध्येय आयोजकांनी ठेवले आहे. ठाणे जिल्हा ॅअथलेटिक्स संघटनेच्या सहकार्याने स्पर्धा होत आहे. स्पधेला सकाळी आठ वाजता सुरवात होईल.१४,१७,१९ वर्षाखालील विविध वयोगटात स्पर्धा,शर्यती होतील.स्पर्धेच्या आधिक माहितीसाठी मो.क्र.९९२०११९२५४,९८२०३८२११७ यावर संर्पक साधावा.

राज्य सहकारी संघ निवडणूकीत 'सहकार पॅनेल'चे निर्विवाद वर्चस्व

## दरेकर-कुसाळकर-नलावडेंच्या नेतृत्वाखालील सहकार पॅनेलचे 21 पैकी 20 उमेदवार विजयी

प्रतिनिधी
■ मुंबई



१०६ वर्षांची परंपरा लाभलेल्या महाराष्ट्र राज्य सहकारी संघाच्या २०२५-२०३० पंचवार्षिक निवडणुकीत आमदार प्रवीण दरेकर, राज्य सहकारी संघाचे नेते संजीव कुसाळकर आणि सहकारातील ज्येष्ठ नेते शिवाजीराव नलावडे यांच्या नेतृत्वाखालील 'सहकार पॅनेल'ने २१ पैकी २० जागांवर निर्विवाद वर्चस्व मिळवित मोठा विजय संपादित केला आहे. महाराष्ट्रातील सहकार चळवळ पुन्हा ताकदीने कशी पुढे येईल यासाठी दिशादर्शक मार्गदर्शन करणारा संघ ठरेल, असा विश्वास यावेळी भाजपा गटनेते आणि मुंबई बँकेचे अध्यक्ष आ. प्रविण दरेकर यांनी व्यक्त केला.

मतदानाच्या निकालानंतर आयोजित पत्रकार परिषदेत बोलताना आ. प्रविण दरेकर यांनी या विजयाचे श्रेय मतदार, सहकार कार्यकर्ते आणि जनतेच्या विश्वासाला दिले. ते म्हणाले की, सहकार पॅनेलच्या २१ पैकी २० जागा निवडून आल्या आहेत. ही निवडणूक कार्यकर्त्यांनी लढवली. राज्यात इतिहास घडला आहे. राज्य सहकारी संघाला वैभवशाली परंपरा आहे. १०६ वर्षाचा इतिहास आहे. संघाला उर्जीतावस्था आणायची आहे. शिक्षण निधी, शिक्षकांच्या पगारांचे विषय आहेत. राज्य सहकारी संघाला पुन्हा वैभवाचे दिवस कसे येतील,

पूर्वीचे गतवैभव कसे मिळेल यासाठी प्रयत्नशील राहू. या निवडणुकीत सहकार पॅनलने सिद्ध केले की राज्यातील सहकारी चळवळीला नवे नेतृत्व आणि दिशा मिळू शकते. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, उपमुख्यमंत्री अजित पवार आणि एकनाथ शिंदे यांच्यासह केंद्र सरकारही सहकार क्षेत्रासाठी कटिबद्ध आहे. या निवडणुकीत सहकार पॅनेलला अभूतपूर्व असे यश मिळाले आहे. त्या यशाला, विश्वासाला अजिबात तडा जाऊ देणार नाही. येणाऱ्या काळात सहकार, शिक्षण-प्रशिक्षण अभियान मोहीम सुरु करू. संघाच्या विकासासंदर्भात चांगल्या संकल्पना घेऊन नवीन संचालक मंडळ काम करेल, असा विश्वासही दरेकर यांनी व्यक्त केला. तसेच या दणदणीत विजयाबद्दल सहकार पॅनेलच्या सर्व विजयी उमेदवारांचे अभिनंदन करत आमदार प्रवीण दरेकर यांनी सर्व मतदारांचे आभार मानले. या विजयामुळे राज्य सहकारी संघाला नव्या युगाची सुरुवात मिळाली असून, सहकार क्षेत्राला नवी दिशा मिळण्याची अपेक्षा असल्याचेही ते म्हणाले.

### विजयी अपक्ष उमेदवाराचा सहकार पॅनेलला पाठिंबा

सहकार पॅनेलचे २१ जागांपैकी ९ उमेदवार या आधीच बिनविरोध निवडून आले होते. तर उर्वरित १२ पैकी १० जागा एकहाती निवडून आणत आणि अपक्ष विजयी उमेदवार प्रमोद पिपरे यांनी पाठिंबा देत सहकार पॅनेलने एकूण २० जागांवर आपले वर्चस्व सिद्ध केले.

### सहकार पॅनेलचे विजयी उमेदवार

१) आमदार प्रविण दरेकर, मुंबई विभाग ,२) हिरामण सातकर, पुणे विभाग, ३) धनंजय कदम (शेडगे), कोल्हापूर विभाग ,४) संजय पाटील, नाशिक विभाग, ५) अरुण पानसरे, कोकण विभाग ,६) गुलाबराव मगर, औरंगाबाद विभाग, ७) विलास महाजन, अमरावती विभाग ,८) अशोक जगताप, विभागीय सहकारी संघ प्रतिनिधी, ९) प्रकाश दरेकर, राज्य स्तरीय संघीय संस्था प्रतिनिधी ,१०) संजीव कुसाळकर, इतर संस्था प्रतिनिधी, ११) रामदास मोरे ,१२) नितीन बनकर ,१३) सुनील जाधव-पाटील ,१४) नंदकुमार काटकर, १५) विष्णू घुमरे, अनुसूचित जाती-जमाती ,१६) अनिल गजरे, भटक्या विमुक्त जाती-जमाती, १७) अर्जुनराव बोरुडे, इतर मागास प्रवर्ग ,१८) जयश्री पांचाळ, महिला प्रतिनिधी, १९) दिपश्री नलावडे, महिला प्रतिनिधी

## खार अष्टविनायक महिला गोविंदा पथकांची उंच भरारी

### सरावाला सुरुवात,मुंबईसह पुणे, कोल्हापूरमध्येही हंड्या फोडल्या आहेत

प्रतिनिधी
■ मुंबई

मुंबई खार पुर्व साईबाबा मंदिर, साईबाबा एस आर ए बिल्डिंग विभागातील अष्टविनायक गोपिका गोविंदा पथक यंदा पंधराव्या वर्षात पदार्पण करत आहे. वांद्रे, खार, सांताक्रुझ (पुर्व) मुंबई विभागात मधिलांचा प्रथमच गोविंदा पथक सुरू करण्यात आले. यावर्षी मंडळ पंधराव्या वर्षात पदार्पण करत आहे. खार वांद्रे सांताक्रुज मधील प्रथम महिलांचे गोविंदा पथक सुरू करण्यात आले, सर्व विभागातील वरिष्ठांच्या विचाराने व आशीर्वादाने पहिल्या वर्षापासून हिंदू सण - संस्कृती जपण्याचा प्रयत्न या महिला गोविंदा पथकाने करण्यात आला. सराव ठिकाणः साई बाबा मंदिर, श्री साई बाबा बिल्डींग जवळ, खार (पूर्व) असे आहे.

गेली अनेक वर्ष विभागातील त्याचप्रमाणे मुंबई मधील नामांकित दही कला उत्सवात मानाच्या हंडीचा मान मिळवला त्याचप्रमाणे मागील वर्षात अष्टविनायक गोपिका गोविंदा पथकाने मुंबईत नव्हेच तर पुणे मधील मानाच्या दहीहंडी फोडण्याचा मान सुद्धा मिळवण्यात आला आहे. कोल्हापूरमध्ये झालेल्या स्पर्धेत अष्टविनायक महिला गोपिका गोविंदा पथकाने "प्रथम क्रमांक" पटकावून वांद्रे, खार, सांताक्रुज विभागात या मंडळाच्या महिला पथकांनी आपला ठसा उमटवून महिला सक्षमीकरणाचा उत्तम असा संदेश कोल्हापूरकरांना दिला आहे.

अष्टविनायक गोपिका गोविंदा पथकाचे एकच उद्दिष्ट एकच आहे की, नारीशक्ती ची ताकद ही काय आहे त्याचे महत्त्व जनतेला पटवून देणे. मंडळाचे प्रमुख व्यवस्थापक युवा नेता अमित ब्रिद यांनी विभागातील नागरिकांना आवाहन केले आहे की, आपण आपल्या मुलीला, बहिणीला, आमच्या या महिला गोविंदा पथकाचा एक गोविंदा पट्टू म्हणून सहभागी करुन घ्यावा, आपल्या विभागाच्या नाव सर्वत्र महाराष्ट्रभर या गोविंदाच्या माध्यमातून आपण सर्वांनी मिळून सर्वत्र पोहोचवूया.




## बेस्ट वीज ग्राहकांची होते परवड

### वीज बिल उशिरा येते व वेळेत भरले नाही तर दंड भरावा लागतो

प्रतिनिधी
■ मुंबई

बेस्ट उपक्रम तोट्यात सुरू आहे. परिवहन विभागातील बेस्ट च्या मालकीच्या बसेस कमी कमी होत आहेत. भाडेतत्वावरील बसेस सुद्धा ३ हजारहून कमी आहे. त्यामुळे बस थांब्यावर बस वेळेवर येत नसल्याने प्रवासी शेअर टॅक्सी किंवा रिक्षाने जातात.परिणामी बेस्ट चे प्रवासी कमी होत आहेत. अशीच काहीशी परिस्थिती बेस्ट च्या वीज विभागाची होत आहे. मुंबई शहर भागातील साडेदहा लाख बेस्टचे वीज ग्राहक आहेत. त्यांना उशिरा वीज बिल पाठवले जाते व वेळेनंतर बिल भरले नाही तर दंड आकारला जात आहे. त्यामुळे.बेस्ट चे वीज ग्राहक ही वैतागले असल्याचे पाहायला मिळत आहे.

भाजप वॉर्ड 199 चे माजी उपाध्यक्ष नरेश कनोजिया यांनी वीज बिल उशिरा येत असल्याची व वेळेत भरले नाही तर दंड आकारला जात असल्याचे माजी नगरसेविका आरती पुगांवकर यांना सांगितले. यासंदर्भात बेस्ट कामगार नेते व बेस्ट समितीचे माजी ज्येष्ठ सदस्य सुनील गणाचार्य हे पाठपुरावा करीत आहेत.

बिल भरणा केंद्र केवळ मंगळवार, गुरुवार आणि शनिवारी 9 ते 1 वाजेपर्यंत सुरू असते. अनेक ज्येष्ठ नागरिक सुद्धा या ठिकाणी रांगेत बराच वेळ उभे असतात. एक तर बिल उशिरा येते आणि विहित वेळेत भरले नाही तर दंड भरावा लागतो. बेस्ट कडे कर्मचारी कमी आहेत असे करण समोर येत आहे. परंतु लोकांच्या सुविधेसाठी सुरू असलेल्या केंद्रावर अशी वाताहत होत असेल तर कसे चालेल? असा सवाल नरेश कनोजिया यांनी विचारला आहे. कनोजिया यांनी पूगावकर व गणाचार्य यांना यात हस्तक्षेप करून याबाबत वरिष्ठ अधिकाऱ्यांना अवगत करावे आणि ही समस्या दूर करण्यासाठी सर्वतोपरी सहकार्य करावे. अशी विनंती केली आहे.

## छत्रपती शिवाजी महाराज मैदानातील धूळ निवारणासाठी पालिका घेणार आयआयटीची मदत

प्रतिनिधी
■ मुंबई

दादर छत्रपती शिवाजी महाराज मैदान परिसरात सुधारणा तसेच नियमित देखभाल, दुरूस्ती तसेच स्वच्छता करण्याच्या अनुषंगाने उपाययोजना कराव्यात; परिसरातील कट्ट्यांची दुरूस्ती करतानाच पुरेशा प्रकाश व्यवस्थेच्या उपाययोजना कराव्यात, धूळ निवारण्यासाठीय आय आय टी मदत घेण्याचे निर्देश बृहन्मुंबई महापालिका आयुक्त भूषण गगराणी यांनी विभागाच्या अधिकाऱ्यांना दिले. काल आयुक्तांनी मैदानाला भेट देऊन मैदान, पदपथ आणि परिसराच्या अनुषंगाने स्थानिक नागरिकांशी संवाद साधला. स्थानिक आमदार महेश सावंत, जी उत्तर विभागाचे सहायक आयुक्त विनायक विसपुते आदी याप्रसंगी उपस्थित होते.

छत्रपती शिवाजी महाराज मैदान परिसरातील पदपथांची नियमित देखभाल आणि दुरूस्ती करण्यात यावी. झाडांचे कठडे व्यवस्थित करतानाच सोप्या आणि आकर्षक रंगसंगतीने ते सुशोभित करावेत. तसेच बाक सुस्थितीत असावेत. जेष्ठ नागरिकांच्या दृष्टीने सुलभ आसन व्यवस्थेचे नियोजन करावे, अशा सूचना देखील गगराणी यांनी दिल्या.



### माहीम किल्ला परिसराला भेट

माहीम किल्ला परिसराला भूषण गगराणी यांनी भेट दिली. सदर किल्ला हा पुरातन वास्तू असून किल्ल्याचे जीर्णोद्धार व पुनरुज्जीवन करावयाच्या उपायोजना व परिसराचे सुशोभीकरण या बाबी एकत्रित विचारात घ्याव्यात. भविष्यात सदरचे ठिकाण मुंबईत येणाऱ्या पर्यटकांसाठी आकर्षण ठरणारे प्रेक्षणीय स्थळ म्हणून कशाप्रकारे विकसित करता येईल याचा विचार व्हावा, अशा सूचना गगराणी यांनी दिल्या.

### कट्टा डागडुजी

मैदानाचा संपूर्ण कट्टा काही वर्षांपूर्वी सुशोभित करण्यात आला होता. कट्ट्यावर विविध रंगसंगती असलेल्या चौकोनी आकाराचे तुकडे (चिप्स) लावण्यात आले आहेत. ते बदलून पूर्वीसारखा कट्टा करण्याची मागणी स्थानिक नागरिकांनी यावेळी केली. स्थानिकांच्या सूचनेचा विचार करत याठिकाणी योग्य ती डागडुजी करावी. तसेच नियमितपणे कट्ट्याची देखभाल व दुरुस्ती करावी, असे निर्देश गगराणी यांनी दिले.

### धुळीच्या अनुषंगाने उपाययोजना

मैदान परिसरातील धुळीच्या विषयाच्या अनुषंगाने महानगरपालिका आयुक्त गगराणी म्हणाले की, भारतीय तंत्रज्ञान संस्था (आय.आय.टी. मुंबई) च्या तज्ज्ञांच्या मदतीने धूळ प्रतिबंधक उपाययोजना करण्यात येत आहेत. या परिसरात हिरवळीसाठी गवत लागवडीचे काम आय.आय.टी. तज्ज्ञांच्या मदतीने सुरू करण्यात आले आहे. तसेच स्थानिक नागरिकांच्या सूचना लक्षात घेऊन धूळ प्रतिबंधात्मक आणखी उपाययोजना करण्यात येतील, असे गगराणी यांनी प्रसारमाध्यम प्रतिनिधींना सांगितले.

## शिवसेना वरळी विधानसभा वर्धापन दिन जल्लोषात



■ मुंबई

शिवसेना वरळी विधानसभेचा वर्धापन दिन नुकताच दादर येथील रवींद्र नाट्य मंदिरात उत्साहात साजरा करण्यात आला.या कार्यक्रमात सामाजिक बांधिलकी जपत ५० अपंग बांधवांना व्हिलचेअर वाटप करण्यात आले. तसेच २५ अंध बांधवांना आधारकार्डसह आर्थिक मदत देण्यात आली. ५० डायलिसिस रुग्णांना एक वर्षासाठी वैद्यकीय मदत देण्यात आली. ५० ज्येष्ठ नागरिकांना औषधांसाठी एक वर्षाची आर्थिक मदत देण्यात आली.

'वारसा संस्कृतीचा' या विशेष सांस्कृतिक कार्यक्रमाचेही आयोजन करण्यात आले.आम्ही नेहमीच समाजोपयोगी उपक्रम घेत असतो त्याचच एक भाग म्हणून आम्ही या वर्धापनदिन निमित्त विविध सामाजिक कार्यक्रम घेतले असल्याची माहिती माजी नगरसेवक दत्ता नरवणकर यानी दिली. सदरप्रसंगी शिवसेनेचे ज्येष्ठ नेते आनंदराव अडसूळ, आमदार प्रकाश सुर्वे , आमदार मुरजी पटेल , आमदार मनीषा कायंदे, शिवसेना महिला नेत्या मीनाताई कांबळी, माजी आमदार यामिनीताई जाधव, उपनेत्या शितल मात्रे, कलाताई शिंदे, आशा मामेडी, सिद्धिविनायक मंदिराचे विश्वस्त राहुल लोंढे , महिला विभागप्रमुख प्रिया सरवणकर, श्रद्धाताई उले, शायना एन.सी., माजी नगरसेवक संतोष खरात , भायखळा महिला विधानसभा प्रमुख वंदना गवळी यांची प्रमुख उपस्थिती लाभली.तसेच शिवसेनेचे सर्व महिला,पुरुष, युवा,युवती पदाधिकारी, निष्ठावान कार्यकर्ते मोठ्या संख्येने या कार्यक्रमाला उपस्थित होते.

## न्यूयॉर्कच्या मॅनहॅटनमध्ये गोळीबाराचा थरार, पोलीस अधिकाऱ्यासह 5 ठार

**न्यूयॉर्क:** अमेरिकेतील न्यूयॉर्क शहरातील मिडटाऊन मॅनहॅटन येथे सोमवारी संध्याकाळी एका बंदूकधाऱ्याने केलेल्या अंदाधुंद गोळीबारात एका पोलीस अधिकाऱ्यासह पाच जणांचा मृत्यू झाला. पार्क ॲव्हेन्यूवरील एका मोठ्या कॉर्पोरेट ऑफिस इमारतीजवळ ही धक्कादायक घटना घडली. हल्लेखोराने नंतर स्वतःवर गोळी झाडून आत्महत्या केल्याची माहिती पोलिसांनी दिली आहे. या घटनेने न्यूयॉर्क शहरात प्रचंड खळबळ उडाली असून, पोलिसांनी संपूर्ण परिसर रिकामा केला आहे.न्यूयॉर्क पोलीस विभागाने दिलेल्या माहितीनुसार, "मिडटाऊन मॅनहॅटनमधील गोळीबारात न्यूयॉर्क पोलीस विभागाच्या एका अधिकाऱ्यासह चार नागरिक ठार झाले आहेत." पोलिसांनी पुढे सांगितले की, संशयित हल्लेखोराने 'स्वतःलाच जखमी करून' आपला जीव दिला. एनवायपीडीच्या आयुक्त जेसिका टिश यांनी सांगितले की, "घटनास्थळावरील परिस्थिती आता नियंत्रणात आणली आहे." लांब पल्ल्याची रायफल घेतलेल्या या हल्लेखोराला निष्क्रिय करण्यात आल्याचेही त्यांनी स्पष्ट केले. हा गोळीबार ३४५ पार्क ॲव्हेन्यू येथील ६३४ फूट उंच गगनचुंबी इमारतीत झाला. या इमारतीत एनएफएल आणि ब्लॅकस्टोन यांसारख्या मोठ्या कंपन्यांची कार्यालये आहेत.

### राज्यसभेत 'मेंटल बॅलन्स'वरून खर्गे संतापले

# आता सोडणार नाही म्हणताच नड्डांवर माफी मागण्याची वेळ

वृत्तसंस्था
नवी दिल्ली

राज्यसभेत मंगळवारी ऑपरेशन सिंदूरवरील चर्चेदरम्यान विरोधी पक्षनेते मल्लिकार्जून खर्गे आणि केंद्रीय मंत्री जे. पी. नड्डा यांच्यामध्ये जोरदार शाब्दिक चकमक उडाली. खर्गे यांनी आपल्या भाषणात पंतप्रधान नरेंद्र मोदींवर जोरदार हल्ला चढवला होता. मोदी शिव्यांचा हिशोब ठेवतात, पण डोनाल्ड ट्रम्प यांच्याविषयी ते गप्प राहतात, असा निशाणा खर्गेंनी साधला. त्याला प्रत्युत्तर देण्यासाठी उठलेल्या नड्डा यांनी खर्गेविषयी वापरलेल्या शब्दांमुळे मोठा गदारोळ झाला.

खर्गे यांनी केलेल्या टीकेला प्रत्युत्तर देताना नड्डा यांनी त्यांची काही विधाने कामकाजातून वगळण्याची विनंती उपसभापतींकडे केली. तसेच पंतप्रधान मोदी हे जगातील सर्वाधिक लोकप्रिय नेते आहेत. त्यांच्या नेतृत्व क्षमतेवर आपल्याला गर्व आहे. केवळ पक्षालाच नाही तर देशालाही याचा



अभिमान असल्याचे सांगताना नड्डा यांनी खर्गेंवरही निशाणा साधला.

तुम्ही पक्षाशी एवढे जोडले आहात की देशाचा विषय गौण ठरतो आणि त्यामुळे मेंटल बॅलन्स जाऊन तुम्ही त्या शब्दांचा प्रयोग करता, असे नड्डा म्हणाले. त्यावर काँग्रेसच्या खासदारांनी जोरदार आक्षेप घेतला. ही बाब लक्षात घेताच नड्डांनी शब्द मागे घेत असल्याचे सांगत मानसिक संतुलन नव्हे भावनाविवश हा शब्द कामकाजात घालण्याची विनंती केली. मात्र, त्यानंतरही विरोधकांचे समाधान झाले नाही.

नड्डा यांनी शब्द मागे घेतल्यानंतरही खर्गे बोलण्यास उभे राहिले. मी काही मंत्र्यांचा सन्मान करतो, जे त्यांचा बॅलन्स ढळू न देता बोलतात. त्यामध्ये राजनाथ सिंह नड्डांही आहेत. ते मला म्हणताहेत मेंटल बॅलन्स गेला. ही लाजीरवाणी बाब आहे, त्यांनी माफी मागायला हवी, अशी जोरदार मागणी खर्गे यांनी केली.नड्डा यांनीही लगेच विरोधी पक्षनेते आदरणीय आहेत, त्यांचा मी आदर करतो असे म्हणत त्यांच्या भावना दुखावल्या असतील तर मी माफी मागतो, असे म्हणाले. पण भावनाविवश होत तुम्ही खूप वाहत गेला, इतके वाहत गेलात की पंतप्रधानांच्या प्रतिष्ठेचे भानही तुम्हाला राहिले नाही, याचे दुःख असल्याचेही नड्डा म्हणाले.

### ऑपरेशन सिंदूर' दरम्यान

## गोळीबारात पालक गमावलेल्या 22 मुलांना राहुल गांधी घेणार दत्तक



वृत्तसंस्था
नवी दिल्ली

२२ एप्रिल रोजी पहलगाम येथे झालेल्या दहशतवादी हल्ल्यानंतर भारत-पाकिस्तान सीमेवर झालेल्या संघर्षात आपले पालक किंवा कुटुंबातील एकमेव कमावता सदस्य गमावलेल्या पूंछमधील २२ मुलांना विरोधी पक्षनेते राहुल गांधी यांनी दत्तक घेण्याचा निर्णय घेतला आहे. जम्मू आणि काश्मीर काँग्रेसचे प्रदेशाध्यक्ष तारिक हमीद कर्रा यांनी याबाबत माहिती दिली. त्यांनी सांगितले की, राहुल गांधी या मुलांचा संपूर्ण शैक्षणिक खर्च उचलणार आहेत. ही मुले पदवीधर होईपर्यंत ही मदत सुरू राहणार आहे, असे कर्रा यांनी स्पष्ट केले. या मुलांना त्यांच्या शिक्षणासाठी आर्थिक मदतीचा पहिला हप्ता बुधवारी (३० जुलै) दिला जाणार आहे.

मे महिन्यात पूंछच्या दौऱ्यादरम्यान राहुल गांधी यांनी स्थानिक काँग्रेस नेत्यांना बाधित झालेल्या मुलांची माहिती गोळा करण्याचे आदेश दिले होते. त्यानुसार काँग्रेस पदाधिकाऱ्यांनी माहिती गोळा केली आणि शासकीय नोंदींची सखोल पडताळणी करून पात्र मुलांची अंतिम यादी तयार करण्यात आली.

या दौऱ्यादरम्यान राहुल गांधी यांनी क्राइस्ट पब्लिक स्कूललाही भेट दिली, जिथे उर्बा फातिमा आणि झैन अली या १२ वर्षांच्या जुळ्या बहीण-भावांचा दुर्दैवी मृत्यू झाला होता. विद्यार्थ्यांशी संवाद साधताना राहुल गांधी म्हणाले, "मला तुमचा खूप अभिमान वाटतो. तुम्हाला तुमच्या मित्रांची आठवण येते, हे मी समजू शकतो. तुम्ही मित्रांना गमावले त्याबद्दल मला खूप वाईटही वाटते. सध्या थोडा धोका, थोडी भीती वाटत असेल; पण काळजी करू नका, सर्व काही पुन्हा सुरळीत होईल. त्यावर मात करण्याचा सर्वांत चांगला मार्ग म्हणजे खूप मेहनत करणे आणि शाळेत भरपूर चांगले मित्र बनवणे."

सीमेपलीकडून सातत्याने होणाऱ्या गोळीबारामुळे पूंछ शहर सर्वाधिक प्रभावित झाले होते. या हिंसाचारात 'जिया उल आलूम' या धार्मिक शाळेवर झालेल्या गोळीबारात खूप मुले जखमी झाली होती. या घटनेतील बळींपैकी एक होता विहान भार्गव, ज्याच्या कुटुंबाने सुरक्षित ठिकाणी जाण्यासाठी शहर सोडण्याचा प्रयत्न केला. मात्र गोळीबारात विहानचा दुर्दैवी मृत्यू झाला.

## मॅच्युअर व्हा, महापालिकेत नाय आता..!

### लोकसभेतच '50 खोके एकदम ओके' म्हणणाऱ्या महिला खासदारावर श्रीकांत शिंदे भडकले...

वृत्तसंस्था
नवी दिल्ली

ऑपरेशन सिंदूरवरील चर्चेदरम्यान शिवसेनेचे खासदार श्रीकांत शिंदे यांनी विरोधकांवर शरसंधान साधले. शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षाचे खासदार अरविंद सावंत, काँग्रेसच्या खासदार प्रणिती शिंदे यांनी काही विधानांचाही त्यांनी समाचार घेतला. विरोधकांचे आरोप, दावे त्यांनी खोडून काढले.

श्रीकांत शिंदे यांच्या भाषणाआधीच प्रियांका गांधींचे भाषण झाले होते. त्यानंतर शिंदे भाषणासाठी उठले. भाषण सुरू झाल्यानंतर काही मिनिटांतच विरोधी बाकावरून एका महिला खासदारांनी त्यांना डिवचण्याचा प्रयत्न केला. त्यावर शिंदेंनीही लगेच पलटवार करत मराठीतूनच जोरदार प्रत्युत्तर दिले.

विरोधातील सर्व लोक इंटिलिजन्स फेल्युवरवर बोलत आहेत. दहशतवादी कसे आले, कुठून आले, हे विचारत होते, असे श्रीकांत शिंदे बोलल्यानंतर विरोधी बाकांवरून त्यांना डिवचण्याचा प्रयत्न झाला. अरे प्रियांका से आगे बढो, आगे बढो, 50 खोके-एकदम ओके, असे बोलण्यात आले. त्यावर संतापलेल्या शिंदेंनी भाषण थांबवत 'अरे आता मॅच्यूअर व्हा, वरती या, पार्लमेंटमध्ये आले, महापालिकेत नाय आता', असा पलटवार शिंदे यांनी केला.


# तुम्हाला लाज वाटत नाही का?

### प्रियांका गांधींची तोफ संसदेत धडाडली

वृत्तसंस्था
नवी दिल्ली

लोकसभेत पावसाळी अधिवेशनात कालपासून पुलवामा, पहलगाम हल्ला आणि ऑपरेशन सिंदूरवरून चर्चा सुरू आहे. या विशेष चर्चादरम्यान, सत्ताधारी आणि विरोधकांमध्ये जोरदार खडाजंगी पाहायला मिळत आहे. अशातच काँग्रेसच्या खासदार प्रियांका गांधी यांनीही मोदी सरकारवर टीकेच बॉम्बगोळे टाकले.

काँग्रेसच्या वायनाड लोकसभा मतदारसंघाच्या खासदार प्रियांका गांधी मंगळवारी (ता.29) संसदेत बोलत होत्या. यावेळी त्यांनी मोदी सरकारवर निशाणा साधला. त्या म्हणाल्या, कालपासून मी संसदेत सत्ताधारी पक्षांसह विविध नेत्यांची भाषण ऐकलो.आम्ही संरक्षणमंत्री



यांचंही मोठं भाषण ऐकलं.त्यांनी इतिहासाचा पाठही शिकवला. पण या सगळया भाषणात एक गोष्ट खटकली. त्या 22 एप्रिल 2025 पहलगाममध्ये आतंकवाद्यांनी आपल्या परिवारासमोर पर्यटकांना मारण्यात आलं. पण हा हल्ला कसा झाला, का झाला हा प्रश्न उपस्थित होतो.

प्रियांका गांधी म्हणाल्या, हे सगळे दहशतवादी या पहलगामच्या बैसरन वादीत काय करत होते. आता सध्या पब्लिसिटीचा जमाना आहे. त्यामुळे केंद्रातलं सरकार आणि प्रधानमंत्री प्रचार करत होते. जम्मू-काश्मीरमध्ये पर्यटनासाठी या, तिथे जमीन खरेदी करा, तिथे व्यवहार करा. आता काश्मीरमध्ये दहशतवाद संपला आहे. तिथे सगळीकडे शांतता आहे.

पण याचदरम्यान, तिथे चार पर्यटक येतात,आणि एक तास ते एक एक करुन पर्यटकांना मारतात. यावेळी त्यांनी शुभम द्विवेदीच्या मृत्यूनंतर त्यांच्या पत्नीच्या प्रतिक्रियेचा उल्लेख करत पहलगाममधील हल्ल्यावेळी तिथे एकही सुरक्षारक्षक का नव्हता, तिथे सैन्य का तैनात नव्हतं, पहलगाममध्ये जे लोक मारले गेले, त्यांच्यासाठी का सुरक्षा व्यवस्था तैनात नव्हते.,याची संरक्षणमंत्री, गृहमंत्री तुम्हाला लाज वाटत नाही का, असा सवालही मोदी सरकारला प्रियंका गांधी यांनी विचारला.

मोदींना ऑपरेशन सिंदूरचं श्रेय घ्यायचंय, पण यावेळी त्यांनी संरक्षणमंत्री राजनाथ सिंह, केंद्रीय गृहमंत्री अमित शाह यांनी या हल्ल्याची जबाबदारी स्विकारणार का असा सवालही त्यांनी विचारला. तसेच गृहमंत्री अमित शाह यांच्याकडे गृहमंत्री पद असताना मणिपूर जळत आहे,असा घणाघातही गांधी यांनी आपल्या भाषणात केला.

**ट्रम्प यांना खोटं ठरवून दाखवा**

मग पहलगाम हल्ल्यामागे पाकिस्तानचे लष्करप्रमुख जनरल मुनीर यांचा हात होता. या माणसानं नंतर अमेरिकेच्या अध्यक्षांसोबत जेवण केलं. आपले पंतप्रधान अमेरिकेला जाऊ शकले नाहीत पण पाकिस्तानचे लष्कर प्रमुख मस्त जेवण करत होते. याद्वारे ट्रम्प यांनी सगळेच प्रोटोकॉल तोडून टाकले आहेत. तसंच जो माणूस भारतात दहशतवाद पसरवतोय त्याला माणसाला ट्रम्प यांनी निमंत्रित केलं. पण पंतप्रधान नरेंद्र मोदी त्यांना काहीही बोलले नाहीत. त्यांनी ट्रम्प यांना विचारलही नाही की तुम्ही मुनीर यांना तुमच्या कार्यालयात कसं काय बोलावलंत? म्हणजे सरकार एकीकडं म्हणतंय की, आम्ही पाकिस्तानला रोखलं आणि दुसरीकडं या पहलगाम हल्ल्याचा मास्टरमाईंड हा ट्रम्पयांच्यासोबत जेवण करतो. त्यावर ट्रम्प म्हणतात की, मुनीर यांचे आभार मानायला इथं आलो आहे. कशासाठी तुम्हाला आभार मानायचे आहेत? तसंच सध्या पाकिस्तानचे लष्करप्रमुख जनरल मुनीर, अमेरिकेचे जनरल मायकल कुरेला आणि चार मध्य आशियातील देशांचे जनरल यांची नुकतीच एक परिषद घेतली दहशतवाद कसा रोखायचा या विषयावर. हे असेल लोक आपल्या भोवती आहेत आणि ते जगाला सांगत आहेत. त्यामुळं मला हे विचारायचं आहे की, आपले परराष्ट्रमंत्री हे कोणत्या ग्रहावर राहत आहेत" भारत सरकार म्हणतंय की कोणताही दहशतवादी कारवाई म्हणजे युद्ध आहे. मग याचा अर्थ असा होतो की, जर कोणत्याही दहशतवाद्याला भारताला युद्ध करण्यासाठी उसकवायचं असेल तर त्याला तुम्ही ही पॉवरच देऊन टाकलीय की, तुम्हाला जर युद्ध पाहिजे असेल तर तुम्ही एक हल्ला करा तुम्हाला युद्ध मिळेल. जर उद्या पुन्हा दहशतवादी हल्ला झाला तर तुम्ही काय करणार पाकिस्तानविरोधात युद्ध पुकारणार का? म्हणजेच या सरकारला युद्ध रोखणं याचा अर्थच कळत नाहीए, अशा शब्दांत राहुल गांधी यांनी सरकारवर सडकून टीका केली.

पान 1 वरुन...

**वसई, ठाणे, नाशिकसह १२ ठिकाणी ईडीची छापेमारी**

लक्ष केंद्रित केल्याची माहिती आहे.महानगरपालिकेतील नगररचना विभागाचे तत्कालीन उपसंचालक वाय. एस. रेड्डी यांच्यावर पूर्वी ईडीने कारवाई केली होती. त्यानंतर अनधिकृत बांधकामाशी संबंधित मुख्य जबाबदारांवर कारवाई व्हावी, अशी मागणी अनेकांनी केली होती. माजी नगरसेवक धनंजय गावडे यांनीही पवार यांच्या विरोधात तक्रारी केल्या होत्या. दरम्यान,ईडीच्या अधिकाऱ्यांनी अनिलकुमार पवार यांच्या सासऱ्यांच्या घरीही छापे टाकले. त्या ठिकाणीही काही काळ झडती सुरू होती. या छाप्यांमधून नेमकी काय माहिती हाती लागली हे स्पष्ट झाले नसले तरी ईडीकडून सर्व बाजूंनी तपासाची चक्रे फिरवण्यात येत असल्याचे स्पष्ट होते.पवार यांची नुकतीच ठाण्यातील SRA विभागात बदली झाली होती. विशेष म्हणजे, ईडीची कारवाई होण्याच्या अगोदरच त्यांनी त्यांच्या घरातील कर्मचाऱ्यांना सुट्टी दिली होती. यामुळे त्यांच्या हालचाली आधीच संशयास्पद

**शिंदे त्यांच्या मंत्र्यांच्या गैरकृत्यावर पांघरूण घालतायत**

एकनाथ शिंदे आहेत का? तेच एकनाथ शिंद डान्स बारला समर्थन देत आहेत का? एकनाथ शिंदे आपल्या तत्वाशी प्रामाणिक नाही, त्यामुळे आपली खुर्ची वाचवण्यासाठी ते आपल्या आमदारा मंत्र्यांच्या गैरकृत्यावर पांघरून घालत आहेत. आता त्यांनी स्वत:च सांगावं की धर्मवीर चित्रपटातले एकनाथ शिंदे खरे की आताचे समर्थन करणारे एकनाथ शिंद खरे आहेत? असा सवालही त्यांनी यावेळी केला.

## भारताचा रोलर डर्बी संघ २०व्या आशियाई रोलर स्केटिंग स्पर्धेत उपविजेता



वृत्तसंस्था
सेऊल

दक्षिण कोरियातील जिचॉन येथे आयोजित २०व्या आशियाई रोलर स्केटिंग स्पर्धेत भारताने रोलर डर्बी प्रकारात उल्लेखनीय यश संपादन करत द्वितीय क्रमांक मिळवला आहे. अंतिम सामना ऑस्ट्रेलिया विरुद्ध भारत असा रंगला. ऑस्ट्रेलियाने स्पर्धेत प्रथम क्रमांक पटकावला, तर भारतीय संघाने उपविजेतेपद मिळवले. जपानने तृतीय क्रमांक मिळवला आहे.दक्षिण कोरियातील जिचॉन येथे आयोजित स्पर्धेत २८ जुलै २०२५ रोजी भारतीय संघात मुंबईची कॅरोलिन फर्नांडिस हिने सहभाग घेतला असून तिच्या उत्कृष्ट खेळामुळे भारताला हे यश मिळाले. तिच्या कामगिरीमागे महाराष्ट्र राज्य स्केटिंग असोसिएशनचे पी. के. सिंग आणि श्रीमती आदेश सिंग यांचे मार्गदर्शन लाभले आहे. मुंबईच्या कॅरोलिन फर्नांडिस हिच्या उत्कृष्ट खेळाबद्दल तिच्यावर अभिनंदनचा वर्षाव होत आहे.

## हरियाणात CRPF जवानाची गोळ्या झाडून हत्या

वृत्तसंस्था
सोनीपत

हरियाणातील सोनीपतमध्ये केंद्रीय राखीव पोलिस दलाच्या (CRPF) एका जवानाची गोळ्या घालून हत्या करण्यात आली. रविवारी रात्री उशिरा मारेकऱ्यांनी त्याला त्याच्या घरातून बोलावून गोळ्या घालून हत्या केली.गोळीचा आवाज ऐकून कुटुंबातील सदस्य घटनास्थळी पोहोचले आणि त्यांना जवान रक्ताच्या थारोळ्यात पडलेला आढळला. कुटुंबीयांनी त्याला ताबडतोब रुग्णालयात नेले, जिथे डॉक्टरांनी त्याला मृत घोषित केले. माहिती मिळताच सदर गोहाना पोलिसांनी घटनास्थळी पोहोचून मृतदेह ताब्यात घेतला आणि शवविच्छेदनासाठी पाठवला. मृताचे नाव कृष्णा असे आहे, तो खेडी दमकन गावचा रहिवासी होता.

## दादासाहेब फाळकेंच्या रुपाने मराठी माणुसच चित्रपटसृष्टीचा जनक ठरल्याचा अभिमान - आठवले

वृत्तसंस्था
दुबई

चित्रपटसृष्टीच्या जगात अमेरिकेचे हॉलिवूड आहे तसे भारताचे बॉलिवूड सुध्दा प्रसिध्द आहे.मुंबईचे बॉलिवूड,हिंदी सिनेसृष्टी या संपूर्ण भारतीय चित्रपट सृष्टीचे जनक दादासाहेब फाळके आहेत.दादासाहेब फाळके यांच्या रुपाने मराठी माणुसच भारतीय चित्रपट सृष्टीचा जनक ठरल्याचा



आम्हाला अभिमान आहे असे प्रतिपादन रिपब्लिकन पक्षाचे राष्ट्रीय अध्यक्ष केंद्रीय सामाजिक न्याय राज्यमंत्री ना.रामदास आठवले यांनी दुबई येथे केले.दुबई येथील हॉटेल लॅव्हेंडर मध्ये दादासाहेब फाळके अवॉर्डचे वितरण ना.रामदास आठवले यांच्या हस्ते अनेक मान्यवरांना करण्यात आले. यावेळी दादासाहेब फाळके अवॉर्ड ने ना.रामदास आठवले यांचा ही भव्य सत्कार करण्यात आला.यावेळी दादासाहेब फाळके अवॉर्ड चे आयोजक कल्याणजी जाना उपस्थित होते.यावेळी भाजपचे महामंत्री दुष्यंत गौतम,याकुब अली तसेच हिंदी चित्रपट सृष्टीतील अनेक कलावंत उपस्थित होते.

# चीनमध्ये पूर आणि भूस्खलनात 34 जणांचा मृत्यू

### बुलडोझरने लोकांना सुरक्षितपणे बाहेर काढले, 80 हजार लोकांना वाचवले

वृत्तसंस्था
बीजिंग

चीनची राजधानी बीजिंग आणि आसपासच्या भागात मुसळधार पाऊस आणि पुरामुळे आतापर्यंत ३४ जणांचा मृत्यू झाला आहे. सरकारी टीव्ही चॅनेल सीसीटीव्हीनुसार, बीजिंगच्या मियुन जिल्ह्यात २८ आणि यानकिंग जिल्ह्यात २ जणांचा मृत्यू झाला. हे दोन्ही भाग शहराच्या बाहेरील भागात आहेत.

पुरामुळे बीजिंगमधून ८०,००० हून अधिक लोकांना सुरक्षित ठिकाणी हलवण्यात आले आहे. त्यापैकी सुमारे १७,००० लोक मियुन जिल्ह्यातील आहेत. सततच्या पावसामुळे, मंगळवारी सकाळपर्यंत बीजिंगच्या काही भागात ३० सेंटीमीटरपर्यंत



पाणी साचण्याची शक्यता वर्तवण्यात आली होती. सोमवारी बीजिंगला लागून असलेल्या हेबेई प्रांतातील लुआनपिंग काउंटीमध्ये भूस्खलन झाले. चार जणांचा मृत्यू झाला आणि आठ जण बेपत्ता आहेत. स्थानिकांनी सांगितले की, या भागातील नेटवर्क बंद आहे आणि संपर्क कठीण झाला आहे. बीजिंग प्रशासनाने सोमवारी रात्री ८ वाजता उच्चस्तरीय आपत्कालीन प्रतिसाद जारी केला. या अंतर्गत, सर्व शाळा बंद ठेवण्यात आल्या आहेत. बांधकाम आणि बाह्य क्रियाकलापांवरही बंदी घालण्यात आली आहे.

चीन सरकारने हेबेई प्रांताला ५० दशलक्ष युआनची आपत्कालीन मदत पाठवली आहे. चेंगडे, बाओडिंग आणि झांगजियाकौ सारख्या बाधित शहरांमध्ये मदतकार्य करण्यासाठी केंद्रीय पथके देखील रवाना करण्यात आली आहेत. यापूर्वी, मियुन जिल्ह्यातील एका मोठ्या जलाशयाची पाण्याची पातळी १९५९ मध्ये बांधल्यापासूनची सर्वोच्च पातळी गाठली होती. त्यानंतर, प्रशासनाने त्यातून पाणी सोडण्याचा निर्णय घेतला. सखल भागात नदीकाठच्या राहणाऱ्या लोकांना सतर्क राहण्याच्या सूचना देण्यात आल्या आहेत.

# अमेरिका-EU व्यापार करारावर फ्रान्स नाराज

### ट्रम्प फक्त सत्तेची भाषा समजतात, हा करार युरोपसाठी काळा दिवस : पंतप्रधान फ्रँकोइस बेरो

वृत्तसंस्था
पॅरिस

अमेरिकेचे अध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प आणि युरोपियन युनियन (EU) च्या अध्यक्षा उर्सुला वॉन डेर लेयन यांच्यात रविवारी झालेल्या व्यापार करारावर फ्रान्सने टीका केली आहे. फ्रान्सचे पंतप्रधान फ्रँकोइस बेरो यांनी हा युरोपियन युनियनसाठी काळा दिवस असल्याचे म्हटले आहे.

बेरो म्हणाले की, युरोपियन युनियनने राष्ट्राध्यक्ष ट्रम्प यांच्या वाढत्या टॅरिफ दबावापुढे झुकले आहे. त्यांनी X- वर लिहिले. त्यांच्या सामायिक मूल्यांचे आणि हितांचे रक्षण करण्यासाठी स्थापन झालेल्या स्वतंत्र राष्ट्रांच्या युतीवर दबाव येतो तेव्हा ते दुःखद होते.

त्याच वेळी, फ्रान्सचे युरोपीय व्यवहार मंत्री बेंजामिन हद्दाद म्हणाले की ही परिस्थिती योग्य नाही आणि युरोपियन युनियनने प्रत्युत्तर दिले पाहिजे. फ्रान्सचे व्यापार मंत्री लॉरेंट सेंट-मार्टिन म्हणाले - ट्रम्प फक्त सत्तेची भाषा समजतात. आपण आधीच प्रत्युत्तरात्मक पावले उचलायला हवी होती, तर कदाचित करार चांगला झाला असता. तथापि, फ्रान्सचे अध्यक्ष इमॅन्युएल मॅक्रॉन



यांनी या प्रकरणावर मौन बाळगले आहे.

**इटली-जर्मनी व्यापार कराराचे स्वागत**

जर्मन चांसलर फ्रेडरिक मेर्ट्झ आणि इटलीचे पंतप्रधान जिओर्डानो मेलोनी यांनी या कराराचे स्वागत केले. युरोपियन व्यापार आयुक्त मारोश सेफकोविक यांनी याला "मोठे पाऊल" म्हटले कारण यामुळे अमेरिका आणि युरोपमधील व्यापार युद्ध टळले.

या कराराअंतर्गत, युरोपमधून अमेरिकेत जाणाऱ्या बहुतेक वस्तूंवर १५% कर आकारला जाईल, जो सध्याच्या ४.८% पेक्षा तिप्पट आहे. तथापि, ट्रम्पच्या धमकीनंतर १ ऑगस्टपर्यंत ३०% कर टाळता आला असता. कराराच्या तपशीलांनुसार, युरोपमधून येणाऱ्या ७०% वस्तूंवर १५% कर आकारला जाईल. यामध्ये कार, औषधे आणि इलेक्ट्रॉनिक्स वस्तूंचा समावेश आहे. तथापि, विमानाच्या सुटे भागांवर, काही रसायनांवर, सेमीकंडक्टर उपकरणांवर आणि कॉर्कसारख्या काही कृषी उत्पादनांवर कोणतेही शुल्क आकारले जाणार नाही. सध्या औषधांवरही कोणतेही शुल्क आकारले जाणार नाही आणि भविष्यात जरी असे असले तरी ते १५% पेक्षा जास्त असणार नाही. पुढील तीन वर्षांत युरोपियन युनियन अमेरिकेकडून ७५० अब्ज डॉलर्स म्हणजेच सुमारे ६४ लाख कोटी रुपयांची ऊर्जा खरेदी करेल. यासोबतच, युरोपियन युनियन अमेरिकेत ६०० अब्ज डॉलर्स म्हणजेच ५१ लाख कोटी रुपयांची गुंतवणूक करेल.